• पुणे, रविवार, २३ मार्च २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 115 • वर्ष ४ थे, अंक ११५ • किंमत ₹ ६ • पाने : १२


# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News





बलुचिस्तान का पेटले ?

P५

रविचंद्रन अश्विनचा खास सन्मान!

१२



## At a Glance

### नागपूर हिंसाचारात जखमी इरफान अन्सारीचा मृत्यू

**नागपूर :** औरंगजेबाच्या कबरीच्या मुद्यावरुन 17 मार्च रोजी नागपूरमध्ये दोन गटात हिंसाचार झाला. रात्रीच्या सुमारास हिंसक संघर्ष झाला होता. यावेळी दगडफेक, वाहनांची तोडफोड, जाळपोळ असे प्रकार घडले होते. या हिंसाचारादरम्यान इरफान अन्सारी जखमी झाला होता. त्याचा आज उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे.

» पान ४ वर

### कबरीच्या वादात जरांगेंची उडी

**बीड :** मुघल बादशाह औरंगजेबच्या कबरीवरून राज्यात वाद निर्माण झालाय. या वादावरून नागपुरात दंगल उसळली. त्यानंतर विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना धारेवर धरले. आता कबरीच्या वादामध्ये मराठा आंदोलक मनोज जरांगेंनी उडी घेतली आहे. छत्रपती संभाजीनगर येथील औरंगजेबची कबर हटवण्यात यावी, अशी मागणी केली जात आहे. सरकारलाच औरंगजेबाची

» पान ४ वर

# भेदाभेद अमंगळ!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** हिंदू मुस्लिम समुदायांमध्ये दिवसेंदिवस भेद वाढत जात असताना आज या भेदाभेदाचे मूळ कारण असलेल्या कबरीवरून महायुतीमध्ये देखील भेद दिसून आला.

कबरीच्या वादावरून उसळलेल्या दंगलीमध्ये शनिवारी नागपूरात जोरदार अटक सत्र सुरू होते. दुसरीकडे नितेश राणे यांनी आक्रमक हिंदुत्वाचा पवित्रा घेत मुस्लिमांना डिवचणे सुरू केले. मात्र अशातच इफ्तार पार्टीच्या निमित्ताने उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मात्र अशा हिंदुत्ववादी नेत्यांना चांगलेच फटकारले आहे. भेदाभेद अमंगळ सांगत अजित पवार यांनी मुस्लिमांना पूर्ण सुरक्षेचे आश्वासन दिले. वृत्तवाहिनीशी बोलताना एका कार्यक्रमात देखील नामदार पवार यांनी इतिहास जमा असलेल्या कबरी कशाला खोदायच्या? नाही तेव्हा



### मुस्लिमांना डोळे दाखवणार याचा बंदोबस्त करू

• राष्ट्रवादीने आयोजित केलेल्या इफ्तार पार्टीमध्ये अजित पवार यांनी सांगितले की, जो कोणी मुस्लिम बांधवांना डोळे दाखवेल, दोन गटात संघर्ष करून कायदा व सुव्यवस्था बिघडवेल आणि कायदा हातात घेण्याचा प्रयत्न करेल. तो कोणीही असला तरी त्याला कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही किंवा माफ केले जाणार नाही. रमजान हा केवळ एका धर्मापुरता मर्यादित नाही. त्यातून एकता आणि बंधुत्वाचा संदेश मिळतो. भारत हे विविधतेतील एकतेचे प्रतीक आहे. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ . बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, शाहू महाराज यांनी जातींना एकत्र आणून समाजाच्या उन्नतीचा मार्ग दाखवला. हा वारसा आपण पुढे नेला पाहिजे.



कशाला काय करायचे असे वक्तव्य केले. त्यामुळे हिंदुत्व विरुद्ध धर्म समानता हा वाद आता महायुतीमध्ये देखील झिरपत असल्याचे दिसत आहे.

मुघल शासक औरंगजेबाची कबर महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद येथे आहे. ही कबर नष्ट करण्यात यावी, अशी मागणी गेल्या काही दिवसांपासून जोर धरू लागली आहे. हिंदुत्ववादी संघटनांनी कबर उखडून टाकण्याची तयारीही केली होती. औरंगजेबाच्या कबरीवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. त्यातच नागपूरमध्ये दंगलीची घटना घडली होती. तर औरंगजेबाची कबर पाडण्यासाठी भाजप नेते आणि मंत्री नितेश राणे हे देखील गेल्या काही दिवसांपासून चांगलेच आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. आता औरंगजेबच्या कबरीच्या वादावरून राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्य सरकारला घरचा आहेर दिला आहे.


समाजात गैरसमज निर्माण करणे आणि समाजात दरी निर्माण करणे योग्य नाही, असे अजित पवार यांनी म्हटले आहे. इतक्या वर्षांनी औरंगजेबाची कबर कशाला उकरता? असे म्हणत अजित पवार यांनी सरकारला घरचा आहेर दिला आहे. तर मंत्री म्हणून काम करत असताना तारतम्य बाळगायला पाहिजे, असे म्हणत अजित पवारांनी नितेश राणे यांचे कान टोचले आहे. आपण ठराविक समाजाचे मंत्री नाही, असा टोला देखील अजित पवार यांनी नितेश राणे यांना लगावला आहे.

## काँग्रेस प्रदेशाध्यक्षांचे पुन्हा सरकारवर टीकास्त्र

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल वादग्रस्त विधान करणारा ऑन कोरटकर देशाबाहेर फरार झाल्याने सरकारवर टीका होत आहे. "हा संपूर्ण प्रकार सरकारच्या आश्रयाने झाला आहे," असा गंभीर आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, " कोरटकरने छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आक्षेपार्ह विधान केल्यानंतर त्याला पोलिस सुरक्षा का मिळाली? आणि नंतर तो फरार कसा झाला? सरकारची भूमिका संशयास्पद आहे. 'महाराजांचा अपमान करा आणि सुरक्षा मिळवा' ही सरकारची नवी योजना आहे का?"

त्यांनी आरोप केला की, "फडणवीस आणि कोरटकर यांचे हितसंबंध आहेत. त्यामुळेच त्याला आधी सुरक्षा मिळते आणि नंतर तो देशाबाहेर पळून जातो. कोरटकर दुबईला कसा पोहोचला? गृह विभाग झोपला होता का? पोलिसांना मदत करायला देवेंद्र फडणवीस यांनी दबाव टाकला का?" सपकाळ यांनी राज्यातील कायदा-सुव्यवस्थेवर जोरदार हल्लाबोल केला. कायदा-सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला असल्याचे ते म्हणाले.



**राजकारण**

> फडणवीस आणि औरंगजेब यांचा कारभार सारखाच आहे. या सरकारच्या काळात गुन्हेगार मोकाट सुटले आहेत आणि शिवरायांचा अपमान करणाऱ्यांना मोकळीक दिली जात आहे. फडणवीस सरकार फक्त घोषणाबाजी करत आहे, प्रत्यक्षात कायदा-सुव्यवस्था सुधारण्याच्या नावाने काहीच होत नाही. अपमान करा आणि पुरस्कार मिळवा, हेच या सरकारचं धोरण दिसत आहे."
>
> **— हर्षवर्धन सपकाळ**
> काँग्रेस प्रदेशाध्यक्ष

# इकडे नजरा-नजर : तिकडे तीळ-पापड

## वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या संचालक बैठकीत चर्चेला उधाण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अजित पवार आणि शरद पवार यांच्यामध्ये झालेली नजरा नजर शनिवारी दिवसभर चर्चेचा विषय ठरली तर दुसरीकडे याच कार्यक्रमात झालेल्या काही बंद दारा मागील भेटींमुळे शिवसेनेचा तीळ पापड झाला.

मांजरी येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट मध्ये शनिवारी इन्स्टिट्यूटच्या संचालकांची बैठक लावण्यात आली होती. या संचालक मंडळामध्ये राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह नामदार अजित पवार जयंत पाटील दिलीप वळसे पाटील असे सर्व दिग्गज नेते मंडळी आहेत.

शनिवारी सकाळी अजित पवार हे साडेसात वाजता मांजरी येथे पोहोचले आणि त्यांनी त्यांना भेटण्यासाठी आलेल्या काही लोकांची निवेदने स्वीकारण्यासाठी वेळ दिला. साधारण आठ वाजता तिथे शरद पवार उपस्थित झाले. अजित पवार हे उपाध्यक्षांच्या दालनामध्ये बसले होते कॅरिडोर मधून जात असताना शरद पवार यांनी उपाध्यक्षच्या केबिनकडे कटाक्ष टाकला.

आतमध्ये अजित पवार असल्याचे त्यांना दिसले. त्यावेळी अजितदादा यांनी पुढे केबिनकडे चला मी येतो अशा अर्थाने त्यांना हाताचा इशारा केला आणि पवार साहेब क्षणभर तेथे थांबून पुढे निघाले. काही क्षणाची झालेली ही नजरा - नजर शनिवारी दिवसभर माध्यमांमध्ये चर्चेचा विषय ठरली.



### राऊतांचा तीळ पापड

• या भेटीच्या आधी जयंत पाटील हे तेथे उपस्थित होते. त्यावेळी त्यांची आणि अजित पवार यांची भेट झाली. बंद दारावर अजित पवार, जयंत पाटील यांनी सुमारे एक तास चर्चा केली. भेटीचा तपशील दोन्ही नेत्यांनी सांगण्यास नकार दिला. परंतु, या भेटीचे वृत्त समजतात संजय राऊत यांनी संताप व्यक्त केला. महाराष्ट्राच्या देशद्रोही मंडळींनी हे राज्य मागे नेले आहे. त्यांच्याशी आम्ही बोलणे काय तर कटाक्ष देखील टाकत नाही, असे सांगत त्यांनी नाराजी व्यक्त केली. आम्ही देशद्रोह्यांशी बोलत नाही त्यांच्या भेटीसाठी सुरू आहे सुरू आहेत. काय काय सुरू आहे हे लक्षण योग्य नसल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

## ज्येष्ठ कवी विनोद कुमार शुक्ल यांना ज्ञानपीठ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** हिंदीतील ज्येष्ठ कवी आणि साहित्यिक विनोद कुमार शुक्ल यांची यंदाच्या ज्ञानपीठ पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार भारतातील सर्वोच्च साहित्य सन्मान मानला जातो. नवी दिल्ली येथे शनिवारी (दि. 22 मार्च) याबाबत अधिकृत घोषणा करण्यात आली.

शुक्ल यांच्या 'नौकर की कमीज', 'खिलेगा तो देखेंगे' आणि 'दीवार में एक खिड़की रहती थी' या कादंबऱ्या आधुनिक हिंदी साहित्यातील अत्यंत महत्त्वाच्या कलाकृती मानल्या जातात. त्यांच्या 'पेड़ पर कमरा' आणि 'महाविद्यालय' या लघुकथासंग्रहांना वाचकांची मोठी पसंती मिळाली आहे.

## वडेट्टीवार यांना उच्च न्यायालयाचा समन्स;

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** काँग्रेसचे विधीमंडळ नेते आणि ब्रह्मपुरी विधानसभा मतदारसंघातील आमदार विजय वडेट्टीवार यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने समन्स बजावला. वडेट्टीवार यांचा नामनिर्देशन अर्ज व प्रतिज्ञापत्र आणि त्यांच्या पत्नीच्या नावाने स्टॅम्प पेपर वापरणे यासंदर्भात बेकायदेशीर काम करण्यात आल्याचा दावा करीत न्यायालयात निवडणूक याचिका दाखल करण्यात आली. ब्रह्मपुरी येथील परिवर्तन महाशक्ती संयुक्त आघाडी, प्रहार जनशक्ती पक्ष, स्वाभिमानी पक्ष, स्वतंत्र भारत पक्षाचे उमेदवार अॅड. नारायण जांभुळे यांनी ही याचिका दाखल केली.

या प्रकरणावर न्यायमूर्ती प्रवीण पाटील यांच्यासमक्ष



सुनावणी झाली. याचिकेनुसार, ब्रह्मपुरी विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसचे उमेदवार विजय वडेट्टीवार यांचा उमेदवारी अर्ज आणि शपथपत्र निवडणूक आयोगाच्या वेबसाइटवर अपलोड करण्यात आले.

वडेट्टीवार यांनी दाखल केलेल्या या प्रतिज्ञापत्रात वापरलेला स्टॅम्प पेपर त्यांच्या नावाचा नसून, त्यांच्या पत्नीच्या नावे आहे. वडेट्टीवार यांच्या पत्नीने हा स्टॅम्प पेपर 'करारनामा'साठी घेतला होता. मात्र, स्टॅम्प पेपरचा वापर नव्या अक्षरात 'प्रॉमिसरी नोट' लिहून करण्यात आला. ही घटनात्मक फसवणूक असल्याचा दावा याचिकाकर्त्याने केला.

## सुनिता विल्यम्स, बुच विल्मोर यांना 'ओव्हरटाईम'?



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अमेरिका :** नासा चे अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांनी २८६ दिवस अवकाशात घालवल्यानंतर पृथ्वीवर पुनरागमन केले, मात्र त्यांना केवळ १४३० डॉलर (सुमारे 1.18 लाख रूपये) इतकेच ओव्हरटाईम वेतन मिळाले. यावर आता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ट्रम्प यांनी स्वतःच्या खिशातून दोन्ही अंतराळवीरांना 'ओव्हरटाईम' देण्याची तयारी दर्शवली आहे.

## कोरटकरचा जामीन फेटाळला ! परदेशात पलायन?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**दिल्ली :** छत्रपती शिवाजी महाराज यांचा अवमान करणारा प्रशांत कोरटकर चां अटकपूर्व जामीन अर्ज . कोल्हापूरच्या सत्र न्यायलयाने फेटाळला आहे. न्यायालयाच्या या निर्णयानंतर त्याला कोणत्याही क्षणी अटक केली जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. असे असतानाच कोरटकरने थेट उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. त्याने सत्र न्यायालयाने दिलेल्या निकालाला आव्हान दिले आहे. दरम्यान या अटकेपासून वाचण्यासाठी कोरटकर यांनी परदेशात पलायन केल्याची चर्चा आहे. दरम्यान, कोरटकरच्या अर्जावर शुक्रवारी (21 मार्च) तातडीची सुनावणी होणार आहे.

## कलाविष्कार

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**पुणे:** नामदार चंद्रकांत पाटील यांच्या संकल्पनेतून आयोजित आणि शास्त्रीय नृत्य संवर्धन संस्था प्रस्तुत नृत्य गुरु पंडिता रोहिणी भाटे नृत्य महोत्सवाचे उद्घाटन झाले. महोत्सवात पद्मश्री आनंदा जयंत यांच्या सहकार्यांनी भरतनाट्यम् मधून शिवोहम् ही नृत्य कलाकृती सादर केली.

# मान्यवरांच्या हस्ते नृत्य महोत्सवाचे उद्घाटन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आज तरुण पिढी पाश्चात्य संगीताच्या आहारी जात आहे. त्यातून सर्वांना आनंद मिळतो असे नाही. मात्र, शास्त्रीय संगीत आणि नृत्यामधून एक वेगळाच आनंद मिळतो, अशी भावना, अशी भावना राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण आणि संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केली.

नामदार चंद्रकांतदादा पाटील यांच्या संकल्पनेतून आयोजित आणि शास्त्रीय नृत्य संवर्धन संस्था प्रस्तुत नृत्य गुरु पंडिता रोहिणी भाटे नृत्य महोत्सवाचे उद्घाटन आज झाले. यावेळी ते बोलत होते. यावेळी भाजप प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे, नृत्य गुरु



शमा भाटे, नृत्य गुरु मनिषा साठे, सुचेता चापेकर, भाजपा सरचिटणीस तथा कार्यक्रमाचे संयोजक पुनीत जोशी यांच्या सह इतर मान्यवर उपस्थित होते. या महोत्सवात ५०० पेक्षा जास्त कलाकार आपला कलाविष्कार सादर करत असून, देशातील दोन नामांकित संस्था देखील सहभागी झाल्या आहेत.

> प्रत्येकामध्ये एक कलाकार दडलेला आहे. त्यामुळे तो आज आपापल्या परीने कला सादर करत असतो. कोणी आपल्याला आवडणारे गाणं गुणगुणत असतो. तर कोणी बंद खोलीत नृत्य करतो. त्यातून एक सकारात्मक लहरी निर्माण होतात. त्यामुळे आनंद बाहेर शोधण्याऐवजी, स्वतः मध्येच शोधला पाहिजे,."
>
> **— चंद्रकांत पाटील,** उच्च व तंत्रशिक्षण आणि संसदीय कार्य मंत्री

नामदार चंद्रकांतदादा

» पान ४ वर

## शिवाजी पार्कवर धडाडणार राज ठाकरेंची तोफ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्याच्या महापालिका निवडणुकीसंदर्भात संघटनात्मक मोर्चाबांधणी सुरू केलेल्या मनसेच्या गुढीपाडवा मेळाव्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. दादरच्या शिवाजी पार्कमध्ये ३० मार्चला होणाऱ्या या मेळाव्यासाठी मुंबई महापालिका आणि पोलीस प्रशासनाची परवानगी मिळाली आहे. दसरा मेळाव्यानिमित्त शिवाजी पार्कवर राज ठाकरेंची तोफ धडाडणार आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यावेळी नेमकी कोणती भूमिका मांडणार, याकडे संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

काही दिवसांपूर्वीच मनसेच्या



१९ व्या वर्धापन दिनानिमित्त पुण्यात कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांचा मेळावा राज ठाकरे यांनी घेतला होता. या मेळाव्यात महापालिका निवडणुकीसाठी जबाबदाऱ्या वाटत त्यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन केले होते.

यंदाच्या मेळाव्याला विशेष राजकीय महत्त्व असून, महापालिका निवडणुकीपासून ते महाराष्ट्रातील सध्याच्या राजकीय घडामोडींवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे आपली भूमिका स्पष्ट करतील, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

# 'घुमंतु २५' प्रदर्शनाची पुणेकरांना पर्वणी

## प्रवास आणि फोटोंचा अनोखा संगम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** प्रवासात टिपलेले सुंदर क्षण मोबाईलमध्ये कैद करून त्याचा आस्वाद घेणे आणि इतरांसोबत शेअर करणे हा प्रत्येक भटक्याचा आनंदाचा भाग असतो. अशाच ३५ निवडक फोटोग्राफर्सच्या अप्रतिम फोटोंचा समावेश असलेल्या घुमंतु २५ - स्वान्तसुखाय छायाचित्रणाय च... या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन दि. २५ ते २७ मार्च दरम्यान बालगंधर्व कलादालन येथे होणार असून सकाळी ११ ते ८ यावेळेत रसिकांना विनामूल्य पाहता येणार आहे, अशी माहिती डॉ. रामदास महाजन यांनी पत्रकार परिषदेत दिली.




प्रदर्शनाचे उद्घाटन दि.२५ मार्च रोजी सकाळी ११ वाजता प्रदर्शनातील सहभागी फोटोग्राफर्सच्या हस्ते होणार आहे. प्रवास हा अनुभव समृद्ध करणारा असतो. कधी भव्य डोंगररांगा, कधी निळ्याशार समुद्राचे क्षितिज, तर कधी शहराच्या गजबजाटातले रंग प्रत्येक ठिकाण वेगळे दिसतात आणि त्याच्या अनमोल आठवणी. अशाच आठवणींना उजाळा देणारे

> या प्रदर्शनात ३५ निवडक फोटोग्राफर्सनी टिपलेले १०० आकर्षक फोटो प्रदर्शित केले जाणार आहेत. विशेष म्हणजे, हे फोटोग्राफर्स विविध क्षेत्रात कार्यरत असलेले डॉक्टर, इंजिनिअर्स, गृहिणी, आयटी तज्ञ, विद्यार्थी आणि वैमानिक देखील आहेत. वयवर्षे २० ते ७७ या वयोगटातील या कलाकारांनी अमेरिका ते न्यूझिलंडपर्यंतच्या त्यांच्या प्रवासातील आठवणी मोबाईल मधून टिपल्या आहेत."
>
> **— डॉ. रामदास महाजन**

• घुमंतु मालिकेतील हे तिसरे पुष्प आहे.

• सन २०२२ आणि २०२३ मध्येही अशीच प्रदर्शने आयोजित करण्यात आली होती आणि त्यांना पुणे, मुंबई, सांगली, कोल्हापूर, नागपूर, बंगळुरू, कोचीन अशा अनेक शहरांमधून उत्तम प्रतिसाद मिळाला होता.

• तरी पुणेकरांनी प्रदर्शनास आवर्जून भेट द्यावी.

आणि जगभरातील फोटोग्राफर्सच्या मोबाईलमध्ये टिपलेले अद्वितीय क्षण अनुभवण्याची संधी पुणेकरांना मिळणार आहे.

#रा



## पेहेल कार्यक्रमाचे २३ मार्च रोजी आयोजन

**पुणे :** ध्वनी अकादमीच्या वतीने येत्या रविवार दि. २३ मार्च रोजी पेहेल या सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. एरंडवणे येथील सेवा भवन सभागृहात सायं ६ वाजता सदर कार्यक्रम संपन्न होणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला असून प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर त्यासाठी प्रवेश देण्यात येईल.

## आरंभ बालक पालक मेळावा उत्साहात

**पुणे :** 'बालविकास प्रकल्प अधिकारी' (नागरी) पुणे शहर पूर्व विभागाचा आरंभ बालक पालक मेळावा हडपसर, सातववाडी येथील साईबाबा मंदिर येथे नुकताच उत्साहात पार पडला. या वेळी अंगणवाडी शिक्षिकांनी विविध शैक्षणिक प्रकल्पांचे सादरीकरण केले. मेळाव्याचे उद्‌घाटन माजी महापौर वैशाली बनकर, पुणे वृत्तपत्र विक्रेता संघाचे उपाध्यक्ष सचिन लोणकर, बालविकास प्रकल्प अधिकारी विणा भालेराव, मुख्य सेविका उर्मिला गायकवाड, जितेंद्र मैड, वंदना रिंगणमोडे, दामिनी नीमबत्ते यांनी केले. गायकवाड यांनी स्वागत केले. प्रीती जोशी यांनी प्रास्ताविक केले. मेंदूचे जाळे, भाज्यांची ओळख, पौष्टिक आहार, व्यावसायिकांची ओळख, वैज्ञानिक खेळ, स्वच्छता, गर्भवती असताना घ्यायची काळजी, बालकांचा आहार याबद्दल माहिती देण्यात आली.



## लॉजवर वेश्याव्यवसाय; मालक जेरबंद

**वाघोली :** लोणीकंद परिसरातील एका लॉजमध्ये सुरू असलेल्या वेश्याव्यवसायावर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी छापा टाकला. महिलेला वेश्याव्यवसायास प्रवृत्त केल्याप्रकरणी लॉज चालकाला अटक केली.

प्रकाश रामा शेट्टी (वय ३२, रा. लोणीकंद) असे अटक केलेल्या संशयिताचे नाव आहे. त्याच्यासह संतोष हेगडे, प्रज्योत हेगडे, ओम माने अशा चौघांवर गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे-नगर रस्त्यावरील लोणीकंद परिसरात साई लॉजमध्ये वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या युनिट चारच्या पथकाला मिळाली. त्यानुसार पोलिसांनी बुधवारी (ता. १९) रात्री लॉजवर छापा टाकला. महिलेस पैशांचे आमिष दाखवून वेश्याव्यवसायास प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक सर्जेराव कुंभार करीत आहेत.

## सीईटीसाठी अर्ज करण्यास शुक्रवारपर्यंत मुदतवाढ

**पुणे :** बीबीए, बीसीए, बीबीएम, बीएमएस, एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड या व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अनिवार्य असलेल्या सीईटीसाठी अर्ज करण्याची मुदत संपली आहे. मात्र, विद्यार्थी हिताचा विचार करून आता अर्ज करण्यास दि. २८ मार्चपर्यंत मुदत देण्यात आली आहे.

यापूर्वीही दोन वेळा मुदतवाढ दिली होती. आता तिसऱ्यांदा मुदतवाढ दिली आहे. ज्यांनी अर्ज केले; पण शुल्क भरले नाहीत, अशा विद्यार्थ्यांना अर्जाची प्रक्रिया पूर्ण करता येईल, तसेच अद्यापपर्यंत काही विद्यार्थ्यांनी अर्ज केले नाहीत, त्यांनाही अर्ज करण्याची संधी मिळणार आहे. त्यासाठीचे वेळापत्रक सीईटी सेलच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# सावधान...! पुणेकरांचा श्वास गुदमरतोय

### विकासकामे आणि मेट्रोच्या कामाचा परिणाम; आजाराचा टक्का वाढतोय





राष्ट्रसंचार EXCLUSIVE

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात सध्या हवेच्या प्रदूषणात वाढ झाली असून, वाकडसह पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत जेथे नवी बांधकामे आणि मेट्रो आणि इतर विकासकामे सुरू आहेत, तेथे हवेची गुणवत्ता घसरली आहे. या सगळ्याचा नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून, त्यावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

पुणे परिसरात अनेक ठिकाणी गृहनिर्माण प्रकल्पांची बांधकामे सुरू आहेत. त्याच वेळी मेट्रोचे कामही सुरू आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात धूळ साचते. त्यात खराब रस्त्यांमुळे निर्माण होणाऱ्या धुळीची भर पडते. धूलिकण श्वसनमार्गात गेल्याने निरोगी व्यक्तीलाही त्रास होऊ शकतो, अशी भीती वैद्यकीय तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

वाकड भागात हवा प्रदूषणामध्ये मोठी वाढ झाली आहे. या परिसरात सध्या गृहप्रकल्पांचे बांधकाम मोठ्या प्रमाणात सुरू आहे. या प्रकल्पांना काँक्रीटचा पुरवठा करण्यासाठी अनेक रेडी मिक्स काँक्रीट (आरएमसी) प्रकल्प याच परिसरात आहेत. हे प्रकल्प प्रदूषणास कारणीभूत ठरत असल्याचा आरोप आहे. वाकड परिसरातील नागरिकांनी हवा प्रदूषण कमी करण्याच्या मागणीसाठी मध्यंतरी मोर्चाही काढला.

| भाग | हवा गुणवत्ता निर्देशांक | हवेची गुणवत्ता |
|---|---|---|
| भोसरी | १२२ | मध्यम |
| भूमकरनगर वाकड | १०४ | मध्यम |
| हडपसर | १०५ | मध्यम |
| कात्रज डेअरी | ९६ | समाधानकारक |
| कर्वे रस्ता | ९२ | समाधानकारक |

### प्रदूषण मंडळाची कारवाई

- प्रदूषणाच्या तक्रारींनंतर पिंपरी-चिंचवड महापालिकेने चार प्रकल्प बंद केले. पण, हवा प्रदूषणाची समस्या कमी झालेली नाही. त्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रदूषण करणाऱ्या आरएमसी प्रकल्पांवर कारवाई करण्यास सुरुवात केली असून, आठवडाभरात दोन आरएमसी प्रकल्पांना नोटिसा बजावल्या. या प्रकल्पांच्या ठिकाणी प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्यात आलेली नाही, तसेच मंडळाने प्रकल्प चालविण्यास मंजुरी देताना घातलेल्या अटींचे पालनही न केल्याचे मंडळाने म्हटले आहे.

" बांधकाम प्रकल्पांसह मेट्रोचे काम आणि खराब रस्त्यांमुळे मोठ्या प्रमाणात धूळ निर्माण होत आहे. प्रत्येक बांधकाम प्रकल्पाच्या ठिकाणी काँक्रीट तयार करावयाचे झाल्यास तेथे वाळू आणि खडी आणावी लागेल. यातून प्रदूषणात आणखी भर पडेल. याऐवजी रेडी मिक्स काँक्रीट प्रकल्पात एकाच ठिकाणी काँक्रीट तयार होते. त्यामुळे सर्व प्रकल्पांच्या ठिकाणी होणारे प्रदूषण कमी होण्यास मदत होते. केवळ रेडी मिक्स काँक्रीट प्रकल्पांवर कारवाई करून हा प्रश्न सुटणार नाही.

**-भरत अगरवाल, अध्यक्ष,** नरेडेको, पुणे

" 'हवेतील धूलिकण श्वसनामार्गे शरीरात जातात. आधीपासून दम्यासह श्वसनविकार असलेल्या रुग्णांना यामुळे जास्त त्रास होऊन त्यांचा आजार बळावतो. त्याचबरोबर निरोगी व्यक्तींवरही हवा प्रदूषणाचे दीर्घकालीन परिणाम होतात. सततच्या हवा प्रदूषणामुळे फुफ्फुसांची कार्यक्षमता कमी होते. त्यामुळे जास्त धूळ असलेल्या भागांत राहणाऱ्या आणि तिथून प्रवास करणाऱ्या नागरिकांनी मास्कचा वापर करणे गरजेचे आहे.

**-डॉ. संजय गायकवाड,** श्वसनविकार प्रमुख, ससून सर्वोपचार रूग्णालय

" रेडी मिक्स काँक्रीट प्रकल्पांना हवा प्रदूषण केल्याप्रकरणी नोटीस बजाविण्यात येत आहे. हे प्रकल्प बंद का करू नयेत आणि त्यांचा वीज व पाणीपुरवठा बंद का करू नये, अशी विचारणा करण्यात आली आहे. या नोटिशीला उत्तर न दिल्यास कायदेशीर कारवाईचे पाऊल उचलले जाईल.

**-जगन्नाथ साळुंखे,** प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

" सध्या शहर, उपनगरासह जिल्ह्यातही श्वसन विकाराच्या रूग्णात लक्षणीय वाढ झाली आहे; ही बाब निश्चितच चिंताजनक अशीच आहे. त्यामुळे प्रदूषण कमी होणे ही काळाची गरज आहे, त्यासाठी प्रदूषण नियत्रंण मंडळाने कठोर भूमिका घेतल्यास त्यातून निश्चितच फायदा होणार आहे. विशेष म्हणजे पीएमआरडीए आणि दोन्ही महापालिकांनीही त्यासाठी सहकार्याची भूमिका घेतली पाहिजे.

**-डॉ. सिद्धार्थ धेंडे,** माजी उपमहापौर, पुणे मनपा

# 'विदेशी' मद्य; 'देशी' धिंगाणा..!


### धायरीच्या मध्यवस्तीत तळीरामांचा 'धिंगाणा'; त्रासदायक दारु दुकान बंदसाठी निवडणूक घ्या

शहर आणि परिसरातील गुन्हेगारीत वाढ झाली आहे, त्यामध्ये बहुतांशी गुन्हे हे तळीरामांमुळेच होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे शांत आणि संयमी समजल्या जात असलेल्या पुणे शहरात रस्त्यावर उभे राहून अथवा दुचाकीवर थाटात बसून दारु पित असलेल्या तरुणांची 'कुंडली' पोलीसांना माहिती आहे, त्याशिवाय अशा मद्य विक्रीच्या दुकानांची यादीही पोलीसांकडे आहे. परंतु लाचखोर पोलीस यंत्रणा त्याकडे जाणुनबुजुन दुर्लक्ष करत आहे, त्यामुळे महिला आणि तरुणींची छेड काढत 'विदेशी' मध्य प्राशन करुन तरुणांचा 'धिंगाणा' सुरु आहे. ही बाब लक्षात घेऊन ही परिस्थिती हाताबाहेर जाण्याच्या आधी पोलीस यंत्रणेने सतर्क त्यांच्या मुसक्या आवळण्याची आवश्यकता आहे.



" यासंदर्भात विविध भागातील नागरिकांनी पोलीस प्रशासनाकडे तक्रारी केल्या आहेत, त्याशिवाय अनेक नागरिकांचे कंट्रोल रूमलाही फोन येत असतात. त्यामुळे पोलीसांनी आता ही बाब गांभीर्याने घेतली आहे; त्यानुसार अशा दुकानदारांवर कडक कारवाई करण्याच्या सूचना सर्व पोलीस ठाण्यांना देण्यात आल्या आहेत.

**-मनोज पाटील,** अप्पर पोलीस आयुक्त, पुणे शहर



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सिंहगड रस्त्यावरील दिड लाख लोकसंख्येच्या धायरी येथील मध्यवस्तीतील त्रासदायक दारु दुकान बंद करण्यासाठी शासनाच्या आदेशानुसार निवडणूक घेण्यात यावी अशी मागणी स्थानिक रहिवाशांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

या बाबत आम आदमी पक्षाचे शहराध्यक्ष धनंजय बेनकर व धायरी च्या नागरिकांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.

आम आदमी पक्षाचे शहराध्यक्ष धनंजय बेनकर म्हणाले, धायरीतील मुख्य उंबऱ्या गणपती चौकात पारी कंपनी रोडला अनुकिरण वाईन्स व जे.बी. बिअर शॉपी अशी दोन दारु विक्रीची दुकाने आहेत .

या दुकानांत दारु विक्री सुरू असताना रस्त्यावर व चौकात सायंकाळ पासून रात्री उशिरापर्यंत दारुड्यांचा अक्षरक्षः हैदास सुऊअसतो. दुकानांसमोर रस्त्यावर दारुडे आडवी तिडवी गाड्या लावतात त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या गंभीर झाली आहे.

नागरिकांनी विचारणा केल्यास दारुडे दमदाटी, मारहाण , शिवीगाळ करतात त्यामुळे याठिकाणी दहशतीचे वातावरण आहे . महिलांना येथुन ये- जा करणे धोकादायक झाले आहे.

दुकाना समोर दारुडे दारु पिऊन रस्त्यावर बाटल्या फोडून काचेचा खच करतात. दारु पिल्यानंतर रस्त्यावरच लघुशंका करतात त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर निर्माण झालेला आहे. या प्रकरणी पोलिस व उत्पादन शुल्क विभाग तसेच पुणे महानगरपालिका आरोग्य विभागाकडे तीन चार ३-४ वर्षापासुन तक्रारी करून नागरिक वैतागले आहेत.


सर्व विभाग सदर दुकानांकडून हप्ते घेऊन डोळेझाक करतात अशी चर्चा सुरू आहे. याचा नागरिकांना प्रचंड मनस्ताप होत आहे.

### असा होतोय नागरिक आणि महिलांना त्रास

- दुकानाच्या बाहेरच सर्रासपणे मद्य प्राशन
- रस्त्यावरच अंडा भुर्जी आणि खाद्य पदार्थांच्या गाड्या
- वाहतूकीला ठरतोय अडथळा
- दारुच्या आणि पाण्याच्या बाटल्यांचा साचतोय खच
- काही तळीरामांचा फूटपाथवरच मुक्काम
- तरुणी आणि महिलांची काढली जातेय छेड
- दारू दुकानदार देताहेत बिनधास्त अभय

# गत दहा वर्षांच्या तुलनेत यंदा मुबलक पाणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** गेल्या दहा वर्षांच्या जलसाठ्याच्या सरासरीचा अंदाज घेतला तर असे लक्षात येते की, यंदा ८० टक्क्यांपेक्षा जास्त स्थिती चांगली आहे. जलसाठा असलेल्या जिल्ह्यांसह प्रकल्पांचे राज्यनिहाय वितरण सुधारले आहे. त्यामुळे उन्हाळ्यात होणारी भीषण पाणीटंचाई सुमारे २५ ते ३० टक्क्यांनी कमी झाली आहे. याचे मुख्य कारण साठवणुकीच्या नियोजनात केलेले बदल हे आहे. जलसाठ्यातून होणारी पाणीगळती कमी केल्यानेही हा मोठा फायदा झाल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले.

देशात यंदाचा उन्हाळा मागील वर्षाच्या तुलनेत सुसह्य ठरणार आहे. कारण, देशभरातील मोठ्या १५५ जलसाठ्यांत ७० टक्के जिवंत पाणीसाठा शिल्लक आहे. महाराष्ट्रात मात्र बाष्पीभवन वेगाने होत असल्यामुळे हा साठा ५१ टक्के इतकाच आहे. त्यामुळे राज्यात पाणी जपून वापरावे लागणार आहे.

२२ मार्च हा जागतिक जल दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त जगभरातील पाणीसाठ्याचा लेखाजोखा तसेच पाण्याची उपलब्धता, यावर जगभरातील जलतज्ज्ञ एकत्र येऊन आपले विचार मांडतात. दिवसेंदिवस पिण्याच्या पाण्याची कमतरता, हवामानातील बदल, याच्या परिणामामुळे पिण्याचे पाणी कमी होत आहे. या पार्श्वभूमीवर देशभरातील पाणीसाठ्यासह महाराष्ट्राचा आढावा घेतला असता 20 मार्चपर्यंत देशातील मोठ्या १५५ जलसाठ्यांची स्थिती खूप चांगली आहे. देशाच्या मोठ्या जलसाठ्यांमध्ये किमान 70 टक्के पाणी शिल्लक आहे, तर महाराष्ट्रात ५१ टक्के पाणी पिण्यायोग्य शिल्लक आहे. अजून एप्रिल आणि मे महिना जायचा आहे. त्यामुळे यंदा पाणी जपून वापरावे लागणार आहे.

केंद्रीय जल आयोग १५५ जलाशयांच्या जिवंत साठवणुकीच्या स्थितीचे निरीक्षण दर आठड्याला गुरुवारी करत आहे. जलसाठ्याचे साप्ताहिक बुलेटीन जारी करत आहे. १५५ जलाशयांमध्ये २५७.८१२ बिलियन क्युबिक मीटर (अब्ज घन मीटर) इतका जिवंत पाणीसाठा आहे. त्याची टक्केवारी ७०.१५ टक्के इतकी आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची समता सर्वस्पर्शी व सर्वव्यापी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे संघर्षशील जीवन आणि समाज चिंतन अभ्यासायचे असेल तर त्यांनी लिहिलेले साहित्यच मूळातूनच वाचले पाहिजे. आपला समाज अराष्ट्रीय होणार नाही, याची पूर्ण काळजी डॉ.बाबासाहेबांनी घेतली होती. म्हणूनच आंबेडकरवाद मानणारा हा समाज जोडणाराच असला पाहिजे. त्यांनी माथी भडकवणाऱ्यांपासून सावध राहिले पाहिजे. आजच्या आंदोलनजिवींनी चवदार तळे सत्याग्रहाचा आदर्श घेऊन विधायकता जपावी, असे आवाहन करत डॉ बाबासाहेब आंबेडकरांची समता सर्वस्पर्शी व सर्वव्यापी होते, असे प्रतिपादन आंबेडकरी चळवळीतील अभ्यासक ॲड. क्षितिज गायकवाड यांनी केले.

चवदार तळे सत्याग्रहाच्या ९८ व्या क्रांतीदिनानिमित्त सामाजिक समतेचा लढा या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासन, विवेक विचार मंच, डॉ.आनंद यादव अभ्यास मंडळ व साने गुरुजी तरुण मंडळ आदी संस्थांच्या वतीने झालेल्या कार्यक्रमात विद्यापीठाचे प्रकुलगुरु डॉ.पराग काळकर, विवेक विचार मंचाचे अध्यक्ष श्री.प्रदीपदादा रावत, ज्येष्ठ विधीज्ञ प्रशांत यादव, ओम स्वामी मल्हार चे डॉ. गौरव घोडे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ.धोंडीराम पवार व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासनाचे प्रमुख डॉ.सुनील भंडगे उपस्थित होते. यावेळी माजी खासदार व विवेक विचार मंचाचे अध्यक्ष प्रदीप रावत म्हणाले, "डॉ.बाबासाहेब प्रोटेस्टंट हिंदू स्वतःला म्हणायचे. समाजाचं मन बदलल्याशिवाय समाज बदलणार नाही. डॉ . आंबेडकरांनी मूलभूत पातळीवर विचार करत माणुसकीला जागं करत समाजाचं आत्मभान जागृत केलं. ज्यांची गावकी एक आहे त्यांची भावकी एक झाली पाहिजे. चवदार तळे सत्याग्रहातून समाजाला खडबडून जागं करण्याचं महत्वपूर्ण कार्य त्यांनी केले."

याप्रसंगी संत नामदेव अध्यासनाचे प्रमुख डॉ.श्यामा घोणसे, लोकमान्य टिळक अध्यासनाचे प्रमुख प्राचार्य डॉ दिलीप शेठ, शाहीरा वीणा अवघडे, प्रा.विजय दरेकर, डॉ.कुंडलिक पारधी, ॲड.प्रसाद सुर्वे, सचिन साठ्ये, आकाश भांगरे, अनिल पारशे इ. विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यासन प्रमुख डॉ.सुनील भंडगे, आभार प्रदर्शन डॉ.सुधाकर हिरे यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ.बाबासाहेब गव्हाणे यांनी केले.



# कलाकारांना गाण्याआधी शंभरवेळा रियाज करावा लागतो -शेखर सेन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बाराखडीमध्ये वर्ण आणि अक्षरे असतात. जे क्षर होत नाहीत, नष्ट होत नाहीत ते म्हणजे अक्षर आहे. जेव्हा तुम्ही काही गाता तेव्हा रसिक प्रेक्षक ते कधीच विसरत नाही. इथेच कलाकाराची जबाबदारी वाढते. त्यामुळे आम्हाला बोलण्याआधी दहा वेळा तर गाण्याआधी शंभर वेळा विचार करावा लागतो, असे प्रतिपादन प्रसिद्ध गायक, संगीतकार, अभिनेते आणि आपल्या एकपात्री प्रयोगांसाठी प्रसिद्ध असलेले पद्मश्री शेखर सेन यांनी केले.

आपला परिसर आणि तरंगिणी सांस्कृतिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १९ व्या पंडित जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवामध्ये यावर्षी शेखर सेन यांचा माजी केंद्रीय पर्यावरण मंत्री प्रकाश जावडेकर यांच्या हस्ते प्रदीर्घ कलासेवेकरीता पं. जितेंद्र अभिषेकी पुरस्काराने सन्मान करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. याबरोबरच आज महोत्सवामध्ये अमेरिकेत शास्त्रीय संगीताचा प्रचार व प्रसार करण्यात महत्त्वाची भूमिका निभावणारे आयोजक राजेश गोडबोले यांचा यशस्वी संयोजक पुरस्काराने सन्मान करण्यात आला. गोडबोले यांच्या वतीने त्यांच्या भगिनी सुमेधा वझे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

माजी केंद्रीय पर्यावरण मंत्री प्रकाश जावडेकर यांसोबतच पं जितेंद्र अभिषेकी यांचे सुपुत्र आणि शिष्य पं शौनक अभिषेकी, आपला परिसरचे उज्ज्वल केसकर, प्रवीण बढेकर, पं. हेमंत पेंडसे, सुमेधा वझे, डॉ. संदीप पुटाला, विद्येश रामदासी, अंकुश भगत आणि महेश पानसे आदी मान्यवर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते. उद्या शनिवार दि. २२ आणि रविवार दि. २३ मार्च रोजी सकाळी ९ ते १२ आणि सायं ५ ते १० अशा चार सत्रांमध्ये महोत्सव सर्वांसाठी विनामूल्य खुला असणार आहे.

पं. शौनक अभिषेकी यांनी 'काटा रुते कुणाला...'चे सादरीकरण केले. याबरोबरच कवयित्री शांता शेळके यांच्या कविता देखील सादर झाल्या. यावेळी आदित्य ओक (तबला), राजेंद्र नूरकर (ढोलकी) आणि रितेश ओहोळ (गिटार) या कलाकारांनी साथसंगत केली.



" "संगीतात जबरदस्त ताकद आहे असे मला वाटते. संगीत माणसाला दुःखाच्या प्रसंगी सकारात्मक उर्जा देते. काम करिता असताना मागे जर गाणे अथवा वादयाच्या सुरावटी सुरु असतील तर 'वर्क इफिशियन्सी' १५ ते २० टक्के वाढते असे संशोधन सांगते..

**— प्रकाश जावडेकर,** माजी केंद्रिय मंत्री

## भावार्थ

**कराविव शरीरस्य नेत्रयोरिव पक्ष्मणी। अविचार्य प्रियं कुर्यात्तन्मित्रं मित्रमुच्यते।।**

हात शरीरासाठी आणि पापण्या डोळ्यांसाठी कसलाही विचार न करता प्रिय कृती करतात, त्याप्रमाणे मित्रासाठी उत्स्फूर्तपणे कृती करणारा मित्र हा खरा मित्र, असं म्हणतात.

**धन्यो धन्वन्तरिर्नात्र चरकश्चरतीह न। नासत्यावपि ना सत्यावत्र चिन्ताज्वरे किल।**

चिंतारूपी ज्वर निर्माण झाला असेल तर तो दूर करण्याच्या बाबतीत धन्वंतरी यशस्वी होत नाही, चरकाचे काही चालत नाही आणि अश्विनीकुमारही उपयोगी पडत नाहीत.

**तस्मात्प्रागेव रोगेभ्यो रोगेषु तरुणेषु वा। भेषजं प्रतिकुर्वीत य इच्छेत्सुखमात्मन:।।**

आपल्या सुखाची इच्छा करणाऱ्याने रोग होण्यापूर्वी किंवा रोगांचा जोर वाढण्यापूर्वी औषधोपचार करावा.

# रंगीबेरंगी सौंदर्य ग्रीष्माचं

**ऋतूचक्र नेहमीच्या गतीत फिरत असतं. सहा ऋतूंमध्ये विभागलेला एका वर्षाचा काळ बघता बघता निघून जातो. वर्षाची अखेर येऊन ठेपते. याच काळात अवतरतो तो ग्रीष्म. सगळीकडे काहिली माजवणारा, वातावरणात उन्हाची पेरणी करणारा, उकाड्याचं साम्राज्य पसरवणारा... एकीकडे या दिवसातली शुष्कता नकोशी वाटते तर दुसरीकडे रानोमाळ बहरणाऱ्या रानमेव्याची भुरळ पडते. निसर्गभक्तीची जागी करणाऱ्या ग्रीष्माविषयी...**





भक्ती विशेष

माणसाला कशातच समाधान सापडत नाही हेच खरं... त्याला रिमझिम पाऊस हवा असतो पण, नंतर तीच रिमझिम त्याला कंटाळवाणी रिपरिप वाटू लागते. तीच बाब थंडीची... ऋतूच्या आरंभीची आल्हाददायक वाटणारी थंडी अंथरुणाबाहेर डोकं काढू देईनाशी होते तेव्हा मात्र कंटाळवाणी, आळस वाढवणारी वाटू लागते. ग्रीष्माची तर बातच वेगळी. हा तर अनेकांना जाचणारा ऋतू. सगळीकडे उन्हाचे कुंभ धडधडू लागतात. तप्त ज्वाळांसारख्या हवेचे लपापते झोत अंग भाजून काढू लागतात. या अग्निकुंडाच्या धगीने जमिनीवरील आणि जमिनीखालील पाण्याचे स्त्रोतही आटतात. सगळीकडे पाण्याचं दुर्भिक्ष्य जाणवू लागतं. पाखरं दाण्याला आणि जनावरं हिरव्या चाऱ्याला महाग होतात. त्याच वेळी वसंताचं आगमन झाल्यामुळे फुलाफळांचा बहर असतो, नवपालवीचे धुमारे फुलतात. शरीराला थंडावा देणाऱ्या फळांचे हारे बाजारात सजू लागतात. सुगंधी फुलांचे घोस वेलींच्या पानांआडून हसू लागतात. हे सगळे वातावरणात चैतन्य निर्माण करणारे घटक असले तरी वाढता उष्मा आणि त्यामुळे होणारी अंगाची काहिली मात्र अगदी नकोशी होऊन जाते. म्हणूनच ग्रीष्माचं स्वागत करणाऱ्यांपेक्षा त्याला नाकं मुरडणाऱ्यांची संख्याच जास्त असते. अर्थात कोणी कितीही नाकं मुरडली तरी ऋतूचक्र थांबत नसतं. थांबणार नसतं. नित्याच्या वेळापत्रकाप्रमाणे त्यांचं जाणं-येणं सुरू राहणार असतं. याच न्यायाप्रमाणे आता ग्रीष्म अवतरला आहे. त्याच्या काही नकारात्मक बाबी असल्या तरी सकारात्मकता घेऊन येणारा हा ऋतू आहे हे कोणीही नाकारणार नाही.

या तप्त वातावरणातदेखील दृष्टीला सुखावणारा नजारा फुलत असतो. निसर्गाच्या मोहक पटलावर रंगांच्या लडी फुलवणारे निरनिराळे वृक्ष बहरत असतात. अंगणात फुललेला गुलमोहर पाहून ङ्गअंगणी गुलमोहर फुलला...फ्सारख्या ओळी हलकेच ओठांवर येत असतात. किती सुंदर डेरेदार दिसतो गुलमोहर... म्हणूनच त्याच्या सावलीत बसून दुपारच्या निवांत वेळी सुखदु:खांची देवाण-घेवाण करणं प्रेमीजनांना आवडत असावं! गुलमोहराच्या झाडाखाली फुललेल्या अनेक प्रेमकथा मनाला सुखावतात अन् विरहकथा व्याकूळ करतात. म्हणूनच या गुलमोहराशी प्रेमीजनांचं, कथालेखकांचं अन् वाचकांचं हळवं नातं निर्माण झालंय! किती तरी उत्कट प्रेमकथा अन् कवितांमध्ये गुलमोहर प्रमुख भूमिकेत दिसतो. गुलमोहराच्या झाडाचं सौंदर्यच अनुपम आहे. या रक्तवर्णीय झाडावरुन नजर हटत नाही. झाडाची सर्वच पानं हळूहळू गळून पडतात अन् शेंड्यावर मोठ्ठी लालभडक फुलं उमलतात! लहान मुलं चित्रांच्या वहीत ङ्गफुलाचं झाडफ असं नाव देऊन झाडांचं चित्र काढतात. उंचच उंच झाडावर मोठ्या गोलाकार फुलांनी फुललेला गुलमोहर पाहून कोणी तरी लालभडक गालीचा अंथरलाय, असं वाटतं. अशा फुललेल्या झाडाकडे बघून एक छोटी मुलगी म्हणाली होती, ती बघ देवबाप्पाची लालचुटूक छत्री! आपल्याला सावली देण्यासाठी मांडून ठेवलीये! उन्हाळ्यात प्रवास करण्याची वेळ आलीच तर रानमाळावर जागोजाग फुललेल्या या लालेलाल छत्र्या डोळ्यांना सुखावतात.

गुलमोहराबरोबरच उन्हाळ्यात तनामनाला सुखावण्यासाठी सृष्टीकर्ता अनेक प्रकारचे नजराणे पाठवत असतो. या दिवसात पळस फुलतो. बहाव्याचे घोस रस्त्यावर सडा घालतात. एप्रिलच्या झाडाची गर्द जांभळी फुलं हलकेच तरुतळाशी झेप घेतात. दारातल्या मधुमालतीवर बहर असतो आणि उन्हाळ्यातल्या मोगऱ्याच्या गजऱ्याचा नखरा तर अतुलनीय! पांढ्याशुभ्र मोगऱ्याचा मंद सुगंध मनात भरून उरतो. तशीच जागोजागी दिसणारी उसाची गुऱ्हाळं! गुऱ्हाळातल्या उसाच्या रसाची मधूर चव जीभेला थंडावा देते, तृष्णा शमवते. उन्हाळ्यात वेलीवर फुललेला पांढराशुभ्र मोगरा पाहून मन प्रसन्न होतंच पण वेलीखाली पहाटे पडलेला पांढरा सडा, मोती ओघळून पसरल्यासारखा दिसतो. हा शुभ्र मोगऱ्याचा गजरा पसंत न करणारी स्त्री बघायला मिळणार नाही. असा एखादा मोगऱ्याचा गजरा कुठल्याही स्त्रीच्या पुढे केला की, त्या फुलाइतकीच टवटवी तिच्याही चेहऱ्यावर दिसते. असंही म्हणतात की, ज्याप्रमाणे हसणारा माणूस कसाही असला तरी सुंदर दिसतो त्याचप्रमाणे फुलांचा गजरा केसात माळणारी स्त्री देखणीच दिसते. फुलांच्या नाजूकपणाचं, कोमलतेचं आणि स्त्रीच्या स्वभावधर्मातलं हे साधर्म्य यांचा मेळ पाहणाऱ्याला लोभस दिसतो! उन्हाळ्यात मोगऱ्याचा गंध भरभरुन घेता येतो. कुठलाही कार्यक्रम असो, सणसमारंभ असो, या ऋतूमध्ये गजरे देऊन स्त्रियांचं स्वागत केलं जातं.

या दिवसात सगळीकडे वणवा पेटलेला असतो हे नक्की पण हा ताप सुसह्य करणारी ऊसाच्या रसाची गुऱ्हाळंही सज्ज असतात. भर उन्हातून चालत आल्यावर कडेला उंचच उंच हिरव्यागार पानांचे तुरे ल्यायलेल्या उसाच्या कांड्या मिरवणारं, गार सावलीत बाकडं टाकून सजवलेलं एखादं गुऱ्हाळ दिसलं की त्या ताज्या रसाचा सुवास खेचून घेतो. गार सावलीत बसल्यावर रसाचा पहिला घोट तहानलेल्या घशात गेला की असा काही थंडावा मिळतो की वा! अरे, अमृताचा घोट यापेक्षा काय वेगळा असावा, असंच वाटून जातं. हे अमृत पिण्याची मजा फक्त उन्हाळ्यातच अनुभवता येते.

उन्हाळ्यात सुट्ट्यांचा आनंद लुटता येतो. बाहेर उष्णता असली तरी सृष्टीचा नजारा अनुभवता येतो. भर उन्हात काळ्याभोर रस्त्यावरून जाताना दूरवर नजर गेली की रस्त्यावर पाण्याचं छोटं तळं असल्यासारखं भासतं. पण आपण तिथपर्यंत पोहोचलो की ते तळं आणखी पुढे पुढे जात राहतं. हेच तर मृगजळ असतं. बिचारं हरीण मृगजळामागे धावत असतं म्हणे. बरोबरच आहे, आपल्यासारख्या माणसांची फसगत होते तिथे बिचारी हरणं फसली तर नवल नाही.

उन्हाळ्यातल्या सुट्टीचा काळ सर्वांनाच आवडतो. परीक्षेच्या काळात सर्वत्र गंभीर शांतता जाणवते. विद्येची पूजा करणारे विद्यार्थी मान खाली घालून अभ्यास करताना दिसतात. कलिंगड, द्राक्षं यांच्यासारखी सुमधूर गारवा देणारी फळं विद्यार्थ्यांना अभ्यास करायला, स्मरणशक्ती वाढवायला मदत करतात. खरं तर आंबा येण्यापूर्वी बाकी सर्वच फळांची बाजारात भरपूर आवक असते. त्याची मौज भरपेट लुटता येते. वर्षातील प्रत्येक काळाचं सौंदर्य वेगळं असतं. गरज असते ते शोधण्याची आणि आस्वाद घेण्याची...

# असंच घर मिळो...



भक्ती बोध

घराच्या स्वच्छतेचं काम हाती घेतलं होतं. माळ्याच्या वरची सफाई करत असताना एका कोपऱ्यात गवताच्या काड्यांनी विणलेलं छोटं घरटं हाती लागलं. रिकामच होतं ते. बहुदा अर्धवट असावं. गवताच्या काड्या, कापसाचे पुंजके एकत्र करून घरटं तयार करण्याचा प्रयत्न चालला असावा बहुदा चिमणा-चिमणीचा. मग ते अर्धवट का सोडलं असावं? असो..

माणसाला समज येण्याच्या आधीपासून तो कुठे तरी रहात होता. कुठे तरी म्हणजे कधी झाडाच्या फांदीवर, कुठे दगडाच्या कपारीत, कधी छोट्याशा गुहेत, कधी डोंगरमाथ्यावर झोपडी बांधून. अशी एक ना अनेक ठिकाणं माणसानं राहण्यासाठी तयार केली. त्याचं राहणं म्हणजे ऊन, वारा, पाऊस यापासून सरंक्षण मिळावं एवढ्यासाठीच.. अलिकडच्या काळात माणसाच्या राहण्याच्या ठिकाणांचं स्वरुप आमुलाग्र बदललं. तो राहु लागला घरात. आपल्या हक्काची माणसं जिथं राहतात ते घर. जिथे आपल्याला कशाचीही चिंता सतावत नाही ते घरं. जिथे आपलेपणाची जाणीव प्रखर असते ते घर. जिथे असतो नात्यातला ओलावा, जिथे असतं जपणारं हळवेपण.. जिथे असतात घरपण टिकवणारे नात्यांचे बंध. घर असतं मातीचं, घर असतं पत्र्याचं, घर असतं पाचट टाकून तयार केलेलं, घर असतं कुडाच्या भिंतींच, घर असतं सिमेंटच्या घट्ट भितींनी तयार झालेलं.

घरांचे प्रकार तरी किती असावेत.. असंच सहज गंमत म्हणून शोधण्याचा प्रयत्न केला; अर्थात गुगुलवर. तर तिथे पहिल्या क्षणाला जवळपास सहा दशलक्षांहून अधिक पानांची नोंद सापडली. अर्थात त्यात घरांच्या रचना, मांडणी, डिझाईन, प्रकार यापासून आधुनिक गॅझेटने सज्ज असलेल्या घरांची माहिती उपलब्ध आहे. पक्ष्यांची घरटी हा खरोखरच अभ्यासाचा विषय, त्यावर अनेकांनी केलेला अभ्यास उपलब्ध आहे. तरीदेखील त्यातील नावीन्य संपत नाही. चिमणीचं घरटं मेणाचं, काऊचं शेणाचं... बालपणापासून आपण ऐकत आलेलो... प्रत्यक्षात काड्यांचा वापर करून कावळ्याचं घरटं तयार होतं, चिमणीचं घरट असतं गवताच्या मऊ काड्यांपासून. काही पक्षी उंच झाडांवर घरटी बांधतात. सुगरणीच्या घरट्याची भुरळ आपणा साऱ्यांना पडलेली आहेच. इतकी की सुगरणीच्या खोप्यावर बहिणाबाईंनी अजरामर काव्य रचलेलं...

अलिकडच्या काळात घरं श्रीमंत झालीत पण माणसांच काय झालं? एक छानसं वाक्य नुकतंच वाचनात आलं ते असं होतं, घरपण टिकवायचं असेल तर दारात कुत्रा नको, अंगणात तुळस हवी. हातात मोबाईल नको पुस्तक हवं आणि घरात झुंबर नसलं तरी चालेल पण मंद प्रकाश देणारी समई हवीफ किती समर्पक आणि छान अर्थासह मांडणी केलीय ना... आपणा साऱ्यांना अगदी असंच घर मिळो.

# कसा सोडवायचा गुंता ?

स्वमदत

आम्ही रहायचो त्या कॉलनीत एक भलं मोठं आब्याचं झाड होतं, अजुनही आहे. दुपारच्या वेळी या झाडाच्या सावलीत खेळताना अजिबात ऊन लागत नव्हतं. दुपारी सावलीत खाट टाकली की आम्ही सारी मुलं तिथे बसून खेळत असू. कधी कधी अभ्यासही करत असू. आमच्या कॉलनीत एक आजी रहायची. वय असेल सत्तरीला भिडलेलं. आम्ही मुलं दुपारी सावलीत येऊन बसलो की ती देखील येऊन आमच्याशी गप्पा मारायची. गोष्ट सांगण्याची तिची लकब खुपच छान होती. ती सांगत असताना गोष्टीचं चित्र हुबेहूब डोळ्यासमोर उभं रहायचं. आमच्याकडे येताना ती एकमेकांमध्ये गुंतलेला दोरा हातात घेऊन यायची. तेव्हा किराणा कागदाच्या पुड्यात दोऱ्याने बांधून दिला जायचा. पुड्यांना बांधलेला हा दोरा गोळा करून ठेवला जाई. मग त्याला सुटा करून गाठ मारून गोधडी शिवण्यासाठी वापरला जाई किंवा पतंग उडवण्यासाठी तरी वापरला जात असे. तर ही आजी असा एकमेकात गुंतलेला दोरा घेऊन यायची. आम्हाला गोष्ट सांगायची आणि दोऱ्याचा गुंतादेखील सोडवायची. गुंता सोडवायची तिची लकब खुपच भारी होती. कसाही गुंता असला की ती क्षणात सोडवायची. तिच्याबरोबर आम्हीदेखील काही वेळा दोऱ्याचा गुंता



सोडवायचा प्रयत्न करायचो पण दोरा सुटा होण्याऐवजी गुंताच अधिक वाढे, कदाचित अनुभवाची शिदोरी कमी पडत असावी.

आज अनुभव आहे, शिक्षण आहे, सारे काही आहे; गुंता मात्र वाढत चाललाय आपल्या अवतीभवती. आपण जितका गुंता सोडवायचा प्रयत्न करतो, तितका तो वाढत जातो. गुंता कशाचा आहे? गुंता मोहाचा आहे. मोह कशाचा, तर मला अधिकाधिक कसं मिळेल, त्याच्यापेक्षा मी जास्त कसं कमावेन याचा. एकापेक्षा अधिक मोहाचे क्षण, जितके मोहाचे क्षण अधिक तितका गुंता वाढणार. बरं, एकातून सुटलं की दुसऱ्यात अडकत जातो आपण सारे. आपला गुंता सोडवणारी आजी आपल्याजवळ नाही, हे मात्र खरं. आपला गुंता आपल्यालाच सोडवावा लागणार हे जाणून घेतलं पाहिजे. पण ही जाणीव आपल्याला लवकर होत नाही. मुळात गुंत्यात अडकलोय हे देखील आपल्या लक्षात येत नाही, तेव्हा त्यातून बाहेर पडण्याचा विषयच निराळा.

आपल्या प्रत्येकाच्या भोवती कशाचा ना कशाचा गुंता झालाय. कशाचा तो ज्याने त्याने ओळखायचा आहे. स्वत:कडे थोडंसं तटस्थपणे पहावं लागेल. आरशात जसं प्रतिबिंब पाहतो ना तसंच पहावं लागेल. थोडंसं आतही, मनात डोकवावं लागेल. चिंतनात डुंबावं लागेल. तेव्हाच सुटू शकेल हा गुंता. नाही तर आहेच.. गुंता आणि पुन्हा गुंता!

# नरदेही आलीयां येक ।

दासबोधातून...

**भ**गवद्भक्ति हे उत्तम। त्याही वरी सत्समागम। काळ सार्थक हाचि परम। लाभ जाणावा।।

नरदेही आलिया येक। काही करावे सार्थक। जेणें पाविजे परलोक। परम दुल्लभ जो।।

जन्मा आलियाचे फळ। काही करावे सफळ। ऐंसे न करिता निर्फळ। भूमिभार होये।।

नरदेहाचे उचित। कांही करावे आत्महित। यथानुशक्त्या चित्तवित्त। सर्वोत्तमी लावावे।।

आपल्या पुराणांमधून ८४ लक्ष प्रकारचे जीव जगात वास करत असतात असा उल्लेख आढळतो. या प्रकारांपैकी एक म्हणजे मनुष्यजन्म होय. त्यामुळे श्रीसमर्थ म्हणतात की मोठ्या पुर्वपुण्याईने आणि भगवंताच्या कृपेनेच मनुष्यजन्म प्राप्त होतो आणि त्यातही त्या माणसाचा भाग्ययोग असला तरच तो सन्मार्गाला लागतो. स्नान, संध्या, भगवंताचं स्मरण आणि सद्वासना, पूर्वजन्मांची पुण्यकर्मं आणि मानवजन्मात आल्यानंतरचं विवेकी वागणं यामुळेच मोक्ष प्राप्त होतो. मनुष्यजन्म सार्थकी लावून ऐहीक जीवन संपल्यानंतर जन्म-मरणाच्या फेऱ्यातून सुटका होऊन तो मोक्ष मिळावा हे प्रत्येकाने आपल्या आयुष्याचं ध्येय ठेवलं पाहिजे. त्यासाठी जी साधनं सांगितली आहेत त्यामध्ये सर्व प्राणिमात्रांशी दयाभाव, प्रेमभाव आणि सद्भाव ठेवून वागणं, भगवंताची अनन्यभावे भजन, पूजन, कीर्तन अशा मार्गाने भक्ती करणं महत्त्वाचं आहे. पूर्वपापांचा नाश होण्यासाठी दानधर्म तीर्थाटन, देवदर्शन आणि संतांचं मार्गदर्शन उपयोगी पडतं.



आपल्या शास्त्रांनी भगवंताच्या भक्तीचे नऊ मार्ग सांगितले आहेत. त्यालाच नवविधा भक्ती म्हणतात. श्रवण, कीर्तन, स्मरण पादसेवन, पूजन, वंदन, दास्यभक्ती, सख्यभक्ती हे आठ प्रकार व शेवटची आणि सर्वात उच्च कोटीची नववी भक्ती म्हणजे आत्मनिवेदन होय. आत्मनिवेदन म्हणजे परमेश्वराशी एकरुप होणं अवस्थेत पोचल्यानंतर भक्त वेगळेपणाने उरतच नाही; तो स्वत:च भगवंत होऊन जातो. संत कबिरांचा एक प्रसिद्ध दोहा आहे. त्यात ते म्हणतात, मी तुला म्हणजे भगवंताला शोधण्यासाठी भक्ती करत राहिलो आणि तू मला प्राप्त झालास तेव्हा माझ्यातला ङ्गमीङ्घच नाहिसा झाला. शोधणाऱ्याला भगवंत मिळाला आणि शोधणारा त्या भगवंतातच विलीन झाला. त्यांचं वेगळेपण संपून गेलं. ही भक्तीची परमावस्था आहे. ती साध्य करणं हे आपण आपल्या जीवनाचं ध्येय ठेवलं पाहिजे. त्या ध्येयाप्रत जाण्यासाठी संतसंगती अपूर्व काम करणारी आहे. त्याबरोबरच योग्य मार्गाने मिळालेली संपत्ती हे देवाचं देणं आहे असं समजून तो पैसा आणि आपलं अंत:करण शक्य तेवढं सन्मार्गाला लावावं असंही श्रीसमर्थ बजावतात.

# दैनंदिन ज्ञानेश्वरी

जाणून घ्या

**हें जीवीचे निज गुज । परी केंवी राखों तुज ।**
**जें पढीयेसी तू मज । म्हणोनियां ।। ४.२८ ।।**

ज्ञानेश्वरीमधून अनेक जीवनकर्मांवर भाष्य करण्यात आलं आहे. वरील श्लोकामधून एक कालतीत सत्य मांडण्यात आलं आहे. हा योग म्हणजे माझ्या जीवनातील अत्यंत गुप्त बाब आहे; पण तुझ्यापासून तो कसा लपवून ठेवू? कारण तू माझा अगदी लाडका आहेस.



* भगवंत म्हणतात, हे अर्जुना, हा निष्काम कर्मयोग मी तुला सांगितला आहे. हा योग म्हणजे माझ्या जीवनातील अत्यंत गुप्त बाब आहे. तू माझा अत्यंत लाडका आहेस मग हा मी कसा बरं लपवून ठेवू?

* अर्जुना, तू म्हणजे प्रेमाचा पुतळा आहेस. भक्तीचा जिव्हाळा आहेस. मित्रतेची जीवनकला आहेस. तुझा आणि माझा संबंध विश्वासाचा आणि जवळचा आहे. युद्धप्रसंगी मी तुझी फसवणूक कशी बरं करेन?

* अर्जुन हा भगवंताचा परमभक्त आणि प्रिय सखा असल्यामुळेच भगवंतांनी अर्जुनाला निष्काम कर्मयोग सांगितला आहे. कर्मयोगाचं प्राचीनत्व त्याला पटवून दिलं. आचार हेच धर्माचं अधिष्ठान आहे असं त्याला सांगितलं. जो कधीच कोणाचं अहित चिंतत नाही तो निर्भय असतो. शुचिमंत असतो हे त्याला सांगितलं.

* श्रद्धावंतालाच योगरहस्य सांगावं हे भगवंतांनी अर्जुनाला सांगितलं. कारण अर्जुन श्रद्धावान होता. जो श्रद्धावान असतो तोच भक्त असतो. तोच सखा असतो.


* श्रीकृष्णाचं हे बोलणं अर्जुनाला पटलं नसावं. कारण सूर्य आणि मनू तर फार प्राचीन आणि भगवंत तर आता आहेत, मग हे कसं शक्य आहे? असे अर्जुनाला वाटतं.

# प्रपंच जरूरीपुरताच करावा !

महिमा नामस्मरणाचा

अनेक लोक जोडधंदा करतात; त्यांचं सर्व लक्ष मुख्य धंद्यावर केंद्रित झालेलं असतं. जोडधंद्यामुळे मुख्य धंद्यात व्यत्यय येऊ लागला तर तो जोडधंदा जरूरीप्रमाणे बंदही करतात किंवा नफा-नुकसानीचा प्रसंग आला, तर जोडधंद्यातल्या नुकसानीकडे विशेष आस्थेने पहात नाहीत. प्रत्येक माणसाने परमार्थ हा मुख्य धंदा ठेवून प्रपंच जोडधंदा म्हणून करावा. म्हणजेच प्रपंचात होणाऱ्या लाभ-हानीचा परिणाम भगवंताच्या अनुसंधानावर होऊ देऊ नये. परमार्थाच्या आड प्रपंच न येईल अशा युक्तीने वागावं. भाजीला जसं मीठ लागतं तसा परमार्थाला प्रपंच लागतो. मीठ नसेल तर भाजी अळणी लागते पण, मीठ जास्त झालं तर भाजी खाववत नाही. त्याचप्रमाणे प्रपंच आणि परमार्थ यांचा संबंध आहे. काही लोकांना सवयीने मीठ जास्त लागतं. तसंच ज्यांना प्रपंचाची सवय झाली आहे त्यांना तो जास्त लागतो. त्यांची गोष्ट निराळी पण नवीन प्रपंच सुरू करू इच्छिणाऱ्यांनी तरी तो बेतानेच करावा. भगवंत डोळ्यांपुढे ठेवून वागावं. प्रपंचात व्यवहार जतन करावा खरा, पण प्रपंच हेच सर्वस्व नव्हे.

कोणत्याही कारणाने भगवंताचा विसर पडला तरी तो बरा नाही; मग तो प्रपंचात सुखसोयी असल्यामुळे होवो किंवा प्रपंचात दु:ख झाल्यामुळे होवो; प्रत्येकाला प्रपंचाची अत्यंत गरज आहे; पण आपण त्याला वाजवीपेक्षा जास्त महत्त्व देतो आणि सर्व बिघडतं. प्रपंच पाहिजे आणि दु:ख नको असं म्हणणं वेडेपणाचं आहे. मूल असेल तर ते कधी तरी आजारी पडायचंच. प्रपंच कुणाला सुटला आहे? हा प्रपंच, हा संसार, भगवंतानेच उत्पन्न केला आहे तर तो कुणाला तरी सुटेल का? तसा नुसता प्रपंच तापदायक नाही तर आकुंचित प्रपंच तापदायक आहे. ज्याप्रमाणे आपण आपल्या या खिशातले पैसे त्या खिशामध्ये ठेवतो, त्याचप्रमाणे आपलं प्रपंचातलं मन काढून भगवंताकडे लावावं; तसं करण्यात समाधान आहे. नवरा-बायकोचं ध्येय एकच असेल तर त्यांचा प्रपंच सुखाचा होतो. जो मनुष्य हौसेने प्रपंच करेल, त्याला तो करायला चोवीस तासही पुरणार नाहीत; पण जो जरूरीपुरता प्रपंच करील, त्याला तीन-चार तास पुरतील. प्रपंचामध्ये कर्तव्याला चुकू नये पण त्यामध्ये आसक्तीने गुंतून राहू नये. व्यवहाराचं कर्तव्य मनापासून केल्यानंतर त्याचं फळ रामाकडे सोपवावं. रामाचं नाव शक्य तितकं घेऊन आपलं मन त्याच्या ठिकाणी चिकटावं यासाठी मनापासून प्रार्थना करावी.





## तळेगाव ढमढेरेत विहिरीत पडलेल्या साळींदरला जीवदान

**शिक्रापूर :** तळेगाव ढमढेरे ता. शिरुर येथील साळूमाळूवस्ती येथील दादाभाऊ भुजबळ हे सकाळच्या सुमारास विहिरीची मोटार चालू करायला गेले असता त्यांना विहिरीमध्ये कोणतातरी प्राणी पडल्याचे दिसले, याबाबतची माहिती मिळताच निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे अध्यक्ष व शिरुर वनविभाग रेस्क्यू टीम मेंबर शेरखान शेख, गणेश टिळेकर, अमोल कुसाळकर, वैभव निकाळजे, राहुल गायकवाड, आकाश भोरडे यांनी सदर ठिकाणी जाऊन पाहणी केली असता विहिरीमध्ये साळींदर पडल्याचे दिसून आले, दरम्यान प्राणीमित्रांनी अर्ध्या तासाच्या अथक परिश्रमानंतर विहिरीत पडलेल्या साळींदरला बाहेर काढत जीवदान देऊन याबाबतची माहिती वनपरीमंडळ अधिकारी गौरी हिंगणे व नियतक्षेत्र वनअधिकारी प्रमोद पाटील यांना देत सदर साळींदरला दत्तात्रय शेंडकर, ओंकार भुजबळ, सुभाष भुजबळ, संकेत भुजबळ, स्वप्नील भुजबळ, कार्तिक भुजबळ यांच्या उपस्थितीत तातडीने नैसर्गिक अधिवासात मुक्त केले, दरम्यान परिसरातील नागरिकांनी प्राणीमित्रांचे कौतुक केले.

## चालकांकरिता पुणे ग्रामीण पोलीस विभागाचे आवाहन

**जुन्नर :** जुन्नर तालुक्यातील जुन्नर, नारायणगाव, आळेफाटा, ओतूर पोलीस उपविभागामध्ये पोलीस स्टेशन आवारात बेवारस व अपघातातील वाहने पडुन आहेत. यामध्ये जुन्नर ४५,नारायणगाव १३०, आळेफाटा ६४, ओतुर ६७ याप्रमाणे दुचाकी वाहनांची संख्या आहे.

सध्या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेनुसार सात कलमी १०० दिवस कृती आढावाचे अनुषंगाने कारवाई चालु असून वाहनांच्या मुळ मालकांनी आपले आरसी बुक घेऊन व वाहनाची ओळख पटवुन आपले वाहन दि. २४ मार्च पर्यत घेऊन जाण्याचे आवाहन पुणे ग्रामीण पोलीस विभागाच्या वतीने तालुक्यातील वाहन चालकांकरिता करण्यात आले आहे. पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक अभिनव देशमुख यांच्या सूचनेनुसार अन्यथा या वाहनांचा शासकीय नियमाप्रमाणे लिलाव केला जाणार आहे.

## कोरेगाव भीमात कॉपर केबल चोरी प्रकरणी चौघांवर गुन्हा

**शिक्रापूर :** कोरेगाव भीमा ता. शिरूर येथील जय मल्हार ट्रान्सपोर्ट येथे एअरटेल कंपनीसाठी लागणाऱ्या कॉपर धातूच्या विविध केबलचे बंडल आणून ठेवलेले असतात, १९ मार्च रोजी दुपारच्या सुमारास ट्रान्सपोर्ट मधील कामगार कॉपर बंडल पाहत असताना त्यांना एक लाख रुपये किमतीचे दोन बंडल नसल्याचे दिसून आल्याने त्यांनी याबाबतची माहिती ट्रान्सपोर्ट मॅनेजर आकाश चव्हाण यांना दिल्याने चव्हाण यांनी सीसीटीव्ही तपासले त्यावेळी एम एच १२ यु एक्स ९११४ सह अजून एका दुचाकीहून आलेल्या चौघांनी दोन कॉपर केबल बंडल चोरी केल्याचे दिसून आले.

## उगवतीचे रंग नवे.. क्षितिजाचे ढंग नवे..



जयाद्री **निसर्गरंगपंचमी:** सध्या दिवसभरातील थकवा देणारा उकाडा मात्र उगवत्या सूर्य दर्शनाने क्षितिजावरची रंगपंचमी लक्षवेधून घेत असल्याचे दृश्य त्यातच मानवी कृतीचा गगनात भरारीचे तंत्र जयाद्री डोंगर रांगात पाहवयास मिळाले (छायाचित्र - विजयकुमार हरिश्चंद्रे )

# आयोगाने गावच्या निवडणुका त्वरित घ्याव्यात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कारेगाव :** ग्रामीण भागाचा राजकीय व्यवस्थेचा कणा मानला जाणारा खेडेगावाचा कारभार ग्रामपंचायत नावाची स्थानिक स्वराज्य संस्था पाहत असते. गावचा सरपंच, उपसरपंच, सदस्य व ग्रामपंचायत अधिकारी यांच्या माध्यमातून गावचा कारभार पाहिला जात असतो. मात्र याच गावाचा कारभार पाहणाऱ्या शिरुर तालुक्यातील ७ ग्रामपंचायतीचा कार्यकाल गेल्या वर्षभरापूर्वी संपला आहे. त्यामुळे या गावातील विकासाचा गाडा जागीच रुतून बसला असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. निवडणूक अशी मागणी संबंधित गावांच्या ग्रामस्थांनी केली आहे.

शिरुर तालुक्यातील आंबळे, ढोकसांगवी, कळवंतवाडी, कर्डे, चव्हाणवाडी, कासारी आणि धानोरे या ७ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. या ग्रामपंचायतीवर शासनाच्या वतीने प्रशासकाची नेमणूक करण्यात आली आहे. प्रशासक हे पंचायत समिती किंवा राज्य शासनाच्या इतर विभागातील अधिकारी असल्याने त्यांना दैनंदिन कामकाजातून प्रशासक म्हणून वेळ काढणे अवघड होत आहे. भरीस भर म्हणून त्यांच्या हाती गावगाड्याचा कारभार दिल्याने अतिरिक्त कामाचा ताण त्यांच्यावर पडला आहे. त्याचा परिणाम गावच्या विकासावर झाल्याचे दिसून येत आहे. ऑक्टोबर नोव्हेंबर २०२४ मध्ये विधानसभा निवडणूक पार पडल्या असून अनेक विकास कामाचे प्रस्ताव ग्रामपंचायतमधुन दाखल होत आहेत.

## नशामुक्त समाज अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी महत्वाचा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती :** नशामुक्त समाज अर्थव्यवस्थेचा विकासासाठी महत्वाचा असून नशामुक्त समाज निर्मिती साठी लोकसहभाग महत्वाचा असल्याचे प्रतिपादन करत नशामुक्तचा लढाईत प्रत्येक नागरिकांनी सैनिक म्हणून सहभागी व्हावे असे आवाहन पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी केले.

रांजणगाव पोलीस स्टेशनच्या वतीने नशामुक्ति अभियान आयोजित करण्यात आले होते. या अभियान अंतर्गत पोलीस पाटील, शाळांचे मुख्याध्यापक, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, तंटामुक्ती समिती अध्यक्ष, विविध गावचे सरपंच शिक्षक यावेळी उपस्थित होते.वाघमोडे म्हणाले की नशामुक्त अभियानात लोकसहभाग महत्वाचा आहे. अमंली पदार्थाचा शरीरावर परिणाम होतो, व्यसनाधिनता वाढते. अंमली पदार्थामुळे अर्थव्यवस्था व युवक पोखरले जात आहे.युवक व्यसनाचा आहारी गेल्यावर संबधिताचा रोजगार, व्यवसाय व कुटुंबावर परिणाम होत असतो.

नशामुक्त समाज निर्माण करण्याचा संकल्प सर्वानी मिळून करावा असे ही ते म्हणाले. अपेक्षांचे ओझे व त्यातुन अपेक्षा भंग झाल्यास येणारे नैराश्य ,कुतूहुल , संगत यातून व्यसनाकडे युवक जातात. अफू गांजा ,भांग , ब्राउन शुगर ,एम. डी. चरस , एल . एस . डी या सारखे अंमली पदार्थ आहेत . आपल्या परिसरात असे पदार्थ अथवा त्याचे सेवन करणारे आढळल्यास पोलीस स्टेशनकडे संपर्क करावा . एखाद्या टपरी वर विशिष्ट वेळी मोठी गर्दी होत असतील तर त्याची ही माहिती द्यावी . अंमली पदार्थ व्यसन करताना कोणी आढळले . शेतात कोणी गांजा लावलेल्या असेल तर त्याची ही माहिती पोलीसांना कळवावी असे आवाहन वाघमोडे यांनी केले .

# रमजान शांततेत पार पाडा

## पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांचे आवाहन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** मुस्लिम धर्मियांचा पवित्र महिना म्हणजे रमजान असून देव देवतांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून मुस्लिम नागरिकांनी सर्व धर्मांना एकत्रित घेऊन रमजान ईद सण शांततेत व व्यवस्थित साजरा करावा असे आवाहन शिक्रापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांनी शिक्रापूर व परिसरातील मुस्लिम बांधवांना केले आहे.



शिक्रापूर ता. शिरूर येथे मुस्लिम बांधवांच्या रमजान महिन्याच्या अनुषंगाने शिक्रापूर पोलीस स्टेशन च्या वतीने शांतता सभेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी मुस्लिम बांधवांना मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड बोलत होते. याप्रसंगी शिक्रापूर जामा मस्जिदचे अध्यक्ष शिराजभाई शेख, तळेगाव ढमढेरे मस्जिदचे अध्यक्ष मुनीरभाई मोमीन, अशपाक मोमीन, शब्बीरभाई तांबोळी, सादिक तांबोळी, आसिफ तांबोळी, फिरोज तांबोळी, पप्पू शेख, बाबा इनामदार, आमीर इनामदार, राजमहम्मद आत्तार, सलीम शेख यांसह आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना या भागामध्ये प्रत्येक सणामध्ये सर्व धर्माचे नागरीक एकत्र येत असतात हि आनंदाची बाब असून सर्वांनी एकोप्याने सण साजरे करावे, काही अडचणी असल्यास पोलिसांशी संपर्क साधावा, रमजान ईद नमाज पठनचे वेळी वाहतूक कोंडी होणार नाही याची काळजी घ्यावी, नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये असे सांगत सर्व धर्मियांनी एकत्र येऊन सर्वधर्म समभाव जपण्याचे आवाहन पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांनी केले असून पोलिसांकडून संपूर्ण मदत व सहकार्य करण्यात येणार असल्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल देशमुख यांनी सांगितले.

दरम्यान पोलीस हवालदार संदीप कारंडे यांनी सर्व मुस्लीम बांधवांचे आभार मानले.

पान १ वरून

## मान्यवरांच्या हस्ते नृत्य महोत्सवाचे उद्‌घाटन

पाटील म्हणाले की, प्रत्येक कलाकारांना संवाई गंधर्व मध्ये आपली कला सादर करण्याची इच्छा असते. आज तरुण पिढी पाश्चात्य संगीताच्या आहारी जात आहे. पाश्चात्य संगीतातून आनंद मिळतो असे नाही. सध्या डीजे डॉल्बी आणि त्याला जोडीला ड्रग्ज आले आहे. त्यामुळे हे तरुण पिढीला उद्ध्वस्त करत आहे. याला सांस्कृतिक कार्यक्रम उत्तर आहे.

पुणे हे सांस्कृतिक राजधानी असलेले शहर आहे. पंडिता रोहिणी भाटे नृत्य महोत्सव हा पुण्याच्या सांस्कृतिक क्षेत्राच्या वैभवात भर घालत आहे. गेल्या पाच वर्षांत नामदार चंद्रकांतदादा पाटील यांनी आपल्या उपक्रमाच्या माध्यमातून सातत्याने पुण्याच्या सांस्कृतिक वैभवात भर घातली आहे. पुढील वर्षी हा महोत्सव अधिकाधिक भव्यदिव्य व्हावा अशी अपेक्षा केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केली.



## जखमी इरफान अन्सारीचा मृत्यू

नागपूरच्या मेयो रुग्णालयात त्याच्यावर उपचार सुरु होते. राडा झालेल्या भागात ते जखमी अवस्थेत आढळून आला होता. नागपूर हिंसाचार प्रकरणात आरोपींची संख्या १०५ झाली आहे.

## कबरीच्या वादात जरांगेंची उडी




कबर हटवायची नाहीये. कबर हटवायची असती तर त्यांनी कबरीला पोलिसांचं संरक्षण दिले नसते, असा आरोप जरांगेंनी केला.

## सणसवाडीत मटका अड्ड्यावर पोलिसांचा छापा

**शिक्रापूर :** सणसवाडी ता. शिरुर येथील ए. के. गोडावूनच्या शेजारी काही इसम कल्याण मटका खेळवीत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांना मिळाली त्यांनतर पोलीस उपनिरीक्षक विजय मस्कर, सोमनाथ कचरे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक वेरणनाथ मुत्तनवार, लहानू बांगर, महेंद्र शिंदे, रविकिरण जाधव, आबासाहेब नाईक, नारायण सानप यांनी सदर ठिकाणी जाऊन छापा टाकला .

# मठवाडीच्या विद्यार्थ्यांचा कलाविष्कार जल्लोषात साजरा...

**सासवड:** बेलसर(ता.पुरंदर) येथील मठवाडीच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.यावेळी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते तर यावेळी बुधेमळा अंगणवाडीतील चिमुकल्यांच्याही गीतांचे सादरीकरण झाले.



यावेळी यशवंतराव चव्हाण कला क्रीडा स्पर्धेमध्ये विशेष नैपुण्य मिळवणाऱ्या पात्र स्पर्धकांचं सन्मानचिन्ह देऊन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था पुणे ग्रामीणचे प्रकाश जगताप,उद्योजक विलास गरुड यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.यावेळी सरपंच अर्जुन धेंडे,निलेश जगताप, वनिता जगताप,कैलास जगताप, उषा जगताप,संभाजी गरुड, धीरज जगताप,प्रतिमा जगताप, सुहास जगताप, रोहिदास जगताप,विशाल हिंगणे, लक्ष्मण जगताप, चंद्रकांत जगताप, अजित जगताप,महेंद्र चव्हाण, रजनी कुंभार, आशा चव्हाण यांच्या सह ग्रामस्थ,पालक उपस्थित होते.


### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत

( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५

**जाहीर नोटीस**

अर्ज क्र.२६/२०२५/५७२८

**अर्जदार**
नियो.लक्ष्मीनारायण व्हिला सहकारी गृहरचना संस्था मर्या.,
पत्ता:- स.नं.३७/६/१,मौजे वारजे, ता. हवेली, जि. पुणे- ४११०५८.
तर्फ,
मुख्य प्रवर्तक, श्री. राहुल अनंता कुडले.

**विरुध्द**

**जाब देणार**
१.मे.एस.एल.व्ही.डेव्हलपर्स,
नोंदणीकृत भागीदारी संस्था.
रजि. ऑफीस :- ऑफीस नं.०२,मनोज व्हिला अपार्टमेंट, प्लॉट नं. ५७,
लोकमान्य कॉलनी, पौंड रोड, पुणे-४११ ००२.
२.उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (१), पुणे.

उपरोक्त अर्जदार यांनी वरिल उल्लेखिलेल्या कायद्यान्वये नियो. लक्ष्मीनारायण व्हिला सहकारी गृहरचना संस्था मर्या., पत्ता:- स.नं.३७/६/१,मौजे वारजे, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ०५८ या संस्थेच्या नोंदणी करणे कामीचा अर्ज क्र. २६/२०२५ दाखल केला आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १८/०३/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार नियोजित संस्थेच्या वतीने ॲड. समृध्दी कोठारी हजर. जाब देणार क्र. १ गैरहजर. सबब जाब देणार क्र. १ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दि.०९/०४/२०२५ रोजी दु. ३.०० वा. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, न. ता. वाडी, शिवाजी नगर, पुणे ४११ ००५ या ठिकाणी ठेवण्यात आलेली आहे. सदर सुनावणीस जाब देणार क्र. १ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्राआधारे कायद्यातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पुणे, दिनांक: २१/०३/२०२५.

शिक्का

सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.



### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत

( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ५६३/२०२४/५७२५

**अर्जदार**
एम एस प्लाझा सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता: स.नं. १२७/१(पैकी), वाकड, ता. मुळशी, जि. पुणे - ४११०५७.
तर्फे, अध्यक्ष: श्री. रूपेश उध्दव बोरकर, सचिव : श्री. अण्णासाहेब जगताप, खजिनदार: श्री. सारंग गणेश बोरसे

**विरुध्द**

**गैरअर्जदार / जमिनमालक**
विकसक / जागा मालक / जाब देणार नं. 1
1. एम. एस. बिल्डर्स अँण्ड डेव्हलपर्स, नोंदणीकृत भागीदारी संस्था,
ऑफिस पत्ता- फ्लॅट नं. १५, श्रीराम प्लाझा, फ्लॅट नं. १०२, विशालनगर, पिंपळे निलख, ता. हवेली, जि. पुणे - २७. तर्फे भागीदार, अ. श्री. श्रीकांत चिमाजी भुरूक
रा. पत्ता- ओम रेसिडेन्सी, फ्लॅट नं. १, न्यु सांगवी, ता. हवेली, जि. पुणे - २७.
ब. श्री. महेश नामदेव शेंडकर
रा. फ्लॅट नं. १५, श्रीराम प्लाझा, फ्लॅट नं. १०२, विशालनगर, पिंपळे निलख, ता. हवेली जि. पुणे- ४११०२७. क. श्री. प्रकाश प्रेमराज भंडारी, रा. १२/१, पवार नगर, विजय शॉप च्या जवळ, बेलठिकानगर, थेरगांव, पुणे - ३३.

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये एम एस प्लाझा सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ता: स.नं. १२७/१ (पैकी), वाकड, ता. मुळशी, जि. पुणे ४११ ०५७ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ५६३ / २०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १३/०३/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. समृद्धी कोठारी हजर. गैरअर्जदार/जमिन मालक १ गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक ०२/०४/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पुणे, दिनांक: २१/०३/२०२५.

शिक्का

सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.



### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत

( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५

**जाहीर नोटीस**

अर्ज क्र.२४/२०२५./५७२९

**अर्जदार**
नियो.क्रिस्टल क्युब सहकारी गृहरचना संस्था मर्या.,
पत्ता:-स.नं.२०,हिस्सा नं. १, दिघी, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ०१५.
तर्फे, मुख्य प्रवर्तक, श्री. शिवाजी अण्णासाहेब कोकरे.

**विरुध्द**

**जाब देणार**
१. मे. लायगुडे डेव्हलपर्स, नोंदणीकृत प्रोप्रायटरी संस्था.
तर्फे प्रोप्रायटर, श्री. अभय यशवंत लायगुडे.
रा.स.नं.१३८, बि.नं.डी. फ्लॅट नं. ०३, श्रीराम नगर, औंध, पुणे- ४११ ००७.
२.उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (६), पुणे.

उपरोक्त अर्जदार यांनी वरिल उल्लेखिलेल्या कायद्यान्वये नियो. क्रिस्टल क्युब सहकारी गृहरचना संस्था मर्या., पत्ता:- स.नं. २०, हिस्सा नं. १, दिघी, ता. हवेली, जि. पुणे - ४११ ०१५ या संस्थेच्या नोंदणी करणे कामीचा अर्ज क्र. २४/२०२५ दाखल केला आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १८/०३/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार नियोजित संस्थेच्या वतीने ॲड. समृध्दी कोठारी हजर. जाब देणार क्र. १ गैरहजर. सबब जाब देणार क्र. १ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दि.०९/०४/२०२५ रोजी दु. ३.०० वा. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, न. ता. वाडी, शिवाजी नगर, पुणे ४११ ००५ या ठिकाणी ठेवण्यात आलेली आहे. सदर सुनावणीस जाब देणार क्र. १ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्राआधारे कायद्यातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पुणे, दिनांक: २१/०३/२०२५.

शिक्का

सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे.



### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत

( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५

**जाहीर नोटीस**

अर्ज क्र.०१/२०२५/५६०२

**अर्जदार**
नियो.जैब रेसिडेन्सी सहकारी गृहरचना संस्था मर्या.
पत्ता:-स.नं.५५/११/३ व स.नं.५५/४/२/१,भाग्योदयनगर,लेन नं.२८,
गाव-कोंढवा खुर्द, ता.हवेली, जि. पुणे-४११०४८.
तर्फ,
मुख्य प्रवर्तक, श्री. अब्दुल समद अब्दुल रज्जाक मोगल.

**विरुध्द**

**जाब देणार**
१. जैबुनिसा युनूस शेख.
पत्ता:- ३३७, घोरपडी पेठ, चाँदतारा चौक, पुणे- ४११०४२.
तर्फे कबुलीजबाबा करीता कु. मु.धारक,
अलताफ अय्युब पठान.
पत्ता:- कोंढवा खुर्द, पुणे- ४११ ०४८.
२.उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (४), पुणे.

उपरोक्त अर्जदार यांनी वरिल उल्लेखिलेल्या कायद्यान्वये नियो. जैब रेसिडेन्सी सहकारी गृहरचना संस्था मर्या., पत्ता:- स.नं.५५/११/३ व स.नं.५५/४/२/१,भाग्योदयनगर, लेन नं. २८, गाव- कोंढवा खुर्द, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ०४८ या संस्थेच्या नोंदणी करणे कामीचा अर्ज क्र.०१/२०२५ दाखल केला आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. ११/०३/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार नियोजित संस्थेच्या वतीने ॲड. समृध्दी कोठारी हजर. जाब देणार क्र. १ गैरहजर. सबब जाब देणार क्र. १ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दि.०२/०४/२०२५ रोजी दु. ३.०० वा. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, न. ता. वाडी, शिवाजी नगर, पुणे ४११ ००५ या ठिकाणी ठेवण्यात आलेली आहे. सदर सुनावणीस जाब देणार क्र. १ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्राआधारे कायद्यातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पुणे, दिनांक: ११ /०३ /२०२५.

शिक्का

सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.



### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत

( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ५४/२०२५/५७२४

**अर्जदार**
सिदधी व्हिला सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता: आकुर्डी, एस. डी. सी. प्लॉट नं. एच- १९, पीसीएनटीडीओ, निगडी, ता. हवेली, जि. पुणे - ४११०४४. तर्फे, अध्यक्ष: श्री. राकेश कुमार सिंह, सचिव : सौ. वैशाली विनोद पाटील

**विरुध्द**

**गैरअर्जदार / जमिनमालक**
विकसक / प्रवर्तक / भाडेपट्टाधारक
१. मे. सिध्दीविनायक असोसिएटस्, नोंदणीकृत भागीदारी संस्था, तर्फे भागीदार, अ. श्री. पवन एन. भंडारी, ब. सौ. दिशा पवन भंडारी, क. श्री. महावीर झुबरलाल बेदमुथा, ड. सौ. सपना महावीर बेदमुथ्था (जाब देणार नं.२ अ स्वतः करिता व जाब देणार नं.२ ब ते ड तर्फे कु. मु. धारक म्हणुन )
ऑफिस पत्ता- भगवान मार्केट, पी.ए.पी. २५/२, जी - ब्लॉक, एमआयडीसी, चिखली रोड, चिंचवड, ता.हवेली जि. पुणे - ४११०१९.
मुळ जागा मालक / जाब देणार नं. २
२.पिंपरी चिंचवड महानगरपालिका, भुसंपादन विभाग, (पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण) पुर्वी पत्ता- जुनी पी. सी. एन.डी.टी.ए. बिल्डींग, आकुर्डी, ता- हवेली, जि- पुणे - ४११०३५.

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये सिदधी व्हिला सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ता: आकुर्डी, एस. डी. सी. प्लॉट नं. एच- १९, पीसीएनटीडीओ, निगडी, ता. हवेली, जि. पुणे - ४११०४४ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ५४ / २०२५ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १२/०३/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. अदिती कुलकर्णी हजर. गैरअर्जदार/जमिन मालक १ व २ गैरहजर, गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ व २ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक ०२/०४/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ व २ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पुणे, दिनांक: २१/०३/२०२५.

शिक्का

सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

SUNDAY EDGE
राष्ट्रसंचार
www.rashtrasanchar.com
@rashtrasanchar
23•3•2025

**बलुचिस्तानमधील 'जाफर एक्स्प्रेस ट्रेन'च्या अपहरणाने आणि नंतर पाकिस्तान सैन्याच्या नोश्की येथिल तळावर हाल्ला करुन नव्वद सैनिकांना ठार मारल्याच्या घटनेनंतर बलुची आणि पाकिस्तानी सरकार यांच्यात मोठा संघर्ष पेटला आहे. याबाबत 'बलुची लिबरेशन आर्मी' आणि पाकिस्तानी लष्कराने केलेले दावे काहीही असले, तरी बलुचिस्तानमधील संघर्ष का सुरू झाला आणि त्याचे काय होणार, हे समजून घेतले पाहिजे.**




# बलुचिस्तान का पेटले ?

विश्वसंचार
प्रा. डॉ. विजयकुमार पोटे
राष्ट्रसंचार

रा'बलुची लिबरेशन आर्मी'ने बलुचिस्तानमधील क्वेटा ते पेशावर प्रवास करणाऱ्या जाफर एक्स्प्रेस ट्रेनचे अपहरण करण्याच्या बहुचर्चीत घटनेने बलुच आणि पाकिस्तानी राजवटीमध्ये दीर्घकाळ चालत असलेल्या संघर्षाच्या आठवणींना पुन्हा एकदा उजाळा दिला आहे. हा हल्ला आणि 'बीएलए'च्या सैनिकांनी केलेले अपहरण हे बलुचच्या सततच्या स्वातंत्र्याच्या मागणीचा परिणाम आहे. हा लढा 1947 मध्ये, म्हणजे पाकिस्तानच्या स्थापनेपासून सुरू असलेल्या आर्थिक दडपशाही, राजकीय उपेक्षितपणा, सांस्कृतिक भेदभाव आणि राज्य प्रायोजित दडपशाहीच्या आरोपांचा परिणाम आहे. 1947 मधील भारताची फाळणी आणि त्यानंतर पाकिस्तानने बलुचिस्तानवर जबरदस्तीने केलेल्या कब्जात या संघर्षाची बीजे आहेत. बलुच लोक हा पाकिस्तान, इराण आणि अफगाणिस्तानच्या सीमेवर पसरलेला एक वांशिक समुदाय आहे. हा समुदाय त्यांच्या सांस्कृतिक, प्रादेशिक आणि भाषिक वेगळेपणासाठी ओळखला जातो. हे लोक त्यांच्या भागात दीर्घकाळापासून दुर्लक्षित आहेत. 'जैश अल-अदल'सारखे बलुच फुटीरतावादी गट इराणमध्ये सक्रिय आहेत. ते इराणमधील सिस्तान आणि बलुचिस्तान प्रांताच्या स्वातंत्र्याची मागणी करतात. इराण काही वेळा या गटांविरुद्ध लष्करी कारवाई करतो तर अफगाणिस्तानवर या गटांना प्रशिक्षण आणि शस्त्रे यासह गुप्त मदत पुरवल्याचा आरोप आहे. आता तर पाकिस्तानने भारतालाही त्यात गोवले आहे. 1947 मध्ये भारतापासून वेगळे झाल्यानंतर पाकिस्तानने आपले स्वातंत्र्य घोषित केले, तेव्हा बलुचिस्तान (कलात राज्य) च्या तत्कालीन शासकानेही आपले स्वातंत्र्य घोषित केले.

आता बलुचिस्तान म्हणून ओळखला जाणारा प्रदेश 1947 मध्ये भारताच्या स्वातंत्र्याच्या वेळी चार संस्थानांमध्ये विभागला गेला होता, त्यापैकी एक कलात म्हणून ओळखला जात होता. येथील राज्यकर्त्याला खान म्हणत. या व्यतिरिक्त खारान, लास बेला आणि मकरन या इतर तीन संस्थानांनी पाकिस्तानमध्ये सामील होण्याचा निर्णय घेतला होता. असे म्हणतात की या संस्थानांकडेही भारतात विलीन होण्याचा पर्याय होता; परंतु मोहम्मद अली जिना यांच्या प्रभावामुळे ते शक्य झाले नाही. 1876 मध्ये ब्रिटिशांशी झालेल्या करारामुळे कलातला आपली अंतर्गत स्वायत्तता ब्रिटिश राजवटीपासून मुक्त झाली. पुढे, भारताच्या स्वातंत्र्याच्या वेळी, या मुद्द्यावर दिल्लीत शेवटच्या ब्रिटिश गव्हर्नर लॉर्ड माउंटबॅटनशी बैठक झाली होती, मोहंमद अली जिना यांनी कलातच्या स्वातंत्र्याला पाठिंबा दिला होता आणि 5 ऑगस्ट 1947 पासून बलुचिस्ताननेही स्वातंत्र्य घोषित केले होते. त्याच वेळी, उर्वरित तीन प्रांतांनी संपूर्ण बलुचिस्तान तयार करण्याचा निर्णय घेतला. जम्मू-काश्मीरप्रमाणेच बलुचिस्तानच्या राज्यकर्त्यांनाही त्यांच्या राज्याची स्वायत्तता कायम ठेवायची होती; पण पाकिस्तान सरकारने भारताच्या प्रभावाच्या भीतीने स्वातंत्र्यानंतर अवघ्या सात महिन्यांमध्ये, मार्च 1948 मध्ये आपले सैन्य पाठवले. तेव्हा बलुच जनतेने पाकिस्तानी राजवटीच्या विरोधात जोरदार निदर्शने केली. येथूनच वाद सुरू झाला, जो आज हिंसक संघर्षात रूपांतरित झाला आहे. तिथे बॉम्बस्फोट, आत्मघाती हल्ले आणि अपहरणांची प्रकरणे समोर येत आहेत.

बलुच जन्तेने 1948, 1958-59, 1973-77 आणि 2004 मध्ये पाकिस्तानच्या सरकारविरुद्ध निकराचे लढे दिले. विशेषत: आर्थिक दडपशाही, राजकीय उपेक्षा आणि सांस्कृतिक भेदभाव यासह अनेक मुद्द्यांच्या निषेधार्थ ही बंडखोरी झाली. बलुच जनतेच्या मागण्या आणि त्याकडे दुर्लक्ष करण्याच्या पाकिस्तान सरकारच्या कृतीमुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. पाकिस्तान सरकार कठोरपणे लागू करत असलेल्या अतिराष्ट्रवादाच्या तुलनेत बलुचांची वांशिक ओळख अगदी उलट आहे. बलुच लोकांनी आपल्या वेगळ्या भाषा, संस्कृती आणि परंपरांसह, पंजाबीबहुल पाकिस्तानच्या संस्कृतीत विलीन होण्याचा दीर्घकाळ प्रतिकार केला आहे. यामुळे बलुच लोकांमध्ये परकेपणा आणि उपेक्षितपणाची भावना निर्माण झाली आहे. त्यांना वाटते की त्यांची ओळख आणि हक्क पाकिस्तानी राजवटीने हिरावले. त्यांचा आदर केला नाही. दुसरीकडे, पाकिस्तान सरकार अनेक बलुच राष्ट्रवादी गटांना दहशतवादी मानते. तिथे कोणताही निषेध किंवा सुधारणांची मागणी लष्करी शक्तीच्या मदतीने दाबली जाते. त्याचा परिणाम असा झाला की बलुचिस्तानमधील मानवी हक्क परिस्थिती दयनीय झाली. उदाहरणार्थ, बलुच अनेकदा पाकिस्तानी लष्करावर न्यायालयीन हत्या आणि अत्याचाराचा आरोप करतात.



बलुचिस्तान हा पाकिस्तानचा सर्वात मोठा आणि कमी लोकसंख्या असलेला प्रांत आहे, तरीही तो सर्वात गरीब आणि मागासलेला प्रदेश आहे. हा प्रांत नैसर्गिक वायू, कोळसा, तांबे आणि इतर खनिजांसह नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध आहे. पाकिस्तानी सरकार तिथे अनेकदा जबरदस्तीने उत्खनन आणि ड्रिलिंग करते. आता तेथे चीनचा प्रभाव वाढत आहे. त्याला 'बलुची लिबरेशन आर्मी'आणि इतर सशस्त्र गटांचा विरोध आहे. उदाहरणार्थ, नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध असूनही बलुच लोकांची गरिबी आणि अडचणी कमी होत नाहीत. चीनी अर्थसहाय्यीत ग्वादर मेगा-पोर्टच्या बांधकामामुळे संकट आणखी वाढले आहे. हे बंदर सामरिकदृष्ट्या पाकिस्तानसाठी महत्त्वाचे असले, तरी बलुचिस्तानमध्ये असूनही बलुच जनता विकास प्रक्रियेपासून दूर आहे. ग्वादरच्या आजूबाजूच्या जमिनीची बेकायदेशीर विक्री झाली आहे. त्यामुळे स्थानिक बलुच लोकसंख्येच्या जीवावर मोठ्या प्रमाणात नफा कमावला जात असल्याचा आरोप पाकिस्तान सरकारवर झाला आहे. पाकिस्तानी राजवटीच्या दडपशाहीचा आणि राजकीय उपेक्षितपणाचा हा परिणाम आहे, की बलुचिस्तानमधील लोक फुटीरतावादात गुंतले आहेत. याला प्रत्युत्तर म्हणून गेल्या काही वर्षांत अनेक बलुच फुटीरतावादी गट उदयास आले आहेत. ते पाकिस्तानी लष्कराविरुद्ध राजकीय हिंसाचार करत आहेत. बलुचिस्तानला अधिक पूर्ण स्वातंत्र्य मिळवून देणे हे 'बलुचिस्तान लिबरेशन फ्रंट' (बीएलएफ) आणि बलुचिस्तान लिबरेशन आर्मी (बीएलए) या गटांचे लक्ष्य आहे.


'बलुचिस्तान लिबरेशन आर्मी' (बीएलए) हा सर्वात मोठा बलुच फुटीरतावादी गट असून अनेक दशकांपासून पाकिस्तान सरकारच्या विरोधात बलुचिस्तानच्या स्वातंत्र्याची मागणी करत आहे. पाकिस्तान, अमेरिका आणि ब्रिटनसारखे देश 'बीएलए'ला दहशतवादी संघटना मानतात. या गटाने बलुचिस्तानमध्ये सुरक्षा दल, सरकारी इमारती आणि चिनी सैन्य आणि त्यांच्या कामगारांना लक्ष्य करत अनेक हल्ले केले आहेत. अलिकडच्या वर्षांमध्ये येथे चीनचा प्रभाव वाढल्याने 'बीएलए'ने आपले हल्ले तीव्र केले आहेत. अनेक आत्मघाती हल्ले आणि मोठ्या हल्ल्यांसाठी 'बीएलए' जबाबदार आहे. 'बीएलए'चे आत्मघाती पथक मानले जाणारे मजीद ब्रिगेड अनेक हाय-प्रोफाइल हल्ल्यांमध्ये सामील आहे. 2018 मध्ये कराचीतील चीनी दूतावासावर झालेला हल्ला आणि 2019 मध्ये ग्वादरमधील एका लक्झरी हॉटेलवरील हल्ल्यामध्ये ते सहभागी होते. 'चीन-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉर' हा एक अब्ज डॉलर्सचा प्रकल्प अलीकडच्या काळात बलुचिस्तानमधील संघर्षाचे एक प्रमुख कारण आहे, तर पाकिस्तान सरकार 'सीपीईसी'ला देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी 'गेमचेंजर' म्हणून पाहत आहे, तर बलुच लोक याकडे चीनसाठी त्यांच्या संसाधनांचे शोषण करण्याचे आणि त्यांना आणखी दुर्लक्षित करण्याचे एक साधन म्हणून पाहतात. या प्रकल्पांमुळे समाजातील लोक मोठ्या संख्येने विस्थापित झाले आहेत. या भागाचे लष्करीकरण झाले असून येथे चीनी कामगार मोठ्या संख्येने रहात आहेत. त्यामुळे पाकिस्तानी राजवटीविरुद्ध बलुचांचा राग आणखी वाढला आहे.

'बीएलए' आणि इतर बलुच फुटीरतावादी गटांनी पाकिस्तानमधील चीनी गॅस आणि इतर प्रकल्प तसेच चीनी कामगारांना वाढत्या प्रमाणात लक्ष्य केले आहे. या हल्ल्यांचा उद्देश 'सीपीईसी'ला आळा घालणे आणि बलुचिस्तानमध्ये चीनच्या सहभागाला कडाडून विरोध केला जाईल, असा संदेश देणे हा आहे. बलुचिस्तानमधील मानवाधिकार परिस्थितीचे गांभीर्य असूनही, आंतरराष्ट्रीय स्तरावर या संघर्षाकडे दुर्लक्ष केले जाते. सामाजिक कार्यकर्ते आणि नेत्यांनी पाकिस्तान सरकारवर या प्रदेशात नरसंहार केल्याचा आरोप केला आहे; परंतु आंतरराष्ट्रीय स्तरावर या आरोपांची फारशी दखल घेतली गेलेली नाही किंवा कारवाई झालेली नाही. 'जाफर एक्सप्रेस'च्या अपहरणानंतरही हा संघर्ष थांबणार नाही. उलट, आता बंडखोर गटांनी पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांताचा ताबा घेतल्यासारखीच स्थिती आहे.

# 'गुलाबी कर' नष्ट करण्यासाठी जागरूकता हवी

**भारतासह जगभरात दि. 8 मार्च रोजी 'आंतरराष्ट्रीय महिला दिन' साजरा करण्यात आला. सर्वत्र विविध कार्यक्रम, सत्कार, व्याख्याने यांची रेलचेल आढळली. महिलांना सन्मानाची, समानतेची वागणूक देण्याबद्दलच्या आणाभाका, शपथा, निर्धार जाहीर करण्यात आले. मात्र त्याचवेळी महिलांवर आर्थिक अन्याय करणाऱ्या 'गुलाबी करा' बद्दल मात्र कोणी चकार शब्द काढलेला दिसला नाही. हा गुलाबी कर नष्ट करण्यासाठी सर्व पातळ्यांवर जागरूकता, संवेदनशीलता निर्माण होण्याची नितांत गरज आहे. या वेगळ्या पण महत्वाच्या विषयाचा घेतलेला वेध.**



आर्थिक
प्रा. नंदकुमार काकिर्डे
राष्ट्रसंचार

भारतासह जगभरातील अनेक देशांमध्ये 'गुलाबी कर' अस्तित्वात आहे. हा कर 'पिंक टॅक्स' म्हणून जगभर ओळखला जातो. अगदी थोडक्या शब्दात सांगावयाचे झाले तर पुरुष व महिला या दोघांसाठी अनेक उत्पादने,वस्तू किंवा सेवा समान वापरल्या जातात. मात्र बाजारामध्ये अशा उत्पादनांच्या किंमती किंवा सेवांचे शुल्क पुरुषांसाठी जेवढ्या असतात त्यापेक्षा काही टक्के जास्त किंमती, शुल्क महिलांकडून वसूल केल्या जातात. पुरुष व महिला या दोघांकडून वापरल्या जाणाऱ्या सारख्या उत्पादनांच्या किंमतीमध्ये लिंगभेद केला जातो. समानतेच्या दृष्टिकोनातून महिला वर्गाच्या बाबतीत हा कर अन्यायकारक ठरतो. महिला वर्गाला त्यासाठी द्यावी लागणारी जादा किंमत किंवा शुल्क म्हणजे एक प्रकारचा 'गुलाबी कर' आहे असे मानले जाते. आपली लोकसंख्या 146 कोटींच्या घरात आहे व त्यापैकी 70 कोटी महिला आहेत, हे लक्षात घेता हा 'गुलाबी कर' अर्थकारणावर परिणाम करणारा आहे.

'इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल विकली 'या अर्थविषयक साप्ताहिकामध्ये दोहा - कतार येथील श्री साईबाल घोष यांनी याबाबतचा संशोधनात्मक प्रबंध प्रसिद्ध केला असून हा गुलाबी कर नष्ट व्हावा अशी मांडणी केली आहे. यासाठी त्यांनी विविध देशातील कुटुंबांचा व त्यांनी केलेल्या खर्चाबाबत संशोधन केले. २०१५ ते २०२२ या सात वर्षाच्या काळात त्यांनी कुटुंब स्तरावरील खर्चाचा अभ्यास केला. या अभ्यासावरून जगात सर्वत्र हा 'पिंक टॅक्स' अस्तित्वात असल्याचा निष्कर्ष त्यांनी काढला आहे.

'गुलाबी करा'च्या संदर्भात भारताचा विचार करता ही कर पद्धती किंवा अशी यंत्रणा आपल्याला नवीन किंवा अद्वितीय नाही. आपल्याकडील सर्वसाधारण सामाजिक नियम व बाजारातील गतिशीलता यामुळे आपल्या देशात गेली अनेक वर्षे गुलाबी कर अस्तित्वात आहे. या 'गुलाबी करा' मध्ये कोणती उत्पादने व सेवा यांचा समावेश केला जातो याचा अभ्यास केला असता विविध प्रकारची सौंदर्य प्रसाधने, दुर्गंधीनाशक उत्पादने व वस्तरे (रेझर, डिओडोरंट्स), किंवा शरीर स्वच्छ ठेवण्यासाठी वापरले जाणारे साबण, बॉडी वॉश यांसारखी वैयक्तिक काळजी उत्पादने, टी-शर्ट, जीन्स आणि जॅकेट यांसारख्या कपड्यांच्या वस्तू, हेअर कट आणि केस रंगवण्यासारख्या सारख्या सलून सेवा, खेळणी व महिला स्वच्छता उत्पादने यांचा प्रामुख्याने समावेश होतो.

पुरुष व महिलांना सर्वत्र समान दर्जा व वागणूक दिली जावी ही संकल्पना सर्व प्रगतिशील देशांमध्ये अस्तित्वात आहे. या पार्श्वभूमीवर पुरुष व महिलांमध्ये लिंगभेद केला जाऊ नये एवढेच नाही तर लिंग समानतेला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने अशा प्रकारचा 'कर' वसूल केला जाऊ नये हा महत्त्वाचा मुद्दा प्रकर्षाने निर्माण होतो. अशा प्रकारचा गुलाबी कर काढून टाकला तर महिलांवरील आर्थिक भार निश्चितपणे कमी होईल अशी यामागे अपेक्षा आहे. त्याचबरोबर लैंगिक समानतेला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टिकोनातून भारताचे एक पाऊल पुढे जाऊ शकते. एवढेच नाही तर त्यामुळे बाजारातील पारदर्शकता निश्चितपणे वाढणार असून सर्व उत्पादने व सेवांच्या किमती जास्तीत जास्त पारदर्शक राहून ग्राहकांना चांगल्या किमती व सेवांचा फायदा होऊ शकतो. बाजारातील उचित स्पर्धा प्रथांना यामुळे प्रोत्साहन दिले जाऊन भेदभावपूर्ण किंमती पूर्णपणे नष्ट होतील अशी अपेक्षा आहे. कोणत्याही व्यवसायात निष्पक्ष स्पर्धा असणे व ग्राहकांना चांगल्या किमती व सेवांचा लाभ होणे हे समाजाच्या दृष्टिकोनातून निश्चितच हितकारक आहे.

याबाबत देशातील विविध राज्यांमधील उत्पादने व सेवांचा अभ्यास केला असता साधारणपणे असे लक्षात आले आहे की महिलांसाठी असलेल्या उत्पादनांच्या किमती या दोन ते सहा पट जास्त आहेत. त्यामुळे दरवर्षी साधारणपणे 300 डॉलर किंवा वीस ते पंचवीस हजार रुपये खर्च जास्त केला जातो असे लक्षात आले आहे. बायोकॉन कंपनीच्या अध्यक्ष श्रीमती किरण मुजुमदार शॉ यांनी गुलाबी करामुळे निर्माण झालेल्या लिंग असमानतेबद्दल नाराजी व्यक्त केली होती. महिला व पुरुष वर्ग जी उत्पादने, सेवा समानरित्या वापरतात त्याबाबत समान किंमत असण्याची गरज त्यांनी स्पष्ट केली होती.

जागतिक पातळीवर केलेल्या अभ्यासामध्ये महिला-पुरुषांच्या वस्त्र प्रावरणाच्या बाबतीत महिलांच्या वस्त्रांच्या सरासरी किमती ०.७ टक्के जास्त आहेत असे आढळले होते. अमेरिकेत याबाबत शंभर ब्रँड्सचा अभ्यास करण्यात आला होता. त्यात महिलांच्या उत्पादनांसाठी असलेल्या किमती 12 ते 13 टक्के जास्त असल्याचे आढळले होते. इंग्लंडमध्ये अशा प्रकारची पाहणी केली तेव्हा महिलांना अशा उत्पादनांसाठी दहा टक्के किंमत जास्त द्यावी लागत असल्याचे आढळले होते. भारतामध्ये अशा प्रकारच्या गुलाबी करायच्या बाबत संशोधन करण्यात आले. त्यामध्ये व्यक्तिगत पातळीवरील खर्चाचा अभ्यास न करता कौटुंबिक पातळीवर त्याचा अभ्यास करण्यात आला. त्यामुळे एक प्रकारे दुय्यम प्रकारची माहिती यामध्ये संकलित करण्यात आलेली आहे. विविध राज्यातील एक लाखांपेक्षा जास्त कुटुंबांमध्ये ही पाहणी या कालावधीत करण्यात आली होती. सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनोमी ( सीएमआयई) संस्थेने याबाबतचे संशोधन केलेले होते. त्यामध्ये महिला ग्राहकांकडून अनेक वेळा जास्त किमती किंवा शुल्क वसूल केल्याचे सकृत दर्शनी आढळलेले आहे.

> • या गुलाबी कराचे काही निश्चित तोटे आहेत. त्यांचा अभ्यास केला असता महिलांवरील आर्थिक ताणामध्ये गुलाबी कराची भर पडत आहे. एका पाहणीनुसार महिला व पुरुषांची कमाई व वेतन लक्षात घेतले तर भारतामध्ये महिलांची कमाई पुरुषांपेक्षा सुमारे 30 ते 35 टक्के कमी आहे. महिलांच्या गरजा आणि त्यांना दिले जाणारे प्राधान्य हे पुरुषांपेक्षा जास्त असते व त्यासाठी होणारा खर्च पुरुषांपेक्षा जास्त होत असतो अशी धारणा समाजामध्ये निर्माण होताना दिसत आहे. गुलाबी करामुळे किंमती स्वाभाविकपणे वाढतात. त्यामुळे अनेक उत्पादनांच्या बाबतीत खरेदी करणाऱ्या महिलांचा प्रवेश आपोआप मर्यादित होतो. साहजिकच अशी अत्यावश्यक उत्पादने व सेवा वापरण्याच्या बाबतीत महिला वर्गाला प्रतिबंध होऊ शकतो अशी बाजारातील परिस्थिती आहे

जागतिक पातळीवर या गुलाबी कराच्या विरोधात अनेक ठिकाणी आंदोलने व मोहीम राबवण्यात आली. २०१५ मध्ये कॅनडाने महिलांच्या सर्व उत्पादनावरील कर पूर्णपणे रद्द केलेला होता. त्यानंतर २०१९ मध्ये ऑस्ट्रेलियाने याबाबतचे पाऊल पुढे टाकून महिलांच्या उत्पादनांवरील कर रद्द केला. जर्मनीमध्ये महिलांसाठी वापरल्या जाणाऱ्या सॅनिटरी पॅडवर चैनीची वस्तू म्हणून 19 टक्के कर लावण्यात आला होता. २०२० मध्ये तो कमी करून केवळ 6 टक्के करण्यात आला. इटली व स्पेन या दोन्ही देशांमध्ये अगदी अलीकडे हा कर कमी करण्यात आलेला आहे. स्कॉटलंडमध्येही कमी उत्पन्न गटातील महिलांसाठी ही सर्व उत्पादने मोफत देण्याबाबतचा कायदा संमत करण्यात आलेला आहे. काही विकसनशील देशांचा अभ्यास केला असता केनयासारख्या देशाने 2004 मध्ये या उत्पादनावरील कर लक्षणीय रित्या कमी केला. त्याचप्रमाणे कोलंबियांमध्ये अशा प्रकारचा लिंगभेद करणारा कर हा घटनाबाह्य ठरवण्यात येऊन २०१८ मध्ये तो नष्ट करण्यात आला. नामीबिया मेक्सिको, इक्वाडोर व श्रीलंका या देशातही याबाबत काही सवलती देण्यात आल्या आहेत.

वास्तविक पाहता भारतामध्ये गुलाबी करावर बंधने घालणारा किंवा प्रतिबंध करणारा कोणताही अधिकृत कायदा अस्तित्वात नाही. परंतु लिंगभेद टाळण्याच्या दृष्टिकोनातून व महिला व पुरुष यांच्यात आर्थिक समानता निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून या गोष्टी करणे आवश्यक आहे. किमान सध्याच्या प्रगतिशील समाजामध्ये त्याबाबत जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे. देशाच्या पहिल्या नागरिक म्हणजे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या महिला आहेत. तसेच गेली अनेक वर्षे देशाच्या अर्थमंत्री पदावर निर्मला सीतारामन यांच्यासारखी महिला अत्यंत निष्ठेने काम करीत आहे. असे असूनही आर्थिक पातळीवर काहीशी असमानता निर्माण करणाऱ्या या 'गुलाबी कराचे 'अस्तित्व नष्ट व्हावे अशी अपेक्षा केली तर ती गैर ठरणार नाही. अर्थमंत्र्यांनी काही वर्षांपूर्वी म्हणजे २०१८ मध्ये मासिक पाळीच्या संबंधित उत्पादनावरील 12 टक्के जीएसटी म्हणजे गुड्स अँड सर्व्हिस टॅक्स मधून पूर्णपणे सवलत दिलेली होती. एक प्रकारे याबाबतच्या समस्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टिकोनातून विद्यमान सरकारने एक पाऊल टाकलेले होते. परंतु वास्तवामध्ये आजही अशा प्रकारचा लिंगभेद करणारा गुलाबी कर व्यापक प्रमाणात आढळत आहे. विविध कंपन्यांनी याबाबतची सामाजिक जबाबदारी लक्षात घेऊन अशा उत्पादनाच्या किमती कमी करण्याची गरज आहे. भारतातील महिला संघटनांनी याबाबत एकत्र येऊन नजीकच्या भविष्यकाळात नष्ट होण्यासाठी सकारात्मक मोहिमेद्वारे संवेदनशीलता व जागरूकता निर्माण करण्याची गरज आहे.

# स्मार्ट वर्किंग, हॅपी लाइफ!"

## उत्पादकता वाढवण्यासाठी १३ स्मार्ट सवयी!

**सध्याच्या डिजिटल युगात वर्क फ्रॉम होम (WFH) अनेकांसाठी नवा आयुष्यशैलीचा भाग बनला आहे. प्रवासाचा त्रास नाही, वेळेची बचत, घरच्यांसोबत अधिक वेळ घालवता येतो—या फायद्यांमुळे WFH आकर्षक वाटतो. पण दुसरीकडे, एकटं वाटणं, कामाच्या वेळेचा अभाव आणि वैयक्तिक व व्यावसायिक आयुष्यात समतोल न राहणं यासारख्या समस्या येतात. घरून काम करताना तुमची उत्पादकता आणि मानसिक आरोग्य दोन्ही उत्तम राहावं यासाठी खालील १३ स्मार्ट सवयी आत्मसात करा...**



सामाजिक
- प्रा योगेश हांडगे पाटील
राष्ट्रसंचार

### १. ठराविक वेळ ठेवा आणि शिस्त पाळा

- घरून काम करताना वेळेचा ठराविक तक्ता नसल्यामुळे काही लोक दिवस-रात्र काम करतात, तर काहीजण वेळ न घालवता सतत विचलित होतात. त्यामुळे शिस्तबद्ध वेळापत्रक तयार करणं गरजेचं आहे.
- कामाचे ठराविक तास निश्चित करा.
- कुटुंबीयांना तुमच्या वेळेचं महत्त्व समजावून सांगा.
- कामाच्या वेळेत इतर कोणत्याही गोष्टीत गुंतू नका.
- **फायदा:** काम वेळेत पूर्ण होतं.
- उगाच ओव्हरटाईमचा ताण राहत नाही.

### २. घरात योग्य वर्कस्पेस तयार करा

- सोफ्यावर किंवा बेडवर बसून काम करणं टाळा. यामुळे शरीराला आळस येतो आणि उत्पादकता कमी होते. वेगळ्या जागी ऑफिससारखा सेटअप तयार करा.
- आरामदायी खुर्ची आणि टेबल वापरा.
- उजेड आणि ताजी हवा मिळेल अशा ठिकाणी बसा.
- **फायदा:** लक्ष केंद्रित करायला मदत होते.
- शरीरदुखी आणि थकवा कमी होतो.

### ३. दिवसाचे वेळापत्रक तयार करा

- कामाच्या वेळेचं योग्य नियोजन असेल, तर दिवस अधिक उत्पादक ठरतो.
- महत्त्वाच्या कामांना प्राधान्य द्या.
- ब्रेक घेण्यासाठी ठराविक वेळ ठेवा.
- काम करण्यासाठी ठराविक टाईम ब्लॉक्स तयार करा.
- उदाहरण: सकाळी ९:०० ते ११:०० – महत्त्वाची मीटिंग किंवा फोकस काम
- ११:०० ते ११:१५ – चहा/कॉफी ब्रेक/ १:०० ते २:०० – लंच ब्रेक
- ४:१५ ते ६:०० – दिवसाची कामगिरी पूर्ण करणे

### ४. लक्ष विचलित होण्यापासून वाचण्यासाठी टिप्स

- घरगुती गोंधळ, सोशल मीडिया, टीव्ही किंवा फोन कॉल्स यामुळे सतत लक्ष विचलित होतं.
- फोन आणि सोशल मीडिया लिमिट करा.
- 'डू नॉट डिस्टर्ब' मोडचा वापर करा.
- वेबसाइट ब्लॉकर्स वापरा (Cold Turkey, Freedom).
- **फायदा:** अधिक फोकस्ड काम करता येईल.
- वेळेचा अपव्यय कमी होईल.

### ५. ब्रेक घ्या, पण योग्य प्रकारे

- काम आणि ब्रेक यामध्ये संतुलन असणं आवश्यक आहे. दर दोन तासांनी ५-१० मिनिटांचा ब्रेक घ्या.
- डोळ्यांना आणि शरीराला आराम द्या.
- थोडं चालणं किंवा स्ट्रेचिंग करा.
- **फायदा:** ताजेतवाने वाटते.
- कामाची उत्पादकता वाढते.

### ६. वर्क-लाइफ बॅलन्स साधा

- काम संपल्यावर ऑफिसची उपकरणं बाजूला ठेवा.
- फॅमिली किंवा स्वतःसाठी वेळ द्या.
- 'मीटिंग्स संपल्यावरही ऑनलाईन राहणं' टाळा.
- **उदाहरण:** "लॅपटॉप बंद झाला की, ऑफिस बंद झालं!"

### ७. स्वतःची काळजी घ्या (Self-Care)

- नियमित व्यायाम करा.
- योगा किंवा मेडिटेशन करा.
- आहारावर लक्ष द्या – जंक फूड टाळा.
- "तुमचं आरोग्य उत्तम असेल, तरच तुम्ही उत्तम काम करू शकाल!"

### ८. टीमसोबत संवाद ठेवा

- ऑनलाइन मीटिंग्समध्ये सहभागी व्हा.
- इ-मेल आणि मेसेजसाठी प्रोफेशनल टोन ठेवा.
- प्रश्न विचारायला संकोच करू नका.

### ९. काम संपल्यावर स्वतःला 'ऑफ' मोडमध्ये टाका

- काम संपल्यावर लॅपटॉप बंद करा.
- स्वतःला मानसिकरित्या 'ऑफ ड्युटी' समजा.
- कार्य आणि वैयक्तिक आयुष्य मिसळू देऊ नका.

### १०. मित्र-मैत्रिणींशी संवाद साधा

- काम संपल्यावर व्हिडिओ कॉल किंवा फोनवर गप्पा मारा. आपल्या दिवसाचा अनुभव शेअर करा.
- खऱ्या नात्यांमध्ये इन्व्हेस्ट करा.

### ११. स्वतःसाठी 'मी टाइम' ठेवा

- छंद जोपासा – वाचन, संगीत, गार्डनिंग.
- हलका व्यायाम, मेडिटेशन करा.
- स्वतःला ब्रेक द्या.

### १२. कुटुंबासोबत वेळ घालवा

- घरच्यांना तुमच्या वेळेचं महत्त्व समजावून सांगा.
- दिवसाच्या काही वेळ कुटुंबासाठी ठेवा.
- कामानंतर नातेवाईकांसोबत गप्पा मारा.

### १३. दररोज नवीन काहीतरी शिका

- ऑनलाईन कोर्सेस, वेबिनार अटेंड करा.
- करिअरसाठी उपयुक्त कौशल्य शिकायला सुरूवात करा. वाचनाची सवय लावा.
- वर्क फ्रॉम होम म्हणजे "फ्लेक्सिबल वर्किंग"
- ठराविक वेळेचं पालन करा.
- काम आणि वैयक्तिक आयुष्य यामध्ये योग्य समतोल ठेवा. स्वतःसाठी वेळ काढा आणि मानसिक-शारीरिक आरोग्य जपा.

# तरुण पिढी आणि व्यसनाधीनता

## एक गंभीर संकट

**आजच्या धावपळीच्या युगात तरुणांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. तंबाखू, मद्य, ड्रग्स, गुटखा, ई-सिगारेट (Vape), तसेच सोशल मीडिया आणि मोबाइलच्या अतिरेकामुळे अनेक तरुणांना व्यसन लागते. ही समस्या केवळ वैयक्तिक पातळीवर नाही, तर संपूर्ण समाजाच्या भविष्यासाठी धोकादायक आहे. म्हणूनच, ही समस्या गांभीर्याने घेऊन त्वरित उपाययोजना करणे आवश्यक आहे.**

प्रासंगिक
किरण काळे, ग्रंथपाल पुणे
राष्ट्रसंचार

### तरुणांमध्ये व्यसन कसे पसरते?

- 1. कुतूहल आणि मित्रांचा प्रभाव
- बहुतेक तरुण व्यसनाला सुरुवात कुतूहलातून किंवा मित्रांच्या दबावामुळे करतात. "फक्त एकदाच" हा विचार पुढे व्यसनाच्या जाळ्यात अडकवतो. समूहातील स्वीकार मिळवण्यासाठी किंवा "कूल" दिसण्यासाठीही अनेक जण याकडे वळतात.
- 2. मानसिक तणाव आणि ताणतणाव
- शिक्षण व करिअरची चिंता
- कौटुंबिक अडचणी
- आत्मविश्वासाचा अभाव
- यामुळे अनेक तरुण मानसिक ओढाताण अनुभवतात आणि यातून मुक्ती मिळवण्यासाठी व्यसनांचा आधार घेतात.
- 3. समाजमाध्यमे आणि चित्रपटांचा प्रभाव
- फिल्म, वेब सिरीज, जाहिराती आणि सोशल मीडियावर व्यसनाचे खुले प्रदर्शन होते. काही वेळा प्रसिद्ध व्यक्ती किंवा चित्रपटातील पात्रे व्यसन करताना दाखवली जातात, ज्याचा तरुणांच्या मानसिकतेवर मोठा प्रभाव पडतो.
- 4. व्यसनसामग्री सहज उपलब्ध असणे
- पूर्वी व्यसनसामग्री मिळवणे कठीण होते, परंतु आता ती ऑनलाइन आणि ऑफलाइन सहज उपलब्ध असल्याने, तरुणांना त्याचा सहज वापर करता येतो.

### व्यसनाचे दुष्परिणाम

- 1. शारीरिक आरोग्यावर परिणाम
- व्यसनामुळे शरीराची प्रतिकारशक्ती कमी होते.
- हृदयविकार, कर्करोग, फुफ्फुसांचे विकार, यकृताचे आजार वाढतात.
- चेहऱ्यावर पुळ्या येणे, वजन घटणे आणि अशक्तपणा जाणवतो.
- 2. मानसिक स्वास्थ्यावर परिणाम
- सतत व्यसन घेतल्याने डिप्रेशन, चिंता आणि चिडचिडेपणा वाढतो.
- स्मरणशक्ती आणि एकाग्रता कमी होते.
- 3. शिक्षण आणि करिअरची हानी
- व्यसनामुळे शालेय आणि महाविद्यालयीन उपस्थिती कमी होते.
- अभ्यासाकडे दुर्लक्ष होत असल्याने परीक्षेत अपयश येते आणि करिअर धोक्यात येते.
- 4. कौटुंबिक आणि सामाजिक नाते बिघडणे
- कुटुंबात तणाव, मतभेद आणि आर्थिक अडचणी निर्माण होतात.
- व्यसनाधीन व्यक्ती हळूहळू समाजापासून तुटू लागते.
- 5. गुन्हेगारीकडे कल
- काही तरुण व्यसनासाठी पैसे मिळवण्यासाठी चोरी, फसवणूक किंवा इतर गैरकृत्यांकडे वळतात.

### व्यसनापासून मुक्ती मिळवण्यासाठी उपाय

- 1. कुटुंबाचा पाठिंबा आणि संवाद
- मुलांसोबत संवाद वाढवावा, त्यांच्या समस्या जाणून घ्याव्यात.
- घरात सकारात्मक वातावरण ठेवावे, जेणेकरून मुलांना बाहेरच्या गोष्टींमध्ये रस वाटणार नाही.
- 2. शिक्षण आणि जनजागृती
- शाळा आणि महाविद्यालयांमध्ये व्यसनमुक्तीवर मार्गदर्शन कार्यक्रम घ्यावेत.
- तरुणांना व्यसनाचे दुष्परिणाम स्पष्टपणे समजावून सांगावे.
- 3. कठोर कायदे आणि अंमलबजावणी
- अल्पवयीन मुलांना तंबाखू, मद्य किंवा ड्रग्स विकणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी.
- व्यसनसामग्रीच्या जाहिरातींवर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.
- 4. पर्यायी गोष्टींमध्ये व्यस्तता निर्माण करणे
- मुलांना खेळ, कला, संगीत, छंद आणि अन्य सकारात्मक उपक्रमांकडे वळवावे.
- त्यांना स्वप्नांच्या दिशेने पुढे जाण्यासाठी प्रेरित करावे.
- 5. व्यसनमुक्ती केंद्रे आणि समुपदेशन
- गरज असेल तर व्यसनमुक्ती केंद्रांमध्ये उपचार घ्यावेत.
- समुपदेशक आणि मानसिक आरोग्य तज्ज्ञ यांचे मार्गदर्शन घेणे आवश्यक आहे.

# उन्हाळ्यात ओव्हरसाईज सनग्लासेसची क्रेझ

**उन्हाळा सुरू होताच फॅशनप्रेमींमध्ये स्टायलिश ॲक्सेसरीजची मागणी वाढते. उन्हाच्या कडक किरणांपासून डोळ्यांचे संरक्षण करणाऱ्या आणि लूकला ग्लॅमरस टच देणाऱ्या ओव्हरसाईज सनग्लासेसची क्रेझ सध्या तरुणींमध्ये चांगलीच वाढली आहे. हे मोठ्या आकाराचे सनग्लासेस डोळ्यांना आराम देतातच, पण एक फॅशन स्टेटमेंट म्हणूनही उठून दिसतात. ओव्हरसाईज सनग्लासेस हे उन्हाळ्यातील फॅशन आणि प्रॅक्टिकॅलिटी यांचा उत्तम मिलाफ आहेत. केवळ फॅशनेबल दिसण्यासाठीच नाही, तर डोळ्यांचे आणि त्वचेचे संरक्षण करण्यासाठीही ते महत्त्वाचे आहेत. वेगवेगळ्या प्रकारांच्या फ्रेम्स आणि लेन्स पर्यायांमुळे प्रत्येक तरुणी आपल्यासाठी योग्य सनग्लासेस सहज निवडू शकते. त्यामुळे या उन्हाळ्यात तुम्हीही तुमच्या स्टाईलमध्ये ओव्हरसाईज सनग्लासेसचा समावेश करून ट्रेंडी आणि कम्फर्टेबल लूक मिळवू शकता!**

## ओव्हरसाईज सनग्लासेस लोकप्रिय का झाले?

### फॅशन आणि फंक्शन यांचा परिपूर्ण मेळ

- मोठ्या फ्रेम्समुळे चेहऱ्याला बोल्ड आणि ट्रेंडी लूक मिळतो. शिवाय, डोळ्यांसोबतच आजूबाजूच्या नाजूक त्वचेलाही सुर्याच्या तीव्र किरणांपासून संरक्षण मिळते.
- वेगवेगळ्या चेहऱ्यांवर आकर्षक दिसणारे
- गोलसर, आयताकृती, हृदयाकृती – कोणत्याही चेहऱ्याच्या आकारावर ओव्हरसाईज सनग्लासेस चांगले दिसतात. ते चेहऱ्याचे योग्य प्रमाण राखतात आणि संपूर्ण लूकला उठाव देतात.
- ग्लॅमरस लूक सहज मिळतो
- फक्त एक ओव्हरसाईज सनग्लासेस लावले तरी कोणत्याही आउटफिटसोबत क्लासिक आणि एलिगंट लूक मिळतो. त्यामुळे अगदी साधा ड्रेसही आकर्षक दिसतो.
- वेगवेगळ्या प्रकारांचे सनग्लासेस आणि त्यांचे फायदे
- क्लासिक ब्लॅक ओव्हरसाईज सनग्लासेस
- कोणत्याही पोशाखावर शोभणारे आणि नेहमी ट्रेंडमध्ये राहणारे.
- ग्रेडिएंट लेन्स सनग्लासेस
- लेन्सचा वरचा भाग गडद आणि खालचा फिकट असल्याने स्टाइल आणि युटिलिटी दोन्ही मिळतात.
- मिरर लेन्स सनग्लासेस
- खूप उजेडात डोळ्यांचे उत्तम संरक्षण करणारे आणि फंकी लूक देणारे.
- कॅट-आय ओव्हरसाईज सनग्लासेस
- चेहऱ्याला उचल देणारे आणि फेमिनिन टच देणारे, विशेषतः लांबट चेहऱ्यांसाठी योग्य.
- राउंड फ्रेम ओव्हरसाईज सनग्लासेस
- चौकोनी किंवा आयताकृती चेहऱ्यांना सौम्य आणि संतुलित लूक देणारे.
- सनग्लासेस निवडताना लक्षात ठेवण्यासारखे मुद्दे
- चेहऱ्याचा आकार लक्षात घ्या
- गोलसर चेहरा असेल तर कोनयुक्त फ्रेम्स (जसे की स्क्वेअर किंवा रेक्टँग्युलर) वापराव्यात.
- चौकोनी चेहऱ्यांसाठी राउंड किंवा ओव्हल फ्रेम्स उत्तम असतात.
- ओव्हल चेहऱ्यासाठी कोणतेही फ्रेम्स शोभून दिसतात.
- यूव्ही संरक्षण असलेले सनग्लासेस निवडा
- डोळ्यांचे आणि त्वचेचे आरोग्य टिकवण्यासाठी उच्च दर्जाचे यूव्ही प्रोटेक्शन असलेले सनग्लासेस महत्त्वाचे आहेत.
- फ्रेमचा रंग त्वचेनुसार ठरवा
- गव्हाळ आणि उबदार त्वचेसाठी गोल्डन, ब्राउन किंवा टॉर्टोईज फ्रेम्स योग्य असतात.
- गोरी आणि थंड रंगछटांच्या त्वचेसाठी ब्लॅक, ब्लू किंवा सिल्व्हर फ्रेम्स अधिक उठून दिसतात.
- फिटिंग योग्य असणे गरजेचे
- सनग्लासेस नाकावर नीट बसले पाहिजेत आणि खूप जड वाटू नयेत.
- ओव्हरसाईज सनग्लासेस कसे स्टाइल करावे?
- कॅज्युअल लूक : टी-शर्ट, डेनिम जीन्स आणि ओव्हरसाईज सनग्लासेस – साध्या पोशाखालाही स्टायलिश टच मिळतो.
- फॉर्मल लूक : ऑफिसवेअर किंवा ब्लेझरसोबत सनग्लासेस परिधान केल्याने प्रोफेशनल आणि एलिगंट लूक मिळतो.
- बीच लूक : फ्लोई समर ड्रेस किंवा स्विमवेअरसोबत हे सनग्लासेस आकर्षक दिसतात.



फॅशन
ज्योती हांडगे, पुणे
राष्ट्रसंचार



# शेती किफायतशीर करण्यासाठी...

**माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी पाहिलेले नदीजोड प्रकल्पाचे स्वप्न महाराष्ट्रात साकार करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अलिकडेच केली. दुसरीकडे, केंद्रीय अर्थसंकल्पानंतर पंतप्रधान मोदी यांनी प्रथमच शेती समृद्ध करण्याचा विडा उचलला. या वर्षी कधी नव्हे ते महाराष्ट्रात फेब्रुवारी महिन्यामध्ये शहरे तसेच खेड्यांमध्ये पाणीटंचाई जाणवू लागली आहे.**



शेती
मिलिंद बेंडाळे
राष्ट्रसंचार

राज्यात अलिकडे शेतीच्या पाण्यासाठी बोअरवेल घेण्याकडे कल वाढला आहे. परंतु, तेदेखील आताच कोरडे पडू लागले आहेत. म्हणून शेतकऱ्यांनी उपाय शोधला असून ते आता सरकारी अनुदानाची वाट न पाहता स्वखर्चाने ठिबक सचन यंत्रणा बसवण्यास प्राधान्य देत आहेत. यापूर्वी ऊसशेतीसाठी कधीही या पद्धतीचा वापर झाला नव्हता. गेली 35 वर्षे महाराष्ट्र सरकार ठिबक सचन प्रकल्पांसाठी भरपूर अनुदान देत असून ऊस घेणाऱ्या शेतकऱ्यांनी याचा वापर केला नव्हता. परंतु या वर्षी मात्र ठिबक सचनाच्या वापरासाठी ऊस पिकवणारे शेतकरी धडपडत असल्याचे चित्र महाराष्ट्राच्या दृष्टीने खूपच आशादायी म्हणावे लागेल. गेल्या 35 वर्षांमध्ये राज्याची सचनक्षमता केवळ दोन टक्क्यांनी वाढली आहे. शेती समृद्ध करायची असल्यास पाण्याखेरीज गत्यंतर नाही, हे फडणवीस यांनी ओळखलेले दिसते. यापूर्वी राज्यात बरीच धरणे बांधून झाली आहेत. पण त्याचे जलस्त्रोत अपुरे पडू लागल्यामुळे अलिकडे दोन प्रकारच्या कल्पना पुढे आल्या होत्या. पहिली कल्पना घाटमाथ्यावरुन कोकणाकडे अर्थात समुद्राकडे वाहून जाणारे पाणी पूर्वेकडे वळवण्याची होती. परंतु, खर्चिक असल्यामुळे अनेक वर्ष उहापोह होऊनही कोणतेही सरकार त्यावर कार्यवाही करु शकलेले नाही. नदीजोड प्रकल्प त्यातल्या त्यात सोपा आणि कमी खर्चाचा आहे.

पंतप्रधान मोदी यांनी या वर्षी आपला अकरावा अर्थसंकल्प सादर केला आणि त्यामध्ये इतर घटकांप्रमाणे शेतीलाही महत्त्व दिल्याचे दिसले. भारतामध्ये पाण्याखालील शेतीचे क्षेत्र 34 टक्के आहे. वाजपेयी यांच्या स्वप्नाप्रमाणे हेच क्षेत्र नदीजोड प्रकल्पाद्वारे 50 टक्क्यांपर्यंत जाऊ शकते. अर्थात आता पंतप्रधानांनी नदीजोड प्रकल्पाची घोषणा केलेली नाही. परंतु शेती समृद्ध करणार असल्याचे ठाम आणि ठोसपणे सांगितले आहे. अर्थात पाण्याखेरीज शेती समृद्ध होऊ शकत नाही. त्यामुळे त्यांच्या मनात कोणत्या कल्पना दडल्या आहेत, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. येत्या काळात याबाबत स्पष्टता येण्याची आशा आहे. अर्थात यासंदर्भात त्यांनी एक चांगली घोषणा केली. ती शेतीमालाच्या निर्यात धोरणाविषयी फेरबदलाची आहे. इथे आपण कांद्याचे उदाहरण घेऊ. सर्वसामान्य शेतकरी पैशासाठी हे पीक मोठ्या प्रमाणावर घेतो. राज्यातील निवडणुकीच्या काळात कांद्याची निर्यात खुली केली गेली. त्यामुळे अनेक शेतकरी मालामाल झाले. अगदी कोरडवाहू क्षेत्रातील शेतकऱ्यांनीही मोटरगाड्या विकत घेतल्या. याचा अर्थ निर्यात धोरणामध्ये काही तरी चुकीचे आहे, हे पंतप्रधानांना पटले असावे.

आपण सुमारे एक लाख कोटी रुपयांचे खाद्यतेल आयात करतो. मागील अर्थसंकल्पामध्ये डाळी आणि तेलबियांचे उत्पन्न वाढवण्यासाठी अर्थमंत्र्यांनी बऱ्याच प्रोत्साहनात्मक तरतुदी जाहीर केल्या होत्या. परंतु, अपेक्षित परिणाम दिसला नाही. याचे कारण देशात पिके शकणारे शेतीमालाचे 200 प्रकार बाहेरच्या देशांमधून आयात करत आहोत. म्हणजेच स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपावेतो शेतीमालाबाबतचे आपले आयात-निर्यातीचे धोरण परंपरागत पद्धतीचे राहिले आहे. आता याची जाणीव पंतप्रधानांना झाली आहे.


### क्रांती घडवून आणू

- इस्त्रायल हा देश आपल्याकडील दोन जिल्ह्यांएवढा असला तरी शेतीक्षेत्रात योग्य निर्यात धोरण अवलंबून, अभ्यास करुन, मालाची टंचाई असणाऱ्या ठिकाणी तो माल पोहोचवून शेती समृद्ध करु शकतो. तर तेच मॉडेल कवा त्यापेक्षा वेगळे आयात-निर्यात धोरण अवलंबून पंतप्रधानांना शेती समृद्ध करण्यासाठी मार्ग अवलंबावे लागतील. इस्त्रायलप्रमाणेच नेदरलँड आणि न्युझिलंड या देशांनी दूधक्षेत्रातील निर्यातीमध्ये कमालीची उंची गाठली आहे. आपण अजूनही नेदरलँडकडून दुधाच्या भुकटीची आयात करतो. याचा अर्थ आपल्या दुग्धक्षेत्र आणि निर्यातीमध्ये समन्वय नाही. त्यामुळेच दुग्धक्षेत्रासाठी नवीन निर्यात धोरण आखणे गरजेचे वाटते.
- आपण देशाचा विचार न करता निर्यातीच्या दृष्टीकोनातून केवळ राज्याचा विचार केला तर काही उत्पादने निश्चितपणे ऑर्गेनिक म्हणून जाहिरात तंत्रज्ञान वापरुन, ब्रँड तयार करुन जगाच्या बाजारपेठेत लोकप्रिय करु शकतो. विदर्भ, मराठवाडा, खानदेशमध्ये पिकणारा कापूस हे त्यातील महत्त्वाचे उत्पादन ठरु शकेल. कारण कपड्यांच्या क्षेत्रातही ऑर्गेनिक कपडे वापरण्यातील उपयुक्तता परदेशी लोकांना पटली आहे. आजमितीला आपल्या वस्त्रोद्योगाची निर्यात नगण्य आहे. त्यामुळेच ऑर्गेनिक कापूस आणि वस्त्रोद्योग हातात हात घालून निर्यातीसाठी बाहेर पडल्यास विदर्भ, मराठवाडा आणि खानदेश हे भाग इस्त्रायलच्या शेतीप्रमाणे चमकू लागतील यात शंका नाही. त्याचप्रमाणे आपला मांस उद्योग आणि जनावरांची अफाट संख्या याचा मेळ घालून या उद्योगाला प्रेरणा दिली गेली तर भाकड जनावरे पाळण्याची वेळ कमी होऊन शेतकरी जनावरे धष्टपुष्ट करण्याकडे लक्ष वळवतील आणि या क्षेत्रातही क्रांती घडवून आणू शकतील. एकूणच आपण अन्नप्रक्रिया उद्योगामध्ये खूप कमी गुंतवणूक केली आहे. या क्षेत्रात आमूलाग्र बदल करण्याची गरज आहे.

### लहान शेतकऱ्यांचे महत्वाचे पाऊल

- महाराष्ट्र देशामध्ये फलोत्पादन आणि दूध क्षेत्रामध्ये प्रथम क्रमांकाचा प्रांत आहे. महत्त्वाचे म्हणजे ही क्रांती लहान लहान शेतकऱ्यांनी केली आहे. पण या बाबतीत कोकणच्या शेतकऱ्यांकडे अपेक्षित लक्ष दिले गेले नसल्यामुळे मलेशिया, इंडोनेशिया येथे सहज येणारा तेल्यामाड कोकणातही येऊ शकतो आणि आपली याबाबतची आयात थांबवून एक लाख कोटी वाचवू शकतो, याकडे कदाचित भविष्यात केंद्र तसेच राज्य सरकारचे लक्ष जाईल अशी अपेक्षा आहे. आपल्या तीनही बाजूंची समुद्रकिनारपट्टी तेल्यामाड उत्पादकाला पोषक असताना उत्पादन न वाढवता आपण आयात सुरू ठेवली. मात्र आता केंद्र शासनाच्या लक्षात आल्याने यावर इलाज केला जाण्याची चिन्हे दिसत आहेत. इस्त्रायलने वालुकामय उष्ण प्रदेश आणि पाण्याची टंचाई असूनही शेतीक्षेत्रात क्रांती करुन जगातील सर्व बाजारपेठांमध्ये शेतीमाल पाठवून आपल्या देशाला अत्यंत महत्त्वाचे परकीय चलन मिळवून दिले. त्याचप्रमाणे भारतही विचार करण्याची अपेक्षा आहे.

# "एज कॉम्प्युटिंग" २०२५++ चा क्रांतिकारी प्रवाह....






तंत्रज्ञान
डॉ. दीपक शिकारपूर
राष्ट्रसंचार
deepak@deepakshikarpur.com

तंत्रज्ञानात्मक प्रगतीचा वेग सध्याच चक्रावून टाकणारा झाला आहे असे आपण म्हणतो. आजचे हे बदललेले-बदलते जग दोनशे तर सोडाच पन्नास वर्षांपूर्वीच्या माणसांनाही ओळखू येणार नाही . ही सारी 'इंटरनेट ऑफ थिंग्ज' ह्या संकल्पनेची कमाल आहे. नजीकच्या भविष्यकाळातच व्यावहारिक पातळीवर प्रत्यक्षात येणाऱ्या ह्या तंत्रानुसार दैनंदिन वापरातल्या प्रत्येक वस्तूमध्ये एक 'टॅग' बसवलेली असेल. फक्त माहिती पुरवणारी सध्याची ही IoT साधने म्हणजे निव्वळ सुरूवात आहे. ह्यानंतरची पायरी म्हणजे स्मार्टफोनवरून दूरनियंत्रित होऊ शकणारी घरगुती उपकरणे (फ्रीज, दिवे इ.). वापरकर्त्याने आपल्या विशिष्ट गरजा एकदा स्मार्ट उपकरणांना सांगितल्या की ती उपकरणे एकमेकांशी 'बोलून' स्वतःच निर्णय घेऊ शकतात. ह्याखेरीज इ-पेमेंट, इ-सुविधा ह्यांसारख्या बऱ्याच गोष्टी आयओटी मुळे साध्य होत आहेत, असा अंदाज आहे की जगभर 55 अब्जहून अधिक स्मार्ट उपकरणे वापरली जातील.

हि अब्जावधी उपकरणे सतत कोट्यवधी टेरा बाइट्स मध्ये माहिती निर्माण करतील . त्याचे रिअल-टाइम म्हणजे प्रत्यक्ष वेळी मध्ये विश्लेषण करणे आवश्यक असेल. प्रचलित क्लाउड तंत्रज्ञान ज्यात वेगवान सर्व्हर्स वर माहिती साठवली जाते हे ह्यासाठी कुचकामी ठरेल . विश्लेषणासाठी हा सर्व डेटा सर्व्हर्स कडे पाठविण्यामुळे विलंब होऊ शकेल आणि कारवाई करण्यायोग्य अंतर्दृष्टीस मदत करण्यास उशीर होईल. हा उशीर अनेक प्रणालींच्या यशस्वी वापरासाठी घातक ठरू शकतो. उदा स्वयंचलित वाहने , मॅन्युफॅक्चरिंग यंत्रमानव युनिट्स किंवा कृत्तीम बुद्धिमत्ते नुसार चालणारी आरोग्यसेवा केंद्र इत्यादी . नेटवर्क संसाधनांचा वेगवान वापर करून वेगात पृथकरण करतेवेळी संगणकीय शक्ती सुधारण्यासाठी, एज कंप्यूटिंग हा नवीन प्रवाह आहे. ह्या तंत्रात नावाप्रमाणे नेटवर्कच्या परिघातच माहिती प्रक्रिया वा पृथकरण करते . स्मार्ट उपकरणाने निर्मित केलेला सर्व डेटा मूळ स्तोत्राजवळ प्रक्रिया आणि विश्लेषित केला जातो. एन्क्रिप्टेड (सांकेतिक) स्वरूपात आवश्यक प्रक्रिया केलेला डेटा नंतर सर्वर वर क्लाउड तंत्राप्रमाणे साठवणी साठी पाठविला जातो . हे तंत्रज्ञान संपूर्ण डेटा क्लाऊडवर पाठविण्याची गरज कमी करते व त्यामुळे साठवणीत व ऊर्जा व्यवस्थापनात मोठी बचत होते. माहितीचे विकेंद्रिकरण हे ह्याचे मूलतत्त्व असणार आहे. ह्या तंत्रानुसार संबंधित यंत्रणेला दिल्या जाणाऱ्या मर्यादित निर्णयक्षमतेमुळे देखील एकंदर चित्रावर मोठा आणि मनोरंजक परिणाम दिसू लागेल. ह्या तंत्राच्या वापरकर्त्यांना त्यांनी खरीदलेल्या किंवा वापरलेल्या वस्तू वा सुविधेबाबत अधिक माहिती तर मिळेलच शिवाय त्यासंबंधीच्या अनुषंगिक सेवांचीही माहिती मिळेल

सध्या एज तंत्राचा वापर डेटा सेंटर, तेल आणि गॅस उद्योग, स्मार्ट ग्रिड, व्हिडिओ वितरण, आरोग्य सेवा, स्वायत्त वाहने, रहदारी व्यवस्थापन, सार्वजनिक सुरक्षा इत्यादी क्षेत्रात केला जात आहे . अर्थात हे सारे स्वप्नरंजन एका अत्यंत भक्कम, सर्वव्यापी आणि व्यावहारिकदृष्ट्या यशस्वी तसेच शक्यतेच्या पायावर उभे असणे अनिवार्य आहे.

जगातल्या जवळजवळ सर्वच वस्तू ह्या तंत्रामध्ये समाविष्ट केल्या जाण्याची शक्यता असल्याने मुळात भरवशाची इंटरनेट सेवा आणि संगणकीय क्षमता सर्वत्र अत्यंत कमी दराने मिळणे आवश्यक आहे, तसेच सर्व प्रकारचे ऑनलाइन संभाषण, व्यवहार आणि त्यासंबंधीची मानके आणि निकष ह्यांमध्ये परिवर्तन आणि विकास घडून येणे देखील. अनेक प्रकारची सॉफ्टवेअर्स, ऍप्लिकेशन्स, मोबाइल फोन्स ह्यांमध्ये दडलेली विविध प्रकारची माहिती सतत विनाअडथळा - आणि तरीही पुरेशी सुरक्षितता बाळगून – इतरत्र पाठवायची असल्याने त्यासंबंधीचे लॉगइन, फायरवॉल, ब्लॉकर्स अशांसारखे ओळखपडताळणीचे अडथळे ओलांडण्यासाठी काहीतरी पद्धत ठरवावी लागेल. शिवाय संभाषण-क्षमता हाताळणारी इलेक्ट्रॉनिक यंत्रणाही – सूक्ष्मरूपात असली तरी – स्वस्त असली पाहिजे कारण एतकर ती मोठ्या संख्येने लागेल आणि तिच्यात बहुधा वेळोवेळी सुधारणा करावी लागेल. ह्यासाठीच कमीतकमी ऊर्जा वापरून काम करणाऱ्या एंबेडेड् चिप्स बनवण्याचे काम वेगाने चालू आहे.

ग्राहकोपयोगी इलेक्ट्रॉनिक वस्तूमध्ये कमी अंतरापर्यंत चालणाऱ्या संवाहकतेची (शॉर्ट रेंज कनेक्टिव्हिटी) सुविधा पुरवलेली असणे (उदा. NFC – निअर फील्ड कम्युनिकेशन) ही काळाची गरज बनणार आहे आणि उत्पादक त्यानुसार पावले उचलत आहेत. आता कोणी शंका विचारेल की अगदी पालकाच्या जुडीपासून महागड्या गाडीपर्यंत सर्वच वस्तूंना इंटरनेटवर आणायचे असेल तर तेवढे आयपी ऍड्रेस उपलब्ध व्हायला नकोत का? तर ह्यच समस्येवर उत्तर म्हणून IPV6 इंटरनेट प्रणालीवर सुमारे ३४०० दशअब्ज ऑनलाइन ऍड्रेस मिळू शकणार आहेत.

.ह्या तंत्रज्ञानाची ओळख करून घेऊन व्यावसायिक उपयोगी ऍप्स विकसित करणे व त्याची सांगड मोठ्या सिस्टीम मध्ये अंतर्भूत करणे हे एक महत्वाचे करिअर होऊ शकते. अशा रीतीने ही एक नवीनच इंटरनेट-आधारित अर्थव्यवस्था आणि पर्यावरण उभे राहणार आहे - आणि येत्या काही दशकांत ते विलक्षण वेगाने वाढणारही आहे. उत्पादक आणि उपभोक्ता ह्यांमध्ये हा डिजिटल संवादच प्रस्थापित होणार आहे

# रिकाम्या पोटी चुकूनही 'हे' खाऊ नका

**आरोग्यासाठी अन्न किती महत्वाचे आहे हे सर्वांना माहीत आहे. प्रत्येक गोष्ट खाण्याची योग्य वेळ असते. रिकाम्या पोटी कोणतेही आम्लयुक्त अन्न आतड्याच्या अस्तरावर परिणाम करते आणि यामुळे संसर्गाचा धोका असतो. आरोग्य तज्ञ विशेषतः काही पदार्थ रिकाम्या पोटी खाण्यास प्रतिबंधित करतात. अशाच काही पदार्थांबद्दल जाणून घेवूया. बराच वेळ झोपल्यानंतर जेव्हा तुम्ही जागे होता तेव्हा पचनसंस्था काम करू लागते, परंतु त्यासाठी थोडा वेळ दिला पाहिजे आणि उठल्यानंतर किमान २ तासांनी नाश्ता केला पाहिजे. आता असे कोणते पदार्थ आहेत जे रिकाम्या पोटी खाऊ नयेत, ते जाणून घेऊया.**

**१. मसालेदार जेवण :** रिकाम्या पोटी मसाले आणि मिरच्या खाल्ल्याने पोटाच्या अस्तराला त्रास होतो, ज्यामुळे आम्लीय प्रतिक्रिया आणि पोटात मुरडून येते. मसाले तिखट असतात, जे अपचन वाढवू शकतात. त्यामुळे सकाळी तिखट आणि मसालेदार पदार्थ टाळा. बरेच लोक समोसे, कचोरी, पकोडे इत्यादींचे सेवन करतात. सकाळच्या नाश्त्यात ते टाळा.



**२. ज्यूस :** आपल्यापैकी अनेकजण दिवसाची सुरुवात करण्यासाठी एक ग्लास फळांचा ज्यूस घेतात. परंतु हे अजिबात चांगले नाही कारण रिकाम्या पोटी ज्यूस पिल्याने पचनशक्तीवर विपरीत परिणाम होतो जे शरीरासाठी चांगले नाही.



**३. दही :** दह्यामध्ये लॅक्टिक ॲसिड असते, जे पोटातील ॲसिडिटी पातळीला त्रास देते. तसेच, रिकाम्या पोटी दुग्धजन्य पदार्थांचे सेवन केल्याने त्यातील लॅक्टिक ॲसिड पोटातील चांगले बॅक्टेरिया नष्ट करते, ज्यामुळे ॲसिडिटी वाढते, त्यामुळे सकाळी दही खाऊ नये.



**४. नाशपती :** नाशपतीमध्ये आढळणारे क्रूड फायबर पोटाच्या नाजूक अस्तराचे नुकसान करते. तसेच, नाशपती रिकाम्या पोटी खाल्ल्यास पोटदुखी होऊ शकते. त्यामुळे सकाळी रिकाम्या पोटी याचे सेवन टाळा. जर खायचे असेल तर सकाळी उठल्यानंतर २ तासांनी ओट्स किंवा दलिया सोबत खाऊ शकता.



**५. आंबट फळे :** योग्य वेळी खाल्ल्यासच फळे आरोग्यासाठी चांगली ठरतात. आंबट फळे रिकाम्या पोटी खाल्ल्याने ॲसिडचे उत्पादन वाढू शकते. फळांमध्ये भरपूर फायबर आणि फ्रक्टोज असते, जे रिकाम्या पोटी खाल्ल्यास पचनक्रिया मंदावते.



**६. कॉफी :** दिवसाची सुरुवात एक कप कॉफीने करणे सामान्य आहे. रिकाम्या पोटी कॉफी प्यायल्याने ॲसिडिटी होऊ शकते. रिकाम्या पोटी तिचे सेवन केल्याने पचनसंस्थेमध्ये हायड्रोक्लोरिक ॲसिडचे उत्पादन वाढू शकते, ज्यामुळे काहींना पोटाचा त्रास होऊ शकतो, म्हणून रिकाम्या पोटी कॉफी पिऊ नये



आरोग्य
डॉ. प्रमोद ढेरे
राष्ट्रसंचार




# देबजींना निरोप

अलिकडेच चित्रपटसृष्टीतून आलेली एक वाईट बातमी आपण ऐकली. काजोल आणि राणी मुखर्जी यांचे काका आणि प्रसिद्ध दिग्दर्शक अयान मुखर्जी यांचे वडील ज्येष्ठ अभिनेते देब मुखर्जी आता या जगात नाहीत. त्यांचे वयाच्या ८३ व्या वर्षी निधन झाले. या अभिनेत्याच्या निधनाने त्यांच्या कुटुंबाबरोबरच चित्रपटसृष्टीलाही मोठा धक्का बसला.



देब मुखर्जी काजोल आणि राणी मुखर्जी यांच्या खूप जवळ होते खेरीज ते आशुतोष गोवारीकर यांचे सासरे देखील होते. काका देब मुखर्जी यांच्या निधनानंतर काजोल आठवणींमध्ये हरवलेली दिसली. तिने आपल्या पोस्टमध्ये दु:ख व्यक्त केले. त्यात ती म्हणते, 'आता मी त्याच्याशिवाय जुळवून घेण्याचा प्रयत्न करत आहे....' देब मुखर्जी हे प्रसिद्ध समर्थ-मुखर्जी कुटुंबातील होते. ६० च्या दशकात 'तू ही मेरी जिंदगी' आणि 'अभिनेत्री' सारख्या चित्रपटांमध्ये छोट्या भूमिकांद्वारे त्यांनी कारकिर्दीची सुरुवात केली. यानंतर ते 'दो आँखें' आणि 'बातों बातों में' सारख्या मोठ्या चित्रपटांमध्येही दिसले. कारकिर्दीत नंतर त्यांनी 'जो जीता वही सिकंदर' आणि 'किंग अंकल' सारख्या चित्रपटांमध्ये सहाय्यक भूमिका केल्या. २००९ मध्ये विशाल भारद्वाज यांच्या 'कमीने' या चित्रपटात ते छोट्या भूमिकेत दिसले होते. हाच त्यांचा अखेरचा चित्रपट ठरला. देब मुखर्जी यांना भावपूर्ण श्रद्धांजली.



# ...तरीही जॉनने लक्ष वेधले

बॉलीवूड अभिनेता जॉन अब्राहम दमदार अभिनयामुळे चाहत्यांच्या मनावर राज्य करतो. अलिकडेच त्याचा 'द डिप्लोमॅट' चित्रपटगृहात प्रदर्शित झाला परंतु चित्रपटाला कोणताही मोठा व्यावसायिक फायदा झाल्याचे दिसले नाही. तथापि, चित्रपटात या अभिनेत्याच्या कामाचे मात्र खूप कौतुक झाले आहे. जॉन अब्राहमचा नुकताच प्रदर्शित झालेला हा चित्रपट आयएफएस अधिकारी जे. पी. सिंग यांच्या कथेवर आधारित एक राजकीय नाट्यमय चित्रपट आहे. यातील प्रमुख पात्राने तत्कालीन परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांच्या मदतीने पाकिस्तानातून एका मुलीला भारतात आणण्याचा प्रयत्न केला होता. हा चित्रपट विकी कौशलच्या 'छावा'शी स्पर्धा करेल, असे सांगितले जात होते. मात्र तसे काही घडताना दिसले नाही. जॉनच्या या चित्रपटाने पहिले तीन दिवस चांगला गल्ला जमवला मात्र चौथ्या दिवसापासून कमाईचा आलेख झपाट्याने खाली येत गेला. या चित्रपटाने आतापर्यंत १.५० कोटी रुपये कमावले आहेत. आता येत्या काळात जॉन अब्राहमच्या चित्रपटाचे कलेक्शन वाढते की नाही हे पाहणे रंजक ठरेल.



# अल्लू अर्जुनची हवा

बॉक्स ऑफिसवर 'पुष्पा २' सारखा ब्लॉकबस्टर चित्रपट दिल्यानंतर अल्लू अर्जुनचा चित्रपट उद्योगात मोठा प्रभाव पडला आहे. अभिनेत्याच्या आगामी चित्रपटाची सर्वांनाच उत्सुकता आहे. आता अल्लू थेट दिग्दर्शक सुकुमार यांच्या 'पुष्पा ३ द रॅम्पेज' मध्येच दिसणार असल्याचे अनेकांचे मत होते. पण 'पुष्पा ३' च्या आधी अल्लू अर्जुनचे दोन नवीन चित्रपट थिएटरमध्ये प्रदर्शित होतील. त्यात 'जवान' सारखे मेगा ब्लॉकबस्टर चित्रपट देणारे दिग्दर्शक ॲटली यांच्यासोबत शाहरुख खान एका नवीन चित्रपटाची तयारी करत असल्याची बातमी आहे. कदाचित त्यामध्ये अल्लू अर्जुन दिसू शकतो. म्हणजेच पठाणच्या सिक्केलमध्ये अल्लू खलनायकाच्या भूमिकेत दिसू शकतो. हे खरोखर घडले तर चित्रपट प्रेमींसाठी निश्चितच एक खास मेजवानी असेल. या चित्रपटाच्या शीर्षकाबाबत अद्याप कोणतीही पुष्टी झालेली नाही. पण ती लवकरच होईल. खेरीज निर्माते रवि शंकर यांनीही अल्लू अर्जुनच्या पुढील चित्रपटांबद्दलचे चित्र स्पष्ट केले आहे. एवढेच नाही तर ॲटलीच्या चित्रपटानंतर तो दक्षिणेतील चित्रपट निर्माते त्रिविक्रम श्रीनिवास यांच्या चित्रपटातही दिसणार आहे. अर्थात हा चित्रपट बनवण्यासाठी आणखी दोन वर्षे लागतील.

# 'आशी'ने आशा वाढवल्या

चित्रसृष्टीत पंकज त्रिपाठी या नावाची वेगळी ओळख आहे. उत्तम आणि दर्जेदार अभिनेता असणाऱ्या पंकज यांचे अनेक चाहते आहेत. मात्र त्यांची मुलगी आशी देखील कोणत्याही स्टारपेक्षा कमी नाही. तिचे सौंदर्य पाहणाऱ्याची नजर खिळवून ठेवणारे आहे. त्यामुळेच तीदेखील पित्याचा अभिनयाचा वारसा चालवेल, अशी चाहत्यांची अपेक्षा आहे. साधेपणाची आवड असणारी आशी आतापर्यंत अभिनय आणि पडद्यापासून दूर असली तरी ती सोशल मीडियावर सक्रिय आहे. आत्तापर्यंत पालकांसोबत सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये दिसायची तेव्हा सर्वांच्याच नजरा तिच्यावर खिळून असायच्या. मात्र आता ती मनोरंजनविश्वातील पदार्पणामुळे चर्चेत आहे. 'रंग दारो' या म्युझिक व्हिडिओद्वारे आशीने पडद्यावर पदार्पण केले आहे. हे गाणे अलिकडेच रिलीज झाले असून सर्वत्र चर्चेत आहे.

'रंग दारो' मध्ये आशी त्रिपाठी सुंदर दिसते. विशेषतः आशीच्या साधेपणाने लोकांना प्रभावित केले आहे. या गाण्यात तिच्याबरोबर प्रभाकर स्वामी आहे. हे गाणे मैनक भट्टाचार्य आणि संजना रामनारायण यांनी गायले असून अभिनव आर. कौशिक यांनी संगीत दिले आहे. व्हिडिओमध्ये आशीच्या अदाकारीचे कौतुक होत आहे.

प्रतिक्रिया देणाऱ्या एकाने 'किती सुंदर आहे ही, वाईट नजरेचा तिच्यावर परिणाम होऊ नये' असे लिहिले आहे तर दुसऱ्याने 'तिला वडिलांप्रमाणेच साधेपणा आवडतो असे दिसते. या साधेपणामुळे एकदिवस ती प्रख्यात अभिनेत्री होईल...' असे मत आणि शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत. तेव्हा चित्रसृष्टीला लवकरच नवी आणि मोहक अभिनेत्री लाभण्याची शक्यता निर्माण झाली आहे, असे आपण म्हणू शकतो.



# 'सूरज' आता रुपेरी पडद्यावर

'बिग बॉस मराठी ५' च्या विनर ट्रॉफीवर सूरज चव्हाणने आपलं नाव कोरलं आणि चर्चेच्या केंद्रस्थानी आला. या शोद्वारे सूरजने लाखो चाहत्यांची मनं जिंकली असून आता तो पुन्हा एकदा जलवा दाखवायला सज्ज झाला आहे. केदार शिंदे दिग्दर्शित 'झापुक झुपूक'चा धमाकेदार टीझर रिलीज झाला असून त्यात सूरज भाव खाऊन जात असल्याचे दिसत आहे. लवकरच तो 'झापुक झुपूक' या त्याच्या पहिल्या मराठी सिनेमात दिसणार आहे. जिओ स्टुडिओज् प्रस्तुत आणि केदार शिंदे प्रोडक्शन्स निर्मित या चित्रपटाची प्रेक्षकांना प्रतीक्षा आहे.

सूरजचा यात एक प्रसिद्ध डायलॉग आहे. तो म्हणतो, 'मार्केट गाजवायला आणि पोरीला लाजवायला सूरज चव्हाणच्या नजरेतच दम आहे'. 'झापुक झुपूक' सिनेमाच्या टिझरमध्ये त्याची ही अदा दिसते आहे. त्याचबरोबर टिझरमध्ये सूरजची कॉमेडी, हटके स्टाईल, त्याचा भन्नाट अभिनय आणि फुल्ल ऑन मनोरंजनचा तडाखा हे कॉम्बिनेशन दिसते आहे. त्यामुळेच हा सगळा मालमसाला सिनेमामध्ये अनुभवायला मिळेल. हालाखीच्या परिस्थितीतून वर येऊन सूरजने प्रसिद्धी मिळवली आणि माणुसकीही जपली. त्याची हीच मेहनत आता यश देऊन जाणार आहे. एकूणच ग्रामीण भागातील हा मुलगा सध्या भरपूर चर्चेत आहे. मराठी मातीतल्या साध्याभोळ्या सूरजसाठी प्रेक्षकांमध्ये कमालीची क्रेझ निर्माण झाली आहे.

सूरज चव्हाणसोबत या चित्रपटात अनेक मराठी कलाकार दिसतील. त्यात जुई भागवत, इंद्रनील कामत, हेमंत फरांदे, पायल जाधव, पुष्कराज चिरपुटकर, मिलिंद गवळी आणि दीपाली पानसरे हे मुख्य भूमिकेत झळकणार आहेत. अलिकडेच सूरजने जेजुरीच्या खंडोबाचे, आईमरी मातेचे आणि मोरगावच्या गणपतीबाप्पाचे दर्शन घेत सिनेमाच्या प्रमोशनची जोरदार सुरुवात केली. 'झापुक झुपूक' येत्या २५ एप्रिल २०२५ रोजी महाराष्ट्रातील सिनेमागृहामध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.




# म्हातारा इतुका ना...

प्रेमाला वय नसते असे म्हणतात. या वाक्यातील मर्म कोणाला पटत असेल तर तो आमिर खान आहे, असेच आता म्हणावे लागेल. कारण लग्नानंतर १६ वर्षांनी त्याने पहिली पत्नी रीना दत्ता हिच्याशी घटस्फोट घेतला. त्यानंतर किरण रावने त्याच्या आयुष्यात प्रवेश केला. 'दिल चाहता है' च्या सेटवर तो तिच्या प्रेमात पडला. मात्र नंतर तो तिच्यापासूनही वेगळा झाला. आता बॉलिवूडचा हा 'मिस्टर परफेक्शनिस्ट' वयाच्या ६० व्या वर्षी तिसऱ्यांदा प्रेमात पडला आहे. अलीकडेच 'पीके' च्या या अभिनेत्याने ६० व्या वाढदिवशी नवीन प्रेयसीची म्हणजेच गौरीची मीडियासमोर ओळख करून दिली. दरवर्षीप्रमाणे वाढदिवसाच्या निमित्ताने आमिर खानने मीडियाला मुंबईतील कार्टर रोड येथील निवासस्थानी आमंत्रित केले आणि त्यांच्यासमोर केक कापला. याच प्रसंगी त्याने आपल्या प्रेयसीची ओळख करून दिली तर गौरीनेही तिच्या मनातील गोष्टी उघडपणे सांगितल्या. मी अशाच व्यक्तीच्या शोधात होतो जी दयाळू आणि स्वच्छ हृदयाची आहे, काळजी घेणारी आहे असे त्याने गौरीकडे बघत स्पष्ट केले आणि तिच्यावरील प्रेमाची कबुली दिली. गौरी स्प्रेट ही आमिरची नवी प्रेयसी बंगळुरूमध्ये वाढली आहे. तुला वेगवेगळ्या प्रकारचे चित्रपट आणि कलांमध्ये रस आहे. मात्र असे असले तरी ती फारसे हिंदी चित्रपट पाहत नाही. हे स्पष्ट करताना आमिर खानने असेही सांगितले की, गौरीने कदाचित त्याचे कोणतेही चित्रपट पाहिले नसतील. यावर उत्तर देताना गौरीने लगेच आमिर खानला सांगितले की तिने त्याचे 'दिल चाहता है' आणि 'लगान' हे दोन्ही चित्रपट पाहिले आहेत. तथापि, गौरीने आपला 'तारे जमीन पर' चित्रपट अवश्य पहावा अशी इच्छा आमिरने यावेळी व्यक्त केली.



आमिर खान आणि गौरी जवळजवळ २५ वर्षांपासून एकमकांना ओळखत असले तरी ते एकमेकांच्या फारसे संपर्कात नव्हते. मात्र दोन वर्षांपूर्वी काही कामानिमित्त ते एकमेकांना भेटले आणि चांगली मैत्री झाली. नंतर ते एकमेकांच्या प्रेमात पडले. गौरी आमिर खानच्या निर्मिती कंपनीत काम करते. आता हे दोघे कधी लग्नबंधनात अडकतात याची आमिरच्या चाहत्यांना उत्सुकता आहे.



# चर्चेतील 'कोटा फॅक्टरी'

राजस्थानमधील कोटा हे जेईई आणि नीट परीक्षांची तयारी करणाऱ्या कोचिंग सेंटर्सचे केंद्र असल्याचे म्हटले जाते. आपल्या मुलांना इंजिनिअर किंवा डॉक्टर बनवायचे असलेले पालक त्यांना कोटा येथे पाठवतात. इथे विद्यार्थी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दिवसरात्र मेहनत करतात. या पार्श्वभूमीवर आधारित 'कोटा फॅक्टरी' सिरीज प्रवेश परीक्षेची तयारी करताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या दबावांची आणि समस्यांची कहाणी सांगते.

विद्यार्थ्यांच्या जीवनातील भावनिक आणि मानसिक पैलूंचे सखोल चित्रण करणारा 'कोटा फॅक्टरी' हा चित्रपट पहिल्यांदा २०१९ मध्ये प्रदर्शित झाला. नंतर तो टीव्हीएफ प्ले आणि यूट्यूबवर प्रदर्शित झाला. नंतर दुसरे आणि तिसरे सीझन नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाले. आता प्रेक्षक चौथ्या सीझनची वाट पाहत आहोत. हा सीझन पुढच्या वर्षी म्हणजे २०२६ मध्ये रिलीज होऊ शकतो. दुसऱ्या आणि तिसऱ्या सीझनप्रमाणे तो फक्त नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होईल.

तिसऱ्या सीझनच्या शेवटी वैभव त्याच्या आयआयटी परीक्षेत नापास होतो आणि त्याचा खोलवर परिणाम होतो हे दाखवले जाते. आता वैभवचे भविष्य आणि त्याचा पुढील प्रवास चौथ्या सीझनमध्ये दाखवला जाऊ शकतो. तो कोटामध्ये राहून पुन्हा प्रयत्न करतो की दुसरा मार्ग निवडतो हे चौथ्या सीझनमध्ये दिसून येईल. अर्थात निर्मात्यांनी रिलीज डेट किंवा कथेबद्दल कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. जितेंद्र कुमार यांनी या मालिकेत मुख्य भूमिका साकारली असून तो या मालिकेत एका शिक्षकाची भूमिका साकारत आहे. खेरीज मालिकेत रेवती पिल्लई, मयूर मोरे, रंजन राज आणि अहसास चन्ना यांच्याही भूमिका आहेत. चौथ्या सीझनच्या स्टारकास्टमध्ये बदल होणार आहे की नाही हे अधिकृत घोषणेनंतरच कळेल.

# प्रत्यक्ष सहभाग की प्रमोशन?



नीरज पांडे यांच्या दिग्दर्शनाखाली आकार घेणाऱ्या 'खाकी: द बंगाल चॅप्टर' या वेब सिरीजबाबत नवनवीन अपडेट्स येत आहेत. त्यातही नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणाऱ्या या मालिकेशी एका लोकप्रिय क्रिकेटपटूचे नाव जोडले गेले आहे. तो दुसरा तिसरा कोणी नसून साक्षात सौरव गांगुली आहे. 'खाकी: द बंगाल चॅप्टर'मधून सौरव गांगुलीचा एक व्हिडिओ समोर आला असून त्यात तो खाकी गणवेशात दिसत आहे. प्रोमोमध्ये तो म्हणतो, 'तू बंगालवर एक शो करणार आहेस आणि बंगालच्या दादाला आमंत्रित करायला विसरला?.' यानंतर तो चित्रपटाच्या सेटवर पोहोचतो. जिथे दिग्दर्शक त्याला भूमिका देण्यास सहमत होतो. पात्राची चर्चा केली जाते तेव्हा त्याला राग दाखवण्यास सांगितले जाते. याला उत्तर म्हणून, गांगुली मोठ्याने ओरडू लागतो आणि सेटवरील वातावरण मजेदार होते... हे सगळे दाखवणारा प्रोमो सध्या चर्चेत आहे. प्रोमोमध्ये एक मोठा ट्विस्ट पाहायला मिळतो जेव्हा त्याला एका गुंडाला मारहाण करण्यास सांगितले गेले. यासाठी गांगुली त्याच्या प्रसिद्ध क्रिकेट शॉट्सची नावे घेतो. परंतु त्याला हे सर्व फक्त ८ सेकंदात करायचे असल्याचे सांगितले जाते तेव्हा तो ही भूमिका करण्यास नकार देतो. यानंतर, दिग्दर्शकाने त्याला मालिकेत सामील होण्यासाठी एक नवीन भूमिका देतो आणि तोदेखील लगेच तयार होतो. हे सर्व बघता गांगुली या मालिकेच्या कलाकारांचा भाग असेल पण त्याचे प्रमोशन करताना दिसेल अशी अटकळ आपण बांधू शकतो. नीरज पांडेच्या या बहुप्रतिक्षित मालिकेत रवी किशन, करण टॅकर, अविनाश तिवारी, अभिमन्यू सिंग आणि आशुतोष राणा हे कलाकार मुख्य भूमिकेत दिसत आहेत.



## ‘पीएमपी’च्या १७ कामगारांचे रक्तदान

**पुणे :** सामाजिक बांधिलकी जपत ‘पीएमपी’ प्रशासन दर महिन्याला आपल्या एका आगारात रक्तदान शिबिराचे आयोजन करते. अप्पर आगारात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. यात १७ कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला. राज्यात दरवर्षी उन्हाळ्यात रक्ताचा तुटवडा भासतो. हे लक्षात घेता ‘पीएमपी’ प्रशासन रक्तदान शिबिराचे आयोजन करते. ‘पीएमपी’च्या अध्यक्ष दीपा मुधोळ- मुंडे यांनी शिबिरातून संकलित झालेले रक्त ससून रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णांसाठी उपलब्ध करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार विविध आगारांत आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरातून संकलित केलेले रक्त ससून रुग्णालयास देण्यात येत आहे. या वेळी ‘पीएमपी’चे सहव्यवस्थापकीय संचालक नितीन नार्वेकर, मुख्यकार्यकारी अधिकारी प्रज्ञा पवार-पोतदार, मुख्य वाहतूक व्यवस्थापक दत्तात्रेय झेंडे, प्रशासन अधिकारी मोहन दडस, कामगार व जनता संपर्क अधिकारी किशोर चौहान, अप्पर आगाराचे व्यवस्थापक सचिन वाबळे आदी उपस्थित होते.



## ‘ऑर्केस्ट्रा’ आणि ‘नृत्योल्हास’ कार्यक्रम आज

**पुणे :** मुंबईतील ‘नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स’ (एनसीपीए) यांच्या ‘एनसीपीए अॅट दि पार्क’ उपक्रमांतर्गत रविवारी (दि. २३) पुण्यात ‘सिंफनी ऑर्केस्ट्रा ऑफ इंडिया’ आणि ‘नृत्योल्हास’ या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. नगर रस्त्यावरील फिनिक्स मार्केट सिटीमधील लिबर्टी स्क्वेअर येथे सायंकाळी ६.३० वाजता हे दोन्ही कार्यक्रम होणार आहेत. ‘सिंफनी ऑर्केस्ट्रा ऑफ इंडिया’च्या सादरीकरणात लोकप्रिय रचनांच्या माध्यमातून शास्त्रीय संगीताच्या समृद्ध परंपरांमधून आधुनिक कलाकृतींकडे होणारा प्रवास उलगडेल. यानंतर ‘नृत्योल्हास’ या कार्यक्रमात भरतनाट्यम नर्तक पी. प्रवीण कुमार, चिथकला स्कूल ऑफ डान्स यांचे सादरीकरण होईल. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

## ‘पुण्यश्लोक’ महानाट्याचा आज प्रयोग

**पुणे :** श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर यांची जयंती आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे रविवारी (ता. २३) ‘पुण्यश्लोक’ महानाट्याच्या प्रयोगाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार दुपारी १२ वाजता सदाशिव पेठेतील भरत नाट्य मंदिरात हा प्रयोग होणार आहे. याप्रसंगी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, सांस्कृतिक कार्यमंत्री अॅड. आशिष शेलार, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकात पाटील, क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, होळकर घराण्याचे वंशज महाराज यशवंतराव होळकर (तृतीय) आदी उपस्थित राहणार आहेत.



## एसटीच्या तीन अधिकाऱ्यांचे शुक्रवारी निलंबन



**पुणे :** स्वारगेट बस स्थानक परिसरात मंगळवार, २५ फेब्रुवारीला पहाटे एका महिलेवर झालेल्या अत्याचार प्रकरणाची गंभीर दखल घेऊन आपल्या कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी वरिष्ठ आगार व्यवस्थापक जयेश पाटील, कनिष्ठ आगार व्यवस्थापक पल्लवी पाटील व स्थानक प्रमुख मोहिनी ढगे या तीन अधिकाऱ्यांचे शुक्रवारी निलंबन करण्यात आले आहे.

तथापि, यापुढे प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत विशेषतः महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत महामंडळाच्या कोणत्याही स्तरावर हलगर्जीपणा केल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना अशाच प्रकारच्या शिक्षेस सामोरे जावे लागेल, असा इशारा परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिला आहे. पुणे येथील स्वारगेट बस स्थानकात २५ फेब्रुवारी रोजी शिवशाही एसटी बसमध्ये एका महिलेवर अत्याचार केल्याची घटना घडली. यासंदर्भात संबंधित महिलेने स्वारगेट पोलीस स्थानकात तक्रार दाखल केली होती. सदर घटनेची गंभीर दखल घेऊन संबंधित बस स्थानकावरील त्या वेळी कर्तव्यावर असंलेल्या स्थानक प्रमुख तसेच त्या आगाराचे प्रमुख यांची याप्रकरणी प्रवाशांच्या सुरक्षासंदर्भात हलगर्जीपणा दाखविल्याबद्दल विभागनिहाय चौकशी करावी, त्या चौकशीमध्ये ते दोषी आढळल्यास त्यांना तत्काळ निलंबित करावे, असे निर्देश एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना दिले होते. या बस स्थानकावर कार्यरत असलेले सर्व सुरक्षा रक्षक (22) यांना तत्काळ बदलण्यात यावे, तसेच त्यांच्याऐवजी दुसऱ्या सुरक्षा रक्षकांना नेमण्याची मागणी संबंधित सुरक्षा मंडळाला करावी, असे निर्देश दिले होते. त्यानुसार मार्च रोजी आपल्या कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी वरिष्ठ आगार व्यवस्थापक, कनिष्ठ आगार व्यवस्थापक, स्थानक प्रमुखांचे निलंबन करण्यात आले आहे.

# अखेर यशाला ‘गवसणी’...!



**पुणे** एनडीए येथे निवड होण्यासाठी तीन वेळेस लेखी परीक्षा दिली. परंतु, मुलाखतीमध्ये निवड झाली नाही अशा परिस्थितीतून स्वत:चा आत्मविश्वास ढळू न देता पुन्हा जोमाने अभ्यास करत एनसीसी कोट्यातून परीक्षा दिली. आणि लेफ्टनंट पदी निवड झाली, हे कौतुकास्पद यश आहे पिंपळे गुरव येथील चिंतामण बुरसे याचे...!

## सैन्यात भरती होण्याची आवड, तीन वेळा अपयश, चौथ्यावेळी यश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** आठवीत असल्यापासून पोस्टर्स पाहून भारतीय सैन्यात भरती होण्याची आवड निर्माण झाली. तेच ध्येय मनाशी बांधून सैन्यात भारती होण्याचे सातत्याने प्रयत्न केले. एनडीए येथे निवड होण्यासाठी तीन वेळेस लेखी परीक्षा दिली. परंतु, मुलाखतीमध्ये निवड झाली नाही अशा परिस्थितीतून स्वत:चा आत्मविश्वास ढळू न देता पुन्हा जोमाने अभ्यास करत एनसीसी कोट्यातून परीक्षा दिली. आणि लेफ्टनंट पदी निवड झाली, हे कौतुकास्पद यश आहे पिंपळे गुरव येथील चिंतामण बुरसे याचे...

देशसेवेसाठी लहानपणापासून भारतीय सैन्यात अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगत वयाच्या अवघ्या २३ व्या वर्षी भारतीय सैन्य दलात लेफ्टनंट पदी निवड झालेल्या पिंपळे गुरव येथील चिंतामण विष्णू बुरसे यांचा महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, चिंतामण बुरसे यांचे वडील विष्णू बुरसे,आई स्वाती बुरसे, विद्युत विभागातील प्रशांत जोशी हे उपस्थित होते.

# तमाशा कलावंतांनी आत्महत्या करावी का?

## लावणी सम्राज्ञी सुरेखा पुणेकर यांचा खडा सवाल; डान्स बार बंद करण्याची मागणी

पूर्वी गावच्या जत्रेत आणि एरव्हीही रात्रभर तमाशा सुरू असायचा; गावातील तमाशा शौकिन तमाशातील कलावंतांचे तोंडभरून कौतुक करायचे. गावात तमाशा आला म्हटले की ही लोककला पाहाण्यासाठी सारा गावच लोटायचा, त्यात बाया बापड्यांचाही लक्षणीय सहभाग होता. त्यामुळे त्यावेळी तमाशाला ‘लोकाश्रय’ आणि ‘राजाश्रय’ ही मिळत होता. मात्र; गेल्या काही वर्षात ही परिस्थिती बदलली असून राज्य आणि केंद्र शासनाने या कलेवर बंधने आणली आहेत. त्यातच डान्स बारवाल्यांनी तमाशाचा धंदाच पूर्ण बसविला असून त्यामुळे उपाशी मरायची वेळ आली आहे, ही परिस्थिती आता खूपच भयानक झाली आहे. त्यामुळे आता तमाशा कलावतांनी आत्महत्या करायची का? असा खडा सवाल लावणी सम्राज्ञी सुरेखा पुणेकर यांनी केला आहे.



### अशा आहेत तमाशा कलावतांच्या समस्या

- रात्री उशीरापर्यंत शासन, न्यायालयाने घातलेली बंधने
- लोकाश्रय मिळतोय पण राजाश्रय नाही
- कलावतांकडे पाहाण्याचा समाजाचा दृष्टीकोन
- कलावतांना मिळणारी अपमानास्पद वागणूक
- डान्सबारची वाढती संख्या
- करोना काळात डबघाईला आलेला व्यवसाय
- बँकाकडून कर्जासाठी मिळणारा नकार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यभरातील कला केंद्रामध्ये सर्रासपणे सुरू असलेले डान्स बार तातडीने बंद करण्याची मागणी लावणीसम्राज्ञी सुरेखा पुणेकर यांनी शुक्रवारी केली. कला केंद्रातील तबला, ढोलकी आणि पायपेटी ही वाद्ये आणि लावणी गायिका यांना वगळून तेथे डीजे वाजवून कला सादर केली जात असल्याने राज्यभरातील दहा हजार कलाकारांवर उपासमारीची वेळ आली आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. तसेच, ‘शेतकऱ्यांप्रमाणे कलाकारांनीही आत्महत्या करायची का,’ असा सवाल त्यांनी उपस्थित केला. या संदर्भात मंत्रालयासमोर उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

सुरेखा पुणेकर यांनी पत्रकार परिषदेत विविध मागण्या केल्या. अखिल महाराष्ट्र लोकनाट्य सांस्कृतिक कलाकार संघटनेचे अध्यक्ष धोंडीराम जावळे, विकास जावळेकर, चंद्रकांत लाखे या वेळी उपस्थित होते. पुणेकर म्हणाल्या, ‘माजी गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी राज्यातील डान्स बार बंद केल्यानंतर लावणी कलाकारांना दिलासा मिळाला होता.

मात्र, त्यानंतरच्या सरकारने आणि गृहमंत्र्यांनी कडक धोरण न राबविल्यामुळे डान्स बार पुन्हा सुरू झाले आहेत. तबला, ढोलकी आणि पायपेटी ही वाद्ये वाजविणारे वादक आणि लावणी गायिका अशा पारंपरिक पद्धतीने लोककला सादर करण्याच्या अटीवरच कला केंद्रांना परवाना दिला जातो. या गोष्टींनाच हरताळ फासला जात आहे. राज्यात संगीतबारीच्या ८२ पैकी निम्म्याहून अधिक कला केंद्रांमध्ये डीजे सुरू आहेत. त्यामुळे कला केंद्रातील कलाकारांवर उपासमारीची वेळ आली आहे.

जावळे म्हणाले, ‘पुण्यातील पाचही कला केंद्रांमध्ये डीजे सुरू आहेत. लातूर, अहिल्यानगर, जामखेड, बीड येथेही अशीच परिस्थिती आहे. याबाबत आम्ही वेळोवेळी संबंधित पोलिसांना निवेदन दिले. मात्र, त्यावर ठोस कारवाई होत नाही. याबाबत आम्ही संघटनेच्या वतीने सांस्कृतिकमंत्री आशिष शेलार यांची भेट घेऊन त्यांच्या हे निदर्शनास आणून दिले आहे. आम्हाला सरकारकडून ठोस कारवाईची अपेक्षा आहे.

# आणखी पाच वर्षे टोलवाढ नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील टोलनाक्यावर २०३० पर्यंत टोलवाढ होणार नसल्याचे राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) स्पष्ट केले आहे. त्यामुळे द्रुतगती मार्गावरून वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांना दिलासा मिळाला आहे.

राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अखत्यारित असलेल्या टोल नाक्यांवरील रकमेत यंदा टोलवाढ झाली आहे. मात्र, पुणे - मुंबई द्रुतगती मार्ग हा ‘एमएसआरडीसी’च्या अखत्यारित आहे. तेथील टोलवाढीचे सूत्र १ एप्रिल २००५ रोजीच निश्चित करण्यात आले आहे.या रस्त्यावर अखेरची टोलवाढ १ एप्रिल २०२३ मध्ये झाली आहे. आता ३० एप्रिल २०३० पर्यंत या रस्त्यावर कोणतीही वाढ टोलवाढ होणार नाही, असे ‘एमएसआरडीसी’च्या अधिकृत सूत्रांनी स्पष्ट केले आहे.

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५

**जाहीर नोटीस**
मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ४९९/२०२४/५७२३

**अर्जदार**
केसर गार्डन सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः सेक्टर नं. ३, प्लॉट नं. ७२/२, अ, प्राधिकरण भोसरी, ता. हवेली जि. पुणे- ४११०३९.
तर्फे, अध्यक्षः श्री. विशाल भिमराव बाविस्कर, सचिव : श्री. ज्ञानेश्वर पांडूरंग चिमटे
खजिनदारः श्री. ज्ञानेश्वर रामभाऊ शिंदे
**विरुध्द**
गैरअर्जदार / जमिनमालक
विकसक / जाब देणार नं. १
१. मे. श्री एंटरप्रायजेस, नोंदणीकृत भागीदारी संस्था, तर्फे भागीदार,
अ. श्री. अमित आर. पटेल, ब. श्री. ईलेश सी. पटेल
पत्ता- फ्लॅट नं. ए ८/६ जलवायु विहार, ग्रीनलॅण्ड, मोशी प्राधिकरण, ता. हवेली जि. पुणे- ४१२१०५.
मुळ जागा मालक / जाब देणार नं. २
२.पिंपरी चिंचवड महानगरपालिका, भुसंपादन विभाग, (पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण)
पत्ता- जुनी पी. सी. एन. टी. डी. ए. बिल्डींग, आकुर्डी, ता- हवेली, जि - पुणे- ४११०३५.
भाडेपट्टाधारक / मान्यता देणार / जाब देणार नं. ३
३.ए. श्री. यशवंत शंकर लांडगे, बी. श्री. छाबु शंकर लांडगे, सी. श्री. जगन्नाथ परशुराम शेलके
डी. मौजाबाई भाऊसाहेब परांडे, ई. श्री. बाळु ज्ञानोबा लांडगे, एफ. श्री. बाबाजी ज्ञानोबा लांडगे
जी. श्री. सुदाम महादु लांडगे, जाब देणार नं. ३ ए ते जी सर्व रा. मु.पो. भोसरी, ता. हवेली, जी - पुणे- ४११०३९. (जाब देणार नं. २ तर्फे कु. मु. धारक म्हणुन जा. देणार नं. १)
उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये केसर गार्डन सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ताः सेक्टर नं. ३, प्लॉट नं. ७२/२, अ, प्राधिकरण भोसरी, ता. हवेली जि. पुणे - ४११०३९ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ४९९/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १३/०३/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे अॅड. समृध्दी कोठारी हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते ३ गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ३ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक ०२/०४/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ३ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
पुणे, दिनांकः २१/०३/२०२५.
शिक्का
सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

# पुणे ते नागपूरदरम्यान रेल्वेच्या विशेष ४८ फेऱ्या

**पुणे :** प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता रेल्वे प्रशासनाने पुणे ते नागपूरदरम्यान रेल्वेच्या विशेष ४८ फेऱ्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे प्रवाशांची मोठी सोय होणार आहे.



### अशा आहेत फेऱ्या

- गाडी क्रमांक ०१४६९ : ही रेल्वे ८ एप्रिल ते २४ जूनदरम्यान दर मंगळवारी पुण्याहून दुपारी ३ वाजून ५० मिनिटांनी सुटेल. नागपूरला दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजून ३० मिनिटांनी पोहचेल. (१२ फेऱ्या)
- गाडी क्रमांक ०१४७० ही रेल्वे ९ एप्रिल ते २५ जूनदरम्यान नागपूर येथून दर बुधवारी सकाळी ८ वाजता सुटेल. पुण्याला त्याच दिवशी रात्री ११ वाजून ३० मिनिटांनी पोहचेल. (१२ फेऱ्या).

### पुणे - नागपूर अतिजलद विशेष रेल्वे

- गाडी क्रमांक ०१४६७ ही अतिजलद विशेष रेल्वे ९ एप्रिल ते २५ जूनपर्यंत दर बुधवारी पुण्याहून दुपारी ३ वाजून ५० मिनिटांनी सुटेल. नागपूरला दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजून ३० मिनिटांनी पोहचेल. (१२ फेऱ्या).
- गाडी क्रमांक ०१४६८ही रेल्वे १० एप्रिल ते २६ जूनदरम्यान दर गुरुवारी नागपूर येथून सकाळी ८ वाजता सुटेल. पुण्याला त्याच दिवशी रात्री ११ वाजून ३० मिनिटांनी पोहचेल. (१२ फेऱ्या)

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५

**जाहीर नोटीस**
मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ५७/२०२५/५७२२

**अर्जदार**
“गोविंद धाम “ए” सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः स.नं. 58/3 (पैकी), रहाटणी, ता. हवेली, जि. पुणे - 411017.
तर्फे, अध्यक्षः श्री. तानाजी ज्ञानदेव संकपाळ, सचिव : श्री. संतोष नलावडे
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
विकसक / प्रवर्तक/ जागा मालक / जाब देणार नं. 1
१. श्री. पोपट साधू कापसे, १ अ. सौ. चंद्रभागा पोपट कापसे, १ ब. श्री. निखील पोपट कापसे जाब देणार नं. १ ते १ब रा. रहाटणी, ता. हवेली जि. पुणे-४११०१७.
मान्यता देणार / जाब देणार नं. २
२. मे. शिवम असोसिएटस्, नोंदणीकृत भागीदारी संस्था,
ऑफिस पत्ता- पूजा क्लासिक, शॉप नं. ९, बेसमेंट प्लॉट नं. ५, ए.डी.सी. प्राधिकरण, पुणे - ४११०४४.
तर्फे भागीदार, अ. श्री. शिवाजी दिनकर शिउडकर,
रा. स.नं. 141/1, गुरुद्वार रोड, वाल्हेकरवाडी, चिंचवड, ता. हवेली जि. पुणे - ४११०३३.
ब. श्री. मदन जवाहरलाल शहदाद पुरी, रा. डी- ३/४, पिंपरी कॅम्प, पिंपरी, ता. हवेली जि. पुणे - ४११०१७. इतर संस्था / जाब देणार नं. ३
३. “गोविंद धाम बी विंग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित “
पत्ताः स.नं. ५८/३ (पैकी), रहाटणी, ता. हवेली, जि. पुणे - ४११०१७.
उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये “गोविंद धाम “ए” सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ताः स.नं. ५८/३ (पैकी), रहाटणी, ता. हवेली, जि. पुणे - ४११०१७ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ५७/२०२५ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १२/०३/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे अॅड. आदिती कुलकर्णी हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते ३ गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ३ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक ०२/०४/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ३ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
पुणे, दिनांकः २१/०३/२०२५.
सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.
शिक्का

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५

**जाहीर नोटीस**
मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ३४२/२०२४/५७२६

**अर्जदार**
शालोम सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः स.नं. ३१अ+३१ब, फायनल प्लॉट नं. 397, शंकरशेट रोड, स्वारगेट, जि. पुणे-४११०३७.
तर्फे, अध्यक्ष : श्री. प्रशांत सुशिल साठे, सचिवः सौ. रिबेका नितीन मगर
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
१. द बॉम्बे डायोसेशन ट्रस्ट असोसिएशन प्रा. लि. तर्फे ट्रस्टी,
अ. श्री. प्रभाकर बळवंत अमोलिक
ब. श्री. चार्लस अनंत केमकर यांचे तर्फे कु. मु. म्हणून
क. श्री. श्रीनिवास नारायण प्रसाद
ड. श्री. जयंत बारला
ऑफिस पत्ता- १९, हजारीमल सोमानी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१
इतर सहकारी संस्था.
२. निर्मलनगर सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
३. पौर्णिमा टॉवर कमरशिअल प्रिमायसेस सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
४. निर्मल टेरेस सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः स. नं. ३१ अ+३१ब, फायनल प्लॉट नं. ३९७, शंकरशेट रोड, स्वारगेट, जि. पुणे-४११०३७.
उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये शालोम सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ताः स.नं. ३१अ + ३१ब, फायनल प्लॉट नं. ३९७, शंकरशेट रोड, स्वारगेट, जि. पुणे - ४११०३७ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ३४२/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. ०४/०३/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे अॅड. समृद्धी कोठारी हजर. गैरअर्जदार/जमिन मालक २ व ४ गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. २ व ४ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक २६/०३/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. २ व ४ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
पुणे, दिनांकः २१/०३/२०२५.
सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.
शिक्का

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५

**जाहीर नोटीस**
मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ५६६/२०२४/५७२७

**अर्जदार**
तुलसी वंदन २ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः सेक्टर नं. १०, प्लॉट नं. ७७/१ एफ, भोसरी प्राधिकरण, ता. हवेली, जि. पुणे - ४११०२६.
तर्फे, अध्यक्ष : श्री. विनायक बबन मुरादे, सचिवः सौ. दिपिका शशिकांत सावंत.
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
प्रवर्तक/ जाब देणार नं. १
१.मे. अथर्व असोसिएट्स नोंदणीकृत भागीदारी संस्थातर्फे भागीदार,
ए. श्री. प्रतिककुमार अंबालालभाई भोजानी, रा. जलवायु विहार, सेक्टर नं.६ मोशी, ता. हवेली, पुणे - ४१२१०५. बी. श्री. भौमिक एच. रामजियानी, रा. ए/०६/०९, जलवायु विहार, प्लॉट नं.२० सेक्टर नं.६, मोशी, ता. हवेली, पुणे-०५.
सी. श्री. रमेशभाई नारायणभाई पटेल, डी. श्री. अनिलकुमार हरिभाऊ पटेल, इ. सौ. मधुबेन रमेशभाई पटेल
अनु क. सी ते इ, रा. ए/०६/०९, जलवायु विहार, प्लॉट नं. २० सेक्टर नं.६, मोशी, ता. हवेली, पुणे- ४१२१०५.
एफ. श्री. केतनकुमार रावजीभाई पटेल, जी. सौ. प्रिती किर्तीकुमार पटेल
अनु क. एफ व जी रा. ४०२, शांतीनिकेतन, सर्वे नं. १६३, भोसलेनगर, हडपसर, पुणे- ४११०२८.
एच. श्री. किर्तीकुमार रसिकलाल पटेल,
रा. ए/०१/०४, जलवायु विहार, प्लॉट नं. २०, सेक्टर नं. ६, मोशी, ता. हवेली, पुणे - ४१२१०५.
आय. सौ. किरपाबेन वसंतकुमार पटेल
रा. सी- ०३, द्वारका विश्व, प्लॉट नं. ८८ए सेक्टर ०७, इंद्रायणीनगर, भोसरी, पुणे - ४१००३९.
जे. श्री. विनोदकुमार प्रेमजीभाई समानी
रा. ए ९०४, गायत्री हेरिटेज, प्लॉट नं. ३७, सेक्टर नं.२०, खारघर, नवी मुंबई - ४१०२१०.
के. श्री. विपुल अंबालाल पटेल
रा. बी ७०२, शुभारंभ कॉप्लेक्स, प्लॉट नं. १९, सेक्टर नं.२०, खारघर, नवी मुंबई - ४१०२१०. अनु क.३ ते १२ तर्फे कु. मु. म्हणुन जाब देणार नं. १
जागा मालक / जाब देणार नं. २
२. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण निगडी, पुणे - ४११०४४.
तर्फे मुख्य कार्यकारी अधिकारी (पूर्वीचे), पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
भाडेपट्टाधारक / जाब देणार नं. ३
३. श्रीमती अरुणा बबन लांडगे, ४. श्री. राजु बबन लांडगे, ५. श्री. अनिल बबन लांडगे
६. श्रीमती सुरेखा रविंद्र मांढरे, ७. श्री. निवृत्ती वामन लांडगे, ८. श्रीमती इंद्रायणी सुभाष लांडगे
९. श्री. संदिप सुभाष लांडगे, १०. श्री. सुनिल सुभाष लांडगे, ११. श्री. सुशिल सुभाष लांडगे
१२. श्री. विकास बबन लांडगे, अनु क.३ ते १२ रा. उदय मित्र मंडळ, गव्हाणे वस्ती, भोसरी, पुणे - ४११०१९.
उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये तुलसी वंदन 2 सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ताः सेक्टर नं. १०, प्लॉट नं. ७७/१ एफ, भोसरी प्राधिकरण, ता. हवेली, जि. पुणे - ४११०२६ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ५६६ / २०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. ११/०३/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे अॅड. समृद्धी कोठारी हजर. गैरअर्जदार / जमिन मालक १ ते १२ गैरहजर, गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते १२ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक ०१/०४/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते १२ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
पुणे, दिनांकः २१/०३/२०२५.
शिक्का
सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

# उरुळीला रेल्वे टर्मिनलची घोषणा!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**उरुळी कांचन :** केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी केंद्रीय अर्थसंकल्पीय अधिवेशनात, पुणे शहराला उत्तर विभागीय रेल्वे बरोबर अधिक सक्षमपणे जोडण्यासाठी पुणे शहर स्थानकाच्या विस्तारासाठी तसेच हडपसर व उरुळी रेल्वे स्टेशनच्या विस्तार वाढीसाठी मंजुरी दिल्याची व त्यासाठी तरतूद केल्याची घोषणा केली. उरुळी रेल्वे स्थानकावरून लांब पल्याच्या रेल्वे ट्रान्सपोर्टेशनसाठी स्थानकाचा विकास करणार असल्याचे घोषित केले. या घोषणेमुळे रेल्वे प्रवाशात समाधान व्यक्त होत आहे.

मात्र रेल्वे मंत्रालय उरुळीला रेल्वे ट्रान्सपोर्टेशन सेवेसाठी विस्तारीत करीत असले तरी स्थानिक रेल्वे प्रवाशांच्या दृष्टीने दळणवळणासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या लोकल सेवा प्रयोजनाला, इलेक्ट्रीफिकेशन पूर्ण होऊन सुमारे आठ वर्षाचा कालावधी लोटूनही का सुरू करित नाही हे न उलगडणारे कोडे झाले आहे.



### प्लॅटफार्म सुधारले सुविधा जलद मिळावी

● मोदी सरकारने अमृत योजनेअंतर्गत रेल्वे प्लॅटफार्मचा कायाकल्प केला आहे.उरुळी रेल्वे स्थानकाचा कायापालट झाला आहे.हे स्थानक अतिशय महत्त्वाचे असल्याने लांब पल्ल्याच्या रेल्वे गाड्या या ठिकाणी थांबवाव्यात अशी मागणी आहे.

> रेल्वे प्रशासन गोवा एक्स्प्रेससाठी जेजुरी स्थानकाला थांबा देते, बुलेट ट्रेनसाठी मुंबई - सोलापूरच्या रेल्वे प्रवासात जेऊरला थांबा देते मग उत्तरेकडील लाब पल्ल्यांच्या गाड्यांना उरुळी रेल्वे स्थानकावर थांबा का देत नाही हा मोठा प्रश्न आहे."
>
> **— प्रकाश जगताप**

स्थानिकांना रेल्वे सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी डोळेझाक का केली जात आहे असा प्रश्न उपस्थित होत आहे. रेल्वेला मध्य व उत्तर विभागाला जोडण्यासाठी उरुळी रेल्वे स्थानक अतिशय महत्त्वाचे स्थानक ठरणार आहे. या रेल्वे स्थानकातून पुणे, मुंबई तसेच उत्तर विभागातील महत्त्वाच्या शहरांकडे जाण्यासाठी अधिकची मागणी आहे. या स्थानकावरून प्रवासी संख्या हजारोंच्या पटीत असल्याने या स्थानकाचे महत्त्व रेल्वे उत्पन्नात वाढले आहे. या स्थानकावरुन पुणे, पिंपरी, चिंचवड,निगडी, देहूरोड, लोणावळा तसेच मुंबई शहराकडे नोकरीनिमित्त प्रवास करण्याऱ्या प्रवाशांची संख्या मोठी आहे. पुणे शहराचे उपनगर म्हणून तसेच दौंड व पुरंदर तालुक्यातील प्रवाशांना उरुळी स्थानक रेल्वे सुविधा म्हणून वापरण्यास सोयीचे आहे. परंतु या स्थानकावरुन पुणे शहर, दौंड, बारामती अशी वर्दळ असणाऱ्या रेल्वे प्रवाशांसाठी मर्यादित सेवा असल्याने तसेच लांब पल्याच्या रेल्वे गाड्यांचा थांबा नसल्याने या ठिकाणी रेल्वे प्रवाशांना असुविधा आहे.

पुणे रेल्वे स्थानकातून मध्य रेल्वे विभागाने लोणावळा - पुणे - दौंड- अशी लोकल सुविधा सुरू करण्यासाठी रेल्वेचा मार्ग इलेक्ट्रीक केला आहे. हा संपूर्ण मार्गाचे २०१४ ते २०१६ या कालावधीत इलेक्ट्रीफिकेशन काम पूर्ण झाले आहे. मात्र आठ वर्षाचा काळ उलटूनही या मार्गावर लोकल रेल्वे सुविधा सुरू होऊ शकली नाही. या मार्गावर लोकल सेवेचा अंतर्भाव असलेल्या इमो व डेमू या दोन्ही रेल्वेचा रेक उपलब्ध आहे. तसेच या दोन्ही रेल्वे या मार्गावरून धावत आहेत. मात्र सकाळी व संध्याकाळी अशा मोजक्या फेऱ्यांची संख्या असल्याने या स्थानकावरून नोकरदार वर्ग, औद्योगिक कामगार व सामान्य प्रवासी वर्गाला सेवा मिळत नसल्याने या ठिकाणी लोकल रेल्वे सुरू करण्याची मागणी आहे. या मार्गावर लोकल सेवा सुरू करण्यासाठी इलेक्ट्रीफिकेशन, प्लॅटफार्म सुधारणा, राखीव रेल्वे ट्रॅक आदींची सुविधा केली आहे.

### उपनगरीय दर्जा कधी ?

● पुणे शहराला जोडण्यासाठी उपनगरीय रेल्वेचे जाळे तयार करणे अतिशय महत्त्वाचे बनले आहे. त्यासाठी लोणावळा - पुणे - दौंड अशी लोकल सेवा सुरू करण्यासाठी या मार्गाला उपनगरीय सेवेचा दर्जा देणे गरजेचे आहे. या रेल्वे मार्गात दौंड रेल्वे जंक्शनचा आ.राहुल कुल यांच्या प्रयत्नांनी पुणे रेल्वे विभागात झाला असला तरी लोकल रेल्वेच्या सर्व रचना होऊनही रेल्वे सुविधा सुरू न झाल्याने प्रवाश्यांत नाराजी आहे.

## कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याचे आवाहन



**सासवड :** सध्या सोशल मीडिया किंवा स्टेट्स वरुन मोठ्या प्रमाणात वादंग निर्माण होत आहेत कोणाच्या धार्मिक भावना दुखावल्या जाणार नाही याची दक्षता घेणे गरजेचे आहे आता गुढीपाडवा रमजान ईद छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती रामनवमी हे उस्तव मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात यात कोणतीही धर्माच्या भावना दुखावल्या जाणार नाही या करीता पोलिस पाटील त्याच बरोबर जेष्ठ समाजसेवक विविध धर्माचे लोक यांच्या बरोबर चर्चा करताना मला जाणवले की पुरंदर तालुक्यातील लोक सुज्ञ आहेत कोणत्याही कारणाने धार्मिक भावना दुखावुन देणारे नाहीत असे प्रतिपादन पोलिस अधीक्षक श्री पंकज देशमुख यांनी व्यक्त केले सासवड येथील पोलिस ठाण्यात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते ते पुढे म्हणाले की गणेशोत्सव काळावधीत जशी आपण एकी दाखवली तीच एकी कायम ठेवत आपण आलेले सण उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा कराल अशी आशा व्यक्त करतो. या वेळी सासवड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ऋषिकेश अधिकारी व इतर अधिकारी उपस्थित होते.

## पोर्टलद्वारे शंभर टक्के शिक्षकांची भरती करावी



**जेजुरी :** शाळेतील शिक्षक सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्या रिक्तजागी भरती होत नसल्याने संस्था शाळा, समाज व विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होते. शासनाने पोर्टल द्वारे शंभर टक्के शिक्षकांची भरती करावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाचे सचिव प्राचार्य नंदकुमार सागर यांनी केली. श्री मल्हार शिक्षण मंडळ कोथळे संचलित विद्या महामंडळ प्रशाला येथे शिक्षक सुग्रीव चव्हाण यांच्या सेवापूर्ती कार्यक्रमानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्राचार्य नंदकुमार सागर बोलत होते. ते पुढे म्हणाले . सध्या 2022 23 या शैक्षणिक वर्षातील पोर्टल द्वारे केवळ 80 टक्के भरती प्रक्रिया सुरू आहे. दरवर्षी अनेक शिक्षक सेवानिवृत्त होतात. शाळेत शिकवण्यासाठी शिक्षक उपलब्ध होत नाहीत. इतर शिक्षकांवर ताण निर्माण होवून त्याच विषयाचे शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होते. शासनाने पोर्टल द्वारे शंभर टक्के शिक्षकांची भरती करावी.

यावेळी सेवापूर्ती निमित्त शैक्षणीक संस्था,संघटना,शिक्षक व विद्यार्थ्यांच्या वतीने सुग्रीव चव्हाण यांचा सन्मान करण्यात आला. या वेळी श्री मल्हार शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा चंद्रलेखा जगताप,पदाधिकारी ज्ञानेश्वर भोईटे गुरुजी,शंकर जगताप,पी एम जगताप,शामराव जगताप,ज्ञानेश्वर जगताप,सुरेश खैरे , रवींद्र जगताप,सरपंच जयश्री भोईटे,वंदना जगताप, प्राचार्य विक्रम कांबळे,प्राचार्य सुंदरदास चव्हाण ,मुख्याध्यापक प्रशांत कदम ,आजी माजी मुख्याध्यापक व ग्रामस्थ उपस्थित होते.

# वन्यपशू व पक्षांसाठी पाणी व चाऱ्याची सुविधा सुरू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** जेजुरी वार्ताहर दि 22

जेजुरी व परिसरातील जयाद्रीच्या डोंगर रांगेत मोठ्या प्रमाणात वृक्षराजी असल्याने याठिकाणी वन्यपशू व पक्षांचे वास्तव्य आहे. उन्हाळ्यात नैसर्गिक झरे आटल्याने पाण्याची प्रचंड टंचाई निर्माण झाली आहे.वण्यपशू व पक्षांसाठी सलग अकराव्या वर्षी जेजुरी येथील जयमल्हार फाउंडेशनच्या वतीने या वन्यजीवांसाठी टँकर द्वारे पाणी व चाऱ्याची व्यवस्था जागतिक वनदिनानिमित्त सुरू करण्यात आली असून पावसाळ्या पर्यंत ही सेवा उपलब्ध होईल अशी माहिती फाउंडेशनचे प्रमुख विशाल बार भाई यांनी दिली.

उन्हाची चाहूल सुरू झाली असून उन्हाची रखरख वाढली आहे.विहिरी ,ओढे,नाल्यांचे नैसर्गिक झरे आटल्याने पाण्याचे दुर्भिक्ष सुरू झाले आहे. वन परिसरात वन्यजीवांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध व्हावे यासाठी जेजुरी परिसरातील वनक्षेत्रात पांनवठ्यात टँकर द्वारे पाणी सोडून मुक्या जीवनाची तहान भागवली जात आहे.

जेजुरी जयाद्री डोंगर रांगेत मोठ्या प्रमाणात वृक्षराजी असल्याने वन्य जीवांचे अस्तित्व पाहण्यास मिळते. चिंकारा, तरस,बिबट्या,कोल्हे,लांडगे, सायाल,खोकड , ससे या वन्य पशू



जेजुरी जयमल्हार फाउंडेशनच्या वतीने जागतिक वनदिनानिमित्त वन्य जीवांना पाणी व चाऱ्याची व्यवस्था सुरू करण्यात आली.



बरोबरच श्रृंगी घुबड,गरुड,मोर,भारद्वाज आदी पक्षी व स्थलांतरित पक्षी वनविभागात आढळून येतात.

परिसरातील जयाद्री डोंगर रांगेत आठ पाणवठे असून या पाणवठ्यावर जयमल्हार फाऊंडेशनच्या वतीने लोकसहभागातून टँकरद्वारे पाणी सोडून याच ठिकाणी वन्यपशू वपक्षांसाठी चाऱ्याची,धान्याची व्यवस्था करण्यात येते.

जागतीक वन दिनाच्या निमित्ताने सचिन कुंभार व तुषार कुंभार यांच्या सहकार्यातून पाण्याचे टँकर पाणवठ्यात सोडून या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. या उपक्रमासाठी वनक्षेत्रपाल सागर ढोले वनपाल राहुल रासकर, वन रक्षक सोनाली कांबळे, गोविंद निरडे, गजानन बयास, लहू रनावरे यांचे सहकार्य मिळाले असल्याचे बारभाई यांनी सांगितले.

फाऊंडेशनचे अध्यक्ष विशाल बारभाई , सदस्य विठ्ठल सोनवणे,रघुनाथ वाहूळ, समीर मोरे, अमोल भंडारी राज पाटील, मनोज बारसूडे यावेळी उपस्थित होते.

## जमीन गैरव्यवहार प्रकरण; अपील हायकोर्टाने फेटाळले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव :** येथील गावठाणातील कोट्यवधी रुपये किमतीची बहात्तर गुंठे जमीन हडपल्याचा आरोप करत तत्कालीन ग्रामपंचायत प्रशासनाने महसूल मंत्र्यांकडे धाव घेतली असता सदर जागेवर सरकार नाव टाकण्याचे आदेश महसूलमंत्र्यांनी दिले होते. या आदेशाविरोधात माजी जिल्हा परिषद सदस्या स्वाती पाचूदकर यांचे सासरे आनंदराव दिनकर पाचूदकर यांनी हायकोर्टात अपील केले होते. हायकोर्ट मुंबई यांनी दि. १९.३.२५ रोजी आनंदराव दिनकर पाचुंदकर यांचे अपिल फेटाळले असल्याची माहिती सरपंच सुवर्णा वायदंडे व उपसरपंच श्रीकांत पाचूदकर यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

तसेच सन २००८ ते २००९ पासून या प्रकरणाशी संबंधित सर्व अधिकारी व पदाधिकारी कर्मचारी दोषी ठरविले असून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशीही मागणी सरपंच सुवर्णा वायदंडे व उपसरपंच श्रीकांत पाचूदकर यांनी केली आहे. या बाबत सविस्तर वृत्त असे की, रांजणगाव गणपती (ता. शिरूर) येथील गावठाणातील कोट्यवधी रुपये किमतीची सुमारे ७२ गुंठे जमीन हडपण्याचा प्रकार उघडकीस आला होता व या जमिनीवरील आनंदराव दिनकर पाचुंदकर यांचे नाव काढून टाकून राज्य सरकारचे नाव दाखल करण्याचे आदेश ही तत्कालीन महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले होते.

सध्याच्या बाजारभावाप्रमाणे या सुमारे ७२ गुंठे जागेची किंमत कोट्यावढी रुपये होत असल्याचा दावा त्यांनी केला. याबाबत सरपंच व उपसरपंच यांनी सांगितले की, ग्रामपंचायतीकडील सन १९६०- ६१ चे रेकॉर्ड भिजल्याचा गैरफायदा उठवीत राजमुद्रा पतसंस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय पाचुंदकर यांनी बनावट रेकॉर्ड बनवून ८अ मध्ये खाडाखोड व पाने चिकटाऊन आनंदराव पाचुंदकर यांचे वय १२ वर्ष असतानाही

गावठाणातील सुमारे ७२ गुंठे मिळकतीवर सिटी सर्वे मार्फत आनंदराव पाचुंदकर यांचे नाव नोंदविले. याच काळात दत्तात्रय पाचुंदकर यांच्या पत्नी स्वाती पाचुंदकर या साडेतीन वर्षे सरपंच, तर नंतर जिल्हा परिषद सदस्यही होत्या. दरम्यान २०१९ ला ग्रामपंचायतीची सत्ता आमच्या ताब्यात आल्यानंतर गाव नमुना आठमध्ये खाडाखोड करून केलेला जमीन बळकविण्याचा प्रकार आमच्या लक्षात आला. महाराष्ट्र शासनाची ही जमीन वाचविण्यासाठी आम्ही तत्कालीन महसूलमंत्र्यांकडे पत्रव्यवहार केला. या प्रकरणाचा पाठपुरावा केला. महसूलमंत्र्यांसमोर झालेल्या सुनावणीनंतर त्यांनी संबंधित मिळकतीतून आनंदराव पाचुंदकर यांचे नाव वगळून शासनाचे नाव दाखल करण्याचे आदेश दिले होते.

## कोरेगाव भिमातील कंपनीत बिबट्या शिरल्याने खळबळ



**शिक्रापूर :** कोरेगाव भीमा ता. शिरुर येथील किऑन कंपनीमध्ये रात्रीच्या सुमारास एक बिबट्या कंपनीत शिरल्याचे सुरक्षारक्षकांना दिसले तर याबाबतची घटना सीसीटीव्हीमध्ये देखील कैद झाल्याने खळबळ उडाली मात्र वनविभागाच्या तब्बल सहा तासांच्या चौकशीनंतर बिबट्या झाडावरुन बाहेर गेल्याचे निष्पन्न झाल्याने सर्वांनी सुटकेचा निश्वास टाकला. कोरेगाव भीमा ता. शिरुर येथील किऑन कंपनीमध्ये रात्रीच्या एक वाजण्याचा सुमारास एक बिबट्या कंपनीत आल्याचे सुरक्षारक्षकांना दिसले, याबाबतची घटना सीसीटीव्हीमध्ये देखील कैद सुरक्षारक्षकांनी याबाबतची माहिती कंपनी व्यवस्थापकांना दिली, तर सकाळच्या सुमारास कामगारांमध्ये एकच खळबळ उडाली दरम्यान घटनेची वनविभागाला माहिती देताच सकाळच्या सुमारास वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरीमंडळ अधिकारी गौरी हिंगणे, नियतक्षेत्र अधिकारी बबन दहातोंडे, प्रमोद पाटील, वन्यजीव बचाव पथकाचे गणेश टिळेकर, शेरखान शेख, अमोल कुसाळकर, श्रीकांत भाडळे यांनी घटनास्थळी धाव घेत कंपनीमध्ये सर्वत्र पाहणी करत कंपनी व्यवस्थापक व वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी सर्वत्र पाहणी करत कंपनीतील सर्व सीसीटीव्ही तपासले असता ज्या ठिकाणी बिबट्याचे शेवटचे ठिकाण सीसीटीव्हीमध्ये दिसले तेथे कंपनीचे व्यवस्थापक रमेश नरवडे, दिलीप भंडारे आदींच्या उपस्थितीत जात पाहणी केली असता बिबट्याने कंपनीच्या सुरक्षाभिंतीच्या कडेला असलेल्या एका झाडावरुन बाहेर उडी मारून धूम ठोकली तर बिबट्या झाडावरुन गेल्याने झाडावर पावलांच्या नखांचे निशाण दिसून आले, तर कंपनी व्यवस्थापक व वनविभागाच्या अधिकाऱ्यांच्या तब्बल सहा तासांच्या अथक परिश्रमानंतर बिबट्याने कंपनीच्या बाहेर गेल्याचे निष्पन्न झाल्याने कामगारांसह सर्वांनी सुटकेचा निश्वास टाकला.

## वडगावपीर येथे जागतिक वनदिन उत्साहात साजरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** वडगावपीर (ता. आंबेगाव) येथे प्रगती विद्यालयामध्ये धामणी वनपरिमंडळ अंतर्गत धामणी नियतक्षेत्रामध्ये २१ मार्च हा दिवस जागतिक वनदिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला.यानिमित्त पर्यावरण,जैवविविधतेचे संतूलन राखण्यासाठी वनांचा विकास व संवर्धन संरक्षण करणे अत्यंत गरजेचे आहे. वनामुळे जमिनीची धूप रोखण्यासाठी मदत तर होतेच पण जमिनीची सुपिकता वाढते. वनांमूळे प्राणी,पक्षी, किटक यांना संरक्षण मिळते.वनांच्या वाढीसाठी पर्यावरण सुरक्षितेसाठी आपण सर्वांनी जागृत राहिले पाहिजे.असे आवाहन धामणीच्या वनपरिमंडल अधिकारी सोनल भालेराव यांनी केले.

वने,जंगल,पर्यावरण,सुरक्षा,वनवणवे याबद्दल समाजाने जागृत राहिले पाहिजे. वनांच्या वाढीसाठी वृक्षारोपन करणे, वृक्षांची जोपासना करणे,अवैद्य जंगलतोडीला आळा घालणे, वनजमिनीवरील अतिक्रमणे रोखणे यासाठी सुद्धा समाजाने जागृत राहिले पाहिजे असेही त्यानी सांगितले. जागतिक वन दिनानिमित्त विद्यालयामध्ये चित्रकला स्पर्धा व निबंध स्पर्धेचे आयोजन केले असून सदर स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी अतिशय उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला त्यानंतर शाळेच्या परिसरात वृक्षारोपण केले कार्यक्रमात सहभागी वनपरिमंडल अधिकारी सोनल भालेराव,वनरक्षक योगेश निघोट,वनसेवक दिलीप वाघ,रेस्क्यू टीम मेंबर कल्पेश वाडेकर,आनंद वळसे,सोन्याबापू लंके, मुख्याध्यापिका उज्वला भालेराव, शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.




वडगावपीर ( ता.आंबेगाव ) येथे जागतिक वनदिना निमित्त वृक्षारोपण करताना.


# शिक्रापूर पोलिसांकडून संचलन व दंगाकाबू कवायत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** नागपूर येथे घडलेल्या दंगलीच्या पार्श्वभूमीवर शिक्रापूर पोलिसांच्या वतीने परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच परिसरात शांतता राहण्यासाठी गावातून सशस्त्र संचलन करत बाजार मैदान येथे दंगा काबु कवायत प्रात्यक्षिक घेण्यात आले आहे.

शिक्रापूर ता. शिरुर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर येथे घडलेल्या दंगलीच्या पार्श्वभूमीवर शिक्रापूर परिसरात





शिक्रापूर ता. शिरुर येथे पोलिसांचे संचलन व दंगा काबु कवायत प्रात्यक्षिक.

पोलिसांचे सशस्त्र संचलन करण्यात आले, यावेळी पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल देशमुख, पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ कचरे, विजय मस्कर, महेश डोंगरे. जितेंद्र पानसरे, रांजणगाव एमआयडीसि पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक अविनाश थोरात, शिरुर पोलीस स्टेशनच्या पोलीस उपनिरीक्षक माधुरी झंडगे यांसह तब्बल पन्नास कर्मचारी सहभागी झाले होते, यावेळी पोलिसांनी गावातून सशस्त्र संचलन करत केले, गावातून सशस्त्र संचलन करत पोलिसांच्या वतीने बाजार मैदान येथील मोकळ्या जागेमध्ये ऐनवेळी होणारी गर्दी पांगविण्यासाठी करण्यात येणारे दंगा काबु कवायत प्रात्यक्षिक घेण्यात आले असल्याने पोलीस सतर्क असल्याचे चित्र दिसून आले आहे.

# दंगलखोरांवर होणार बुलडोजर कारवाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** नागपूरमध्ये औरंगजेबाच्या कबरीच्या मुद्यावरून झालेल्या हिंसाचारावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. १०५ जणांना अटक करण्यात आली असून, अनेक जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सोशल मीडियावरून अफवा पसरवणाऱ्यांवरही कारवाई केली जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. संचारबंदी लागू करण्यात आली असून, पंतप्रधानांच्या येणाऱ्या दौऱ्यावर याचा परिणाम होणार नाही, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. हिंसाचारग्रस्त भागात आता शांतता आहे.



कबर जाळत असताना कुराणचे आयत लिहिलेली चादर जाळली असा भ्रम तयार करून काही लोकांनी सोशल मीडियातून अपप्रचार केला. सोशल मीडियाचं ट्रॅकिंग करून ज्या लोकांनी ही घटना घडावी म्हणून पोस्ट केल्या त्यांना दंगेखोरांच्यासोबत सहआरोपी करणार आहे. त्यांनी दंगा भडकवला. ६८ पोस्ट आयडेंटिफाय होऊन डीलिट झाल्या आहेत. त्यांच्यावर कारवाई झाली आहे. अजून काही पोस्टची माहिती घेतली जात आहे. ज्यांनी भडकवणारं पॉडकास्ट केलं, ज्यांनी चुकीच्या पोस्ट टाकून अफवा पसरवली त्यांच्यावर कारवाई होईल, असा इशारा देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिला.

> आतापर्यंत १०४ लोकांना अटक केली आहे. त्यात ९२ लोक आहेत आणि १२ लहान मुलं आहेत. जोपर्यंत शेवटच्या दंगेखोराला पकडलं जात नाही तोपर्यंत अटक सत्र सुरू राहील. कोणत्याही प्रकारे कुणाला दंगा करून दुसऱ्यांचं नुकसान करण्याची परवानगी दिली जाणार नाही. त्यामुळेच दंगेखोरांची प्रॉपर्टी विकून नुकसान भरपाई वसूल करणार आहोत. जोपर्यंत दंगलखोरांना धडा शिकवत नाही, तोपर्यंत कारवाई सुरू राहील. ज्यांनी पोलिसांवर हल्ला केला आहे. त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाणार आहे. त्यांच्यावर कडक गुन्हे दाखल करून कठोर शिक्षा देणार आहे.
>
> **-देवेंद्र फडणवीस**

### पंतप्रधानांचा दौरा होणार का ?

● येत्या ३० मार्च रोजी पंतप्रधान मोदींचा नागपूर दौरा होणार आहे. नागपूर शहरातील अशांततेच्या वातावरणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दौरा होणार का? असा सवाल उपस्थित होत आहे. यावरही मुख्यमंत्री फडणवीसांनी उत्तर दिलं. पंतप्रधानांच्या दौऱ्याला काही परिणाम होणार नाही. जी घटना झाली ती एका भागात झाली. ६० के ७० टक्के नागपुरात काही घडलं नाही. लोकांचे जनजीवन सुरक्षित आहे. त्यामुळे तो दौरा नीट होणार. ज्या भागात तणाव होता त्यात शांतता आहे. पंतप्रधानांचा दौरा ज्या पद्धतीने ठरला आहे. त्या पद्धतीनेच होईल. दौरा ठरल्याप्रमाणेच होईल, असे देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.




## आज मुंबई लोकलच्या तिन्ही मार्गावर मेगाब्लॉक!

**मुंबई :** उपनगरी रेल्वे मार्गावरील रुळांची दुरुस्ती तसेच सिग्नल यंत्रणेतील तांत्रिक कामांसाठी रविवारी (ता. २३) रेल्वेच्या तिन्ही मार्गांवर मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. मध्य रेल्वेचा माटुंगा ते मुलुंड अप आणि डाऊन जलद मार्ग, तर कुर्ला ते वाशी अप आणि डाऊन हार्बर मार्गावर तसेच पश्चिम रेल्वेच्या मुंबई सेंट्रल ते चर्चगेट अप जलद मार्गावर मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे रविवारी तिन्ही मार्गांवरील प्रवाशांचे मेगाहाल होणार आहेत.




## लाच घेताना मोटार वाहन निरीक्षक ताब्यात

**पंचवटी :** प्रादेशिक परिवहन विभागाच्या पेठ चेकपोस्ट येथे छत्रपती संभाजीनगर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी सापळा रचून प्रादेशिक परिवहन विभागाच्या मोटार वाहन निरीक्षकाला खासगी व्यक्तीमार्फत ५०० रुपयांची लाच घेताना रंगेहाथ ताब्यात घेण्यात आले.तसेच या अधिकाऱ्यासह दोन खासगी व्यक्तींना पथकाने ताब्यात घेत गुन्हा दाखल केला आहे. संशयित नितीन भिकनराव अहिरे (वय ४९) असे मोटार वाहन निरीक्षकाचे नाव असून, त्याची नेमणूक पेठ चेक पॉइंट या ठिकाणी होती. या संशयितासोबत विनोद अर्जुन साळवे (४७) आणि मनोहर सुनील निकम (२७) यांचा समावेश आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी माहिती दिली, की तक्रारदार हे सामाजिक कार्यकर्ते असून, ते नागरिकांसाठी सहलीचे आयोजन करीत असतात. गुरुवारी (ता. २०) छत्रपती संभाजीनगर, नाशिक येथून गुजरातमधील अंकलेश्वर येथे साईबाबा ट्रॅव्हल्स कंपनीच्या बसने जात होते.

## इचलकरंजीसाठी मंजूर झालेली 'सुळकूड पाणी योजना' गुंडाळली!

**कोल्हापूर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत इचलकरंजीतील पाणी प्रश्नावर मुंबईत झालेल्या बैठकीत नवीन पर्याय शोधण्याचा निर्णय झाला. त्यामुळे इचलकरंजी शहरासाठी मंजूर झालेली सुळकूड पाणी योजना गुंडाळण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. ही योजना होण्यासाठी इचलकरंजीकरांनी चळवळ उभी करीत मोठा संघर्ष उभा केला होता. त्यामुळे यातून शासन पातळीवर काहीतरी सकारात्मक निर्णय होईल, अशी अपेक्षा होती. मात्र, आता या संदर्भातील नव्या घडामोडीमुळे सुळकूड योजनेचे अस्तित्वच संपले असले, तरी मुबलक व स्वच्छ पाण्यासाठी इचलकरंजीकरांची प्रतीक्षा संपली नाही.

इचलकरंजी शहरासाठी कृष्णा योजनेतून बहुतांशी पाणीपुरवठा केला जातो; पण ही योजना कालबाह्य झाली आहे. सध्या तिचे बळकटीकरण केले जात आहे. पण, भविष्यकालीन विचार केल्यास ही योजना अपुरी पडणार आहे. त्यासाठी गेल्या २० वर्षांपासून शहरासाठी नवीन पाणी योजना राबविण्याचा विचार पुढे आला. सुरुवातीला दानोळी उद्‍भव असलेली वारणा योजना मंजूर करण्यात आली. पण, या योजनेला वारणा काठावरील गावांचा विरोध झाल्याने ही योजना रद्द झाली. त्यानंतर सुळकूड उद्‍भव असलेली दुधगंगा योजना मंजूर करण्यात आली. पण, या ठिकाणीही विरोध सुरू झाला. खुद्द तत्कालीन पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी या योजनेला विरोध करीत अत्यंत टोकाची भाषा वापरली. त्यामुळे या योजनेच्या पुढील वाटचालीचा मार्गच बंद झाला. सततच्या पाठपुराव्यामुळे सुळकूड योजनेच्या पुढील कार्यवाहीस गती येईल, अशी आशा निर्माण झाली.



## राज्य शिक्षण मंडळ बंद करणार का? : सुप्रिया सुळे

**मुंबई :** राज्यातील शाळांमध्ये सीबीएसई अभ्यासक्रम सुरु करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला होता. शासनाच्या या निर्णयावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी टीका केली आहे. तुम्ही सीबीएसई सुरु करणार आहे मग राज्य शिक्षण मंडळ बंद करणार का? मराठी भाषेचे काय होणार? असा सवाल सुप्रिया सुळे यांनी विचारला. यामुळे दक्षिण भारतात भाषेसाठी जे होते, ते योग्य आहे की काय? असा प्रश्न मला पडत आहे, असे त्यांनी म्हटले.

सुप्रिया सुळे म्हणाल्या, सीबीएसई बोर्ड राज्याच्या शाळांमध्ये सुरु होणार आहे. त्याबद्दल मला तीन प्रश्न विचारायचे आहे. सीबीएसई अभ्यासक्रमामध्ये किती टक्के मराठी असणार आहे. महाराष्ट्राचा इतिहास त्यात असणार का? महाराष्ट्राची किती माहिती त्यात असणार आहे. सीबीएसई बोर्ड करताना तुमची तयारी आहे का? तुमच्याकडे शिक्षक आहेत का? सीबीएसईतून शिक्षण दिल्यावर मग मराठी भाषेचे काय होणार याबद्दल मला चिंता आहे. राज्य शिक्षण मंडळ तुम्ही बंद करणार आहात का? असे प्रश्न सुप्रिया सुळे यांनी विचारले.

# उन्हाळ्याच्या सुट्टीत करा अभ्यास

## आता दर आठवड्याला अभ्यास आणि मूल्यांकन !



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** जिल्हा परिषद शाळांच्या शिक्षकांना यावर्षी उन्हाळी सुटीतही दर आठवड्याला त्यांच्या विद्यार्थ्यांचा अभ्यास घ्यावा लागणार आहे. तसेच दर आठवड्यातील प्रगतीचे मूल्यांकन करून ३० जूनपूर्वी प्रत्येक विद्यार्थी हा भाषा व संख्याज्ञानात परिपूर्ण करण्यासाठी अभ्यास बंधनकारक असणार आहे. जिल्हा परिषद शाळांत अप्रगत विद्यार्थ्यांचे प्रमाण खूप अधिक आहे. पण सातत्याने अप्रगत विद्यार्थी पुढील वर्गात ढकलले जातात. यावर्षी मात्र शिक्षण खात्याने या प्रकाराला पायबंद घालण्याचे ठरवले आहे. नियमित अध्यापनाचे कार्य संपत असताना इयत्ता दुसरी ते पाचवीच्या विद्यार्थ्यांची याच महिन्यापासून विशेष तपासणी सुरू झाली आहे.

प्रत्येक विद्यार्थ्याचा अध्ययनस्तर निश्चित करून त्याबाबतची घोषणा केली जाणार आहे. ही घोषणा झाल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याच्या अभ्यासाची वैयक्तिक तयारी करवून घेण्याची जबाबदारी संबंधित शिक्षकावर सोपवली जाणार आहे.

### ठळक बाबी...

- मार्च महिन्यापासून विशेष तपासणीला सुरवात
- दुसरी ते पाचवीच्या सर्व विद्यार्थ्यांचा समावेश
- दर आठवड्याला विद्यार्थ्यांच्या अभ्यासाची प्रगती तपासणे बंधनकारक
- शिक्षकांकडून विद्यार्थ्यांचा तपासणी अहवाल सादर होणार
- १०० टक्के अध्ययन क्षमता विकसित होणे गरजेचे
- भाषा ज्ञान व संख्याज्ञानाची आठवड्याला परीक्षा
- उन्हाळी सुटीतील मोहिमेचा ३० जूनला अंतिम मुदत
- शिक्षकांनी सुटीतही मोहीम पूर्ण करणे गरजेचे
- अप्रगत विद्यार्थ्यांना प्रगतीच्या वाटेवर आणण्याचा प्रयत्न
- अप्रगत विद्यार्थ्यांना पुढील वर्गात ढकलणे बंद
- अभ्यासाची तयारी करूनच नव्या वर्षात प्रवेश

# टेस्ला कार पेटवापेटवीवर डोनाल्ड ट्रम्प भडकले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अमेरिका :**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी टेस्ला कारची तोडफोड करणाऱ्यांना इशारा दिला. ते म्हणाले की असे करताना पकडलेल्या कोणालाही अल साल्वाडोरच्या तुरुंगात पाठवले पाहिजे. ट्रम्प यांनी त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया हँडल ट्रूथवर लिहिले की, मला त्या दहशतवादी मूर्खांना २० वर्षांची जेल झालेली पाहायची आहे जे टेस्लाच्या संपत्तीचे नुकसान करतात. कदाचित त्यांना अल साल्वाडोरच्या कुख्यात तुरुंगात शिक्षा होईल.



देशसेवेसाठी ते सर्वस्व पणाला लावत आहेत. ट्रम्प म्हणाले की टेस्ला ही जगातील सर्वोत्तम कंपन्यांपैकी एक आहे आणि ती मस्कसाठी 'मुलासारखी' आहे. जेव्हा टेस्लाचे शेअर्स घसरले तेव्हा ट्रम्प म्हणाले की २०२४ च्या निवडणुकीत त्यांच्याशी असेच करण्याचा प्रयत्न केला गेला. पण त्याचा परिणाम काय झाला? मस्क खरोखर एक महान अमेरिकन आहे. ते आपले कौशल्य वापरून अमेरिकेला पुन्हा महान बनवत आहेत, त्यासाठी त्यांना शिक्षा का द्यावी?

## शैक्षणिक साहित्याचे वाटप

**पुणे :** 'देशातील नामवंत संशोधकांपैकी भालचंद्र मोहनीराज पाठक हे एक होते. त्यांनी तत्त्वांशी कधीही तडजोड केली नाही. ते कष्टकऱ्यांसाठी धावून जात असत. सामाजिक शिकवणुकीचा वारसा जपत पाठक कुटुंबीयांनी मदतीचे कार्य सुरू ठेवले आहे,' असे मत माजी जिल्हाप्रमुख व सत्र न्यायाधीश आर. एच. मोहम्मद यांनी व्यक्त केले.

भालचंद्र मोहिनीराज पाठक यांच्या सातव्या स्मृतिदिनानिमित्त गरजू व अनाथ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व धान्य तसेच आवश्यक वस्तूंचे वाटप मोहम्मद यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे कलादालनात या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. जांभूळवाडीतील मतिमंद विद्यालयातील विद्यार्थ्यांना ही मदत देण्यात आली. भारतीय कला प्रसारिणी सभेचे सचिव पुष्कराज पाठक, प्राचार्य डॉ. अभिजित नातू, प्राचार्य संजय भारती उपस्थित होते.

# डॉ. विजय केळकर यांना पुण्यभूषण पुरस्कार जाहीर

**पुणे :** ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आणि देशाचे धोरणात्मक सुधारक डॉ. विजय केळकर यांना अर्थशास्त्र क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल २०२५ चा पुण्यभूषण पुरस्कार देण्याचा निर्णय ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने घेतला आहे. त्याचवेळी सीमेवर लढताना जखमी झालेल्या जवानांना आणि वीरमातेलाही गौरविण्यात येणार आहे, अशी माहिती पुण्यभूषण संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. सतीश देसाई यांनी आज प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविली आहे.



यंदा या पुरस्काराचे ३७ वे वर्ष आहे. सलग ३६ वर्षे संस्थेने, संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे, तर देशात आणि देशाच्या बाहेरही या प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या पुरस्काराचा भव्य उपक्रम राबविला. अवघे मोगल साम्राज्य हादरवून टाकणाऱ्या बालशिवाजींची, सोन्याच्या फाळाने पुण्याची भूमी नांगरत असलेली प्रतिकृती आणि या नगरीच्या ग्रामदैवतांची प्रतिमा यांचा समावेश असलेले वैशिष्ट्यपूर्ण वैशिष्ट्यपूर्ण स्मृतिचिन्ह आणि त्याचबरोबर दोन लाख रूपये रोख रकमेची थैली सन्मानित पुणेकरास दिली जाते.

## अनुसूचित विभाग व ओबीसी कार्यालयाचे उद्‍घाटन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या हस्ते काँग्रेस भवन शिवाजीनगर या ठिकाणी पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभाग व पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाच्या नूतन कार्यालयाचे उद्‍घाटन संपन्न झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्ध पुतळ्यास प्रदेशाध्यक्षांनी पुष्पहार अर्पण केला व मागासवर्गीय विभागाच्या वतीने अध्यक्ष सुजित यादव यांनी त्यांचा कबीराची वाणी व बुद्ध व आणि त्यांचा धम्म हे ग्रंथ देऊन पंचशीलची शाल व देऊन सत्कार केला. ओबीसी विभागाच्या वतीने शहराध्यक्ष प्रदीप परदेशी, साहिल केदारी यांनी शहराध्यक्षांचा सन्मान केला यावेळी काँग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे व पक्षाचे सर्व वरिष्ठ पदाधिकारी याप्रसंगी उपस्थित होते. तसेच ब्लॉक अध्यक्ष संतोष पाटोळे, राजू ठोंबरे, हेमंत राजभोज, रमेश सोनकांबळे, राजेंद्र मोहिते, अनिल जाधव, हरीश काकडे, ईश्वर गायकवाड, अभिषेक यादव, प्रणव परदेशीं त्याचप्रमाणे ओबीसी व एस सी विभागाचे शेकडो कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.



**पुणे :** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या हस्ते काँग्रेस भवन शिवाजीनगर या ठिकाणी पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभाग व पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाच्या नूतन कार्यालयाचे उद्‍घाटन संपन्न झाले.

# शिवाजी पार्कवरील धुळीबाबत आयआयटीचा अहवाल सादर




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबईकरांची शान असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज पार्क मैदानातील धुळीमुळे रहिवासी त्रस्त झाले. मैदानात माती टाकण्यात आल्याने काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात धूळ उडत असल्याने रहिवाशांमध्ये श्वसनविकार बळावत असल्याच्या तक्रारी वाढू लागल्या आहेत. धुळीच्या त्रासापासून मुक्तता मिळावी, अशी शिवाजी पार्कात महापालिकेकडून करण्यात येत असलेल्या उपाययोजनांचा अहवालदेखील आयआयटी मुंबई यांना सादर करण्यात आला आहे. या अहवालावर त्यांचे मतदेखील विचारात घेतले जाणार आहे. याशिवाय पार्कात आणखी कोणत्या उपाययोजना करू शकतो, याची माहितीदेखील घेण्यात येणार असून त्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल, असे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

आयआयटी मुंबई यांच्या अंतरिम अहवालाच्या अनुषंगाने महापालिकेकडून शिवाजी पार्क मैदानामध्ये धुळीवर नियंत्रण राखण्यासाठी दररोज रात्री पिण्यास अयोग्य पाण्याची फवारणी करण्यात येते. याशिवाय पुढील आवश्यक कामांबाबत सल्लागार संस्थेकडून अद्याप अंतिम अहवाल प्राप्त झालेला नाही. तो प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे महापालिका प्रशासनाने म्हटले आहे.

शिवाजी पार्क येथील धुळीच्या समस्येबाबत महाराष्ट्र राज्य प्रदूषण मंडळाने दिलेल्या निर्देशानुसार आयआयटी मुंबई यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली. आयआयटीने शिवाजी पार्क येथील मातीच्या विविध नमुन्यांची चाचणी करून महापालिकेस अंतरिम अहवाल सादर केला. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे

स्थानिक रहिवाशांच्या तक्रारींच्या अनुषंगाने नियुक्त सल्लागाराच्या अहवालानुसार शिवाजी पार्क येथील मैदानात हिरवळ कायम ठेवणे, धूळ उडण्याचे प्रमाण कमी करणे, यासाठी पर्जन्य जलवाहिनीचे जाळे, ३५ रिंगवेल बांधणे, मैदान समतल करणे, लाल माती टाकणे, गवत-लॉन लावणे, अशी कामे करण्यात आली आहेत.

शिवाजी पार्क नूतनीकरणाबाबत निर्णय अद्याप घेण्यात आलेला नाही. शिवाजी पार्क रहिवासी संघटनेने आता न्यायालयीन लढाई लढण्याचे ठरवले आहे.



## रविचंद्रन अश्विनचा खास सन्मान!

आयपीएल सुरू होण्यापूर्वी माजी भारतीय अष्टपैलू खेळाडू रविचंद्रन अश्विनला एक विशेष सन्मान मिळाला आहे. आता, अश्विनच्या मूळ गावी असलेल्या एका रस्त्याला त्याचे नाव देण्यात आले आहे. विशेष म्हणजे यावर्षी अश्विनला पद्मश्री पुरस्कारानेही गौरवण्यात आले आहे. त्यानंतर आता पुन्हा त्याला सन्मानित करण्यात आलं आलं आहे. ग्रेटर चेन्नई कॉर्पोरेशनने शुक्रवारी त्यांच्या कौन्सिलच्या बैठकीत पश्चिम मंबालममधील रामकृष्णपुरम फर्स्ट स्ट्रीटचे नाव रविचंद्रन अश्विन रोड असे ठेवण्याचा ठराव मंजूर केला आहे. अश्विनच्या क्रिकेटमधील योगदानाचा सन्मान करण्यासाठी या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. विशेष म्हणजे अश्विनचं घरही याच मार्गावर आहे. अश्विनने त्यांच्या आंतरराष्ट्रीय कारकीर्दीत अनेक विक्रम प्रस्थापित केले आहेत. गेल्या डिसेंबर महिन्यात अश्विनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती. मात्र, तो यंदा आयपीएलमध्ये चेन्नईच्या संघाकडून खेळताना दिसणार आहे. चेन्नईने त्याला ९.७५ कोटी रुपयांना खरेदी करत आपल्या ताफ्यात समाविष्ट केलं आहे.

# १३ होमग्राउंडवर खेळणार १० संघ

## सीएसकेने घरच्या मैदानावर ७०% सामने जिंकले; पंजाबने एकच सामना जिंकला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** इंडियन प्रीमियर लीग चा 18 वा हंगाम आजपासून सुरू होत आहे. पहिला सामना कोलकाता आणि बंगळुरू यांच्यात ईडन गार्डन्स स्टेडियमवर संध्याकाळी 7.30 वाजता खेळला जाईल. संध्याकाळी 6 वाजता उद्घाटन समारंभ देखील होईल. यावेळी १० संघ १३ ठिकाणी त्यांचे सामने खेळतील. ७ संघांकडे प्रत्येकी एक होम ग्राउंड आहे, तर ३ संघांनी दुसरे होम ग्राउंड देखील निवडले आहे. ७ सामने दुसऱ्या पसंतीच्या ३ ठिकाणी खेळवले जातील. मागील १७ हंगामात अशी १२ मैदाने होती. जिथे पूर्वी आयपीएल सामने होत असत, पण आता होस्टिंग उपलब्ध नाही.

राजस्थान रॉयल्सचे होमग्राउंड जयपूरमधील सवाई मानसिंग स्टेडियम आहे. यावेळी संघ येथे ५ सामने खेळेल. तर संघाचे उर्वरित २ घरचे सामने गुवाहाटीतील बारसापारा स्टेडियमवर होतील. जयपूरमध्ये, राजस्थानने ५७ पैकी फक्त २० सामने गमावले आहेत.

दिल्ली कॅपिटल्सचे होमग्राउंड अरुण जेटली स्टेडियम आहे. यावेळी संघ येथे ५ सामने खेळेल. तर संघाचे उर्वरित २ घरचे सामने विझागमधील एसीए-व्हीडीसीए स्टेडियमवर होतील. कॅपिटल्सने घरच्या मैदानावर ८२ पैकी ३६ सामने जिंकले आहेत.

पंजाब किंग्जचे होम ग्राउंड मुल्लानपूरमधील यादविंद्र सिंग स्टेडियम आहे. संघ येथे ४ सामने खेळेल. संघाचे उर्वरित ३ घरचे सामने धर्मशाळेतील एचपीसीए स्टेडियमवर खेळले जातील. पीबीकेएसने गेल्या हंगामातच मुल्लानपूरला त्यांचे होम ग्राउंड बनवले होते, संघ येथे ५ पैकी फक्त १ सामना जिंकू शकला. पूर्वी संघ मोहालीच्या आयएस बिंद्रा स्टेडियमवर त्यांचे घरचे सामने खेळत असे.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचे होम ग्राउंड बंगळुरूमधील एम चिन्नास्वामी स्टेडियम आहे. संघ त्यांचे सर्व ७ घरचे सामने येथे खेळेल. आरसीबीने येथे ९१ सामने खेळले आहेत, त्यापैकी ४३ जिंकले आहेत आणि तेवढेच सामने गमावले आहेत. येथे, संघाचा एक सामना बरोबरीत सुटला आणि ४ सामने अनिर्णीत राहिले.

२०२३ चा चॅम्पियन गुजरात टायटन्स आयपीएलमध्ये त्यांचा फक्त तिसरा हंगाम खेळणार आहे. संघाचे होम ग्राउंड अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियम आहे. संघ येथे ७ सामने खेळेल. संघाने घरच्या मैदानावर १६ सामने खेळले आणि ९ सामने जिंकले.

लखनऊ सुपरजायंट्स देखील आयपीएलमध्ये त्यांचा तिसरा हंगाम खेळणार आहे, संघाने २०२२ मध्ये पदार्पण केले होते. एलएसजीचे होम ग्राउंड लखनौमधील एकाना स्टेडियम आहे. संघ येथे ७ सामने खेळेल. एलएसजीने त्यांच्या घरच्या मैदानावर १४ सामने खेळले, त्यापैकी ७ जिंकले आणि ६ गमावले. या काळात एक सामना अनिर्णीत राहिला.

३ वेळा चॅम्पियन असलेल्या कोलकाता नाईट रायडर्सचे होम ग्राउंड ईडन गार्डन्स स्टेडियम आहे. संघ येथे सुरुवातीच्या सामन्यासह ७ सामने खेळेल. यावेळी क्वालिफायर-२ आणि अंतिम सामनाही येथेच खेळवला जाईल. केकेआरने त्यांच्या घरच्या मैदानावर ८८ सामने खेळले, त्यापैकी फक्त ३६ सामनेच त्यांना पराभवाचा सामना करावा लागला.

पाच वेळा विजेत्या चेन्नई सुपर किंग्जचे होम ग्राउंड चेपॉक स्टेडियम आहे. संघ येथे ७ सामने खेळेल. चेन्नई हा घरच्या मैदानावरचा सर्वात मजबूत आयपीएल संघ आहे, या संघाने चेपॉकमध्ये खेळल्या गेलेल्या सर्वाधिक ७०% सामने जिंकले आहेत. संघाने येथे ७१ सामने खेळले आणि फक्त २० सामने गमावले.

## केएल राहुल २ सामन्यांमधून बाहेर पडू शकतो

**नवी दिल्ली :** यष्टीरक्षक फलंदाज केएल राहुल आयपीएलमध्ये दिल्ली कॅपिटल्सकडून सुरुवातीचे काही सामने खेळू शकणार नाही. दिल्ली कॅपिटल्सकडून खेळणाऱ्या मिशेल स्टार्कची पत्नी आणि ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू एलिसा हीली यांनी ही माहिती दिली.

त्यांनी सांगितले की राहुल पहिल्या काही सामन्यांमध्ये खेळू शकणार नाही कारण त्याची पत्नी अथिया शेट्टी गर्भवती आहे आणि ते दोघेही त्यांच्या पहिल्या मुलाची वाट पाहत आहेत. राहुल आणि त्याची बॉलीवूड अभिनेत्री पत्नी अथिया शेट्टी यांनी नोव्हेंबर २०२४ मध्ये ही आनंदाची बातमी जाहीर केली होती.

ॲलिसा हीलीने यूट्यूब चॅनल LiSTNR स्पोर्टवर म्हटले आहे की हॅरी ब्रूकची जागा कोण घेते हे पाहणे मनोरंजक असेल. त्यांच्याकडे केएल राहुल आहे जो कदाचित पहिले काही सामने खेळणार नाही. ते त्यांच्या बाळाच्या जन्माची वाट पाहत आहेत. दिल्ली कॅपिटल्स (डीसी) कडे काहीही करू शकणाऱ्या तरुण खेळाडूंची फौज आहे. त्यांच्याकडे केएल राहुल देखील आहे जो टी-२० क्रिकेटमध्ये डावाला बळ देईल.

## जी पी सहस्रबुद्धे चषक कॅरम स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी चुरशीचे सामने



**पुणे :** पटवर्धन बाग येथील एरंडवणे ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात बाद पद्धतीने चालू असलेल्या जी पी सहस्रबुद्धे चषक एकेरी कॅरम स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी अनेक आश्चर्यकारक निकाल लागले. अनुभवी कॅरम खेळाडूंनी आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर अटी - तटीच्या सामन्यात विजय मिळविले. स्पर्धा प्रमुख शिरीष जोशी व मुख्य पंच अभय अटकेकर यांनी निकाल घोषित केले. आज झालेल्या सामन्यान मध्ये पंकज कुलकर्णी ने निस्सार शेख ( २५- ४,१८- १३), बाळासाहेब गायकवाड ने सुनील शेजवलकर ( १८-१५,१०-२५,२३- २२), शिरीष जोशी ने उर्मिला शेजवलकर (२५-०,२५-०), सुरेश राजवाडे नेहमी अविनाश निंबरगी ( २०- ५,२५- ०), चंद्रशेखर सकलम ने गिरीश जोशी ( १४- ११,११- २२,१३- १२), हेमंत देशपांडे ने अजित गोखले ( २१- ५,१३- २८,१८- ९), सुनील वाघ ने रमेश तिवारी ( २५- १,२२- ७,), सुधाकर चव्हाण ने अजय पऱ्हाड ( २६- १३,१३- १२), अमृत परदेशी ने सूर्यकांत केसरकर ( २२- १२,२३- ७), अभय अटकेकर ने वसंत रत्नपारखी (२०-७,१५-१३), माधव तिळगुळकर ने आनंद दामले (२५- ४,२१- ०), राजकुमार ठाकूर ने हेमंत देशपांडे (२५- ७,२५- ४) ला हरवून पुढच्या फेरीत प्रवेश केला.

## ३८ व्या फार्मसी करंडक क्रिकेट स्पर्धेचे पारितोषिक वितरण



**पुणे :** भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या पूना कॉलेज ऑफ फार्मसी आयोजित राज्यस्तरीय ३८ व्या फार्मसी क्रिकेट करंडक स्पर्धेचे दिनांक १७ ते २१ मार्च २०२५ दरम्यान आयोजन केले होते. या स्पर्धेत विविध महाविद्यालये व औषधनिर्माणशास्त्र कंपन्यांचे ११ पुरुष संघ व ६ महिला संघ सहभागी झाले होते. स्पर्धेत पुरुष गटात जीवनधारा फार्मा ,तर महिला गटात इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी हा संघ विजेता ठरला. महिला गटात शिवनगर विद्या प्रसारक मंडळ (एस . वी.पी.एम) यांचे कॉलेज ऑफ फार्मसी आणि इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी यांच्यात खेळला गेला . एस . वी.पी.एम कॉलेज ऑफ फार्मसी ने प्रथम फलंदाजी करताना ६ गडी गमावत ८ ओव्हर मध्ये २९ धावा केल्या.त्याला उत्तर देताना इंदिरा कॉलेज ने एक ही गडी न गमावत ३० धावा केल्या आणि विजेतेपदाला गवसणी घातली. पुरुष गटात अंतिम सामना जीवनधारा फार्मा आणि सिंहगड कॉलेज ऑफ फार्मसी (वडगाव) यांच्यात खेळला गेला. प्रथम फलंदाजी करताना सिंहगड कॉलेज ने २० ओव्हर मध्ये १५९ धावा ७ गडी गमावत केल्या. त्याला प्रतिउत्तर देताना जीवधारा संघाने ५ गडी गमावत १६३ धावा करून विजेतेपद पटकावले. सामनाविराचा मान जीवनधारा संघाच्या अमोल नंजन ह्याला मिळाला. विजेत्या व उपविजेत्या संघांना मानाचे फार्मसी करंडक व मानपत्र प्रमुख पाहुणे डॉ. विपुल लुणावत (संस्थापक संचालक, इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स सायन्स अँड टेक्नॉलॉजी, पुणे) ,यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले .ह्या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आत्माराम पवार, उपप्राचार्या डॉ. वर्षा पोखरकर, उपप्राचार्य डॉ.सथियानारायणन उपस्थित होते. मुख्य पाहुणे डॉ. विपुल लुनावत यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "या स्पर्धेतील विजेते आणि उपविजेत्यांसाठी मी माझ्या संस्थेत शिष्यवृत्त्या प्रदान करणार आहे." या स्पर्धेचे आयोजन डॉ. सतीश मंडलिक (इन्चार्ज, फार्मसी कप) आणि सौ. मालती साळुंखे (उप-इन्चार्ज) यांनी केले.तसेच विद्यार्थी सचिव सन्मान गोसावी, अभिषेक भुंडे, चैतन्य, जिया शाह, आयुष, यशश्री, ऋषिकेश आणि ताश्वी शेट्टी हे स्पर्धेच्या आयोजनासाठी कार्यरत होते.

## श्रावी, सृष्टी, नमिश, अंशुल यांचा अंतिम फेरीत प्रवेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** शेपिंग चॅम्पियन्स फाऊंडेशन पुणे यांच्या वतीने आयोजित एमएसएलटीए शेपिंग चॅम्पियन्स फाऊंडेशन पुणे पीएमडीटीए अखिल भारतीय मानांकन सुपर सिरीज १४ वर्षाखालील टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत श्रावी देवरे, सृष्टी सूर्यवंशी, नमिश हूड, अंशुल पुजारी यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला.

श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल टेनिस कोर्ट, महाळुंगे, बालेवाडी, पुणे येथे सुरु असलेल्या मुख्य ड्रॉंच्या एकेरीत उपांत्य फेरीत मुलींच्या गटात अव्वल मानांकित महाराष्ट्राच्या श्रावी देवरे हिने सान्वी राजूचा ६-०, ६-२ असा सहज पराभव करून अंतिम फेरीत धडक मारली. बिगर मानांकित सृष्टी सूर्यवंशी हिने सहाव्या मानांकित मायरा शेखचा ६-३, ६-० असा पराभव करून अनपेक्षित निकाल नोंदवला.

मुलांच्या गटात सातव्या मानांकित नमिश हुडने अव्वल मानांकित स्मित उंद्रेचा टायब्रेकमध्ये ७-६(३), ७-५ असा पराभव करून सनसनाटी निकालाची नोंद केली. दुसऱ्या लढतीत अंशुल पुजारीने अधिराज दुधाणेचा ७-५, ६-१ असा पराभव करून अंतिम फेरी गाठली. दुहेरीत मुलींच्या गटात उपांत्य फेरीत कीर्तियानी घाटकर व इशल पठाण यांनी चौथ्या मानांकित हरिणी हेमंत व रुमी गाडिया यांचा ६-४, ६-२ असा तर, श्रावी देवरे व सारा फेंगसे यांनी दुसऱ्या मानांकित धृती गुंडू व मायरा शेख यांचा ७-५, ६-१ असा पराभव करून अंतिम फेरीत धडक मारली.

## मुंबई शहर पूर्व, पश्चिम संघ बाद फेरीच्या दिशेने; रायगड, नाशिक, ठाणे यांचीही आगेकूच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** मुंबई शहर पूर्व व पश्चिम, मुंबई उपनगर पश्चिम यांची महिला विभागात, तर रायगड, नाशिक शहर, ठाणे ग्रामीण यांची पुरुष विभागांत राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत बाद फेरीच्या दिशेने घोडदौड केली. महिलांच्या ग गटात मुंबई शहर पश्चिमने ठाणे शहरचा ४०-२२ असा पाडाव करीत बाद फेरीचा आपला मार्ग मोकळा केला. आक्रमक सुरुवात करीत मुंबईने पूर्वार्धात दोन लोण देत २७-१४ अशी आश्वासक आघाडी घेतली. उत्तरार्धात त्याच जोशाने खेळत आपला विजय सोपा केला. श्रद्धा कदमने एकाच चढाईत चार गडी टिपत या विजयात महत्त्वाचा खेळ केला. तिला पूजा यादवची चढाईत, तर पौर्णिमा जेधेची उत्कृष्ट साथ लाभली. ठाण्याची माधुरी गवंडी एकाकी लढली.

मुंबई शहर पूर्वने फ गटातील चुरशीच्या लढतीत पालघरचा ५४-४० असा पाडाव केला. पहिल्या डावात दोन लोण देत ३२-२० अशी आघाडी घेणाऱ्या मुंबईला दुसऱ्या डावात उत्तम लढत दिली.

साक्षी सावंत, सौंदर्या रामस्वामी यांच्या उत्कृष्ट चढाया, त्यांना तनु, मेघा कदम यांची मिळालेली पकडीची भक्कम साथ यामुळे मुंबईने हे साध्य केले. मोक्षा पुजारी, ज्युली मिस्कीटा, शाहीन शेख यांचा खेळ पालघरला विजयी करण्यात थोडा कमी पडला. मुंबई उपनगर पश्चिमने महिलांच्या ह गटात सांगलीचा ३६-२१ असा पराभव केला. उपनगरे पहिला लोण देत विश्रांतीपर्यंत २०-११ अशी आघाडी घेतली. नंतर आणखी एक लोण देत आपला विजय निश्चित केला. कोमल देवकर, करीना कामतेकर यांनी उपनगरकडून, तर श्रद्धा माळी, किरण तोडकर यांनी सांगलीकडून चढाई पकडीचा उत्कृष्ट खेळ केला.

पुरुषांच्या क गटात रायगडाने यजमान ठाणे शहरचा ३३-२९ असा पराभव करीत बाद फेरीतील आपला प्रवेश निश्चित केला. या पराभवाने ठाण्याचा बाद फेरी गाठण्याचा मार्ग खडतर झाला. पार्थ ठाकूर, मिथुन मोकल यांच्या चढाई पकडीच्या धूर्त खेळीने हा विजय साकारला. सुरज धुंदले, अभिजित मोईल यांचा खेळ ठाण्याला विजयी करण्यात कमी पडला. नाशिक शहरने पुरुषांच्या अ गटात बीडला ४७-२९ असे नमवित बाद फेरीतील आपला सहभाग निश्चित केला.

आंतरराष्ट्रीय खेळाडू आकाश शिंदे, शाकिब सय्यद, प्रसाद माटे यांच्या चतुरस्त्र खेळाने नाशिकने १८ गुणांच्या फरकाने सामना जिंकला. बीडच्या शंकर मेघाने, रोहन केंकणे यांनी कडवी लढत दिली. पुरुषांच्या ब गटात ठाणे ग्रामीणने नांदेडचा ५५-२६ असा पाडाव करीत बाद फेरीच्या दृष्टीने आगेकूच केली. आक्रमक केलं करीत पहिल्या डावात २लोण देत २८-११ अशी आघाडी घेतली.

## आयपीएल मध्ये चेंडूवर लाळ लावण्याची बंदी उठवली

**नवी दिल्ली :** आयपीएल-२०२५ मध्ये चेंडूवर लाळ लावण्यावरील बंदी बीसीसीआयने उठवली आहे. वृत्तसंस्था पीटीआयनुसार, गुरुवारी मुंबईत कर्णधारांसोबत झालेल्या बैठकीत एकमत झाल्यानंतर बोर्डाच्या आयपीएल समितीने हा निर्णय घेतला. तथापि, बोर्डाने अद्याप यावर अधिकृत विधान दिलेले नाही. कोरोना आजारामुळे २०२० मध्ये बोर्डाने चेंडूवर लाळ लावण्यास बंदी घातली होती. तथापि, आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आयसीसीने अद्याप हा नियम शिथिल केलेला नाही. वेगवान गोलंदाजांना चेंडूवर लाळ लावल्याने सर्वाधिक मदत मिळते. यामुळे चेंडू चांगला स्विंग होतो. तुम्ही कदाचित पाहिले असेल की गोलंदाज आणि क्षेत्ररक्षक चेंडू कापडाने घासत राहतात आणि लाळ लावत राहतात. खरंतर, ते एका बाजूला चेंडूची चमक कायम ठेवण्याचा प्रयत्न करतात. जेणेकरून चेंडू स्विंग करणे सोपे होईल. चॅम्पियन्स ट्रॉफी दरम्यान चेंडूवर लाळ लावण्याच्या नियमात बदल करण्याची मागणी मोहम्मद शमीने केली होती. त्यांनी पत्रकार परिषदेत म्हटले होते की, 'आधुनिक काळातील क्रिकेट गोलंदाजांसाठी कठीण झाले आहे. रिव्हर्स स्विंग करणे कठीण आहे, परंतु आयसीसीने चेंडूवर लाळ लावण्यास बंदी घातली आहे. जेव्हा गोलंदाज लाळेने चेंडू घासतो तेव्हा चेंडू घासलेल्या बाजूला गुळगुळीत होतो. तर दुसरी बाजू खडबडीत होते. जेव्हा वेगवान गोलंदाज गोलंदाजी करतो तेव्हा चेंडू हवेत खडबडीत बाजूने फिरतो, याला रिव्हर्स स्विंग म्हणतात. क्रिकेटमध्ये पारंपारिक स्विंग देखील आहे. जेव्हा चेंडू दोन्ही बाजूंनी चमकत असतो तेव्हा नवीन चेंडूने हे शक्य होते.

## अनसोल्ड राहिलेला विलियम्सन आयपीएल २०२५ मध्ये दिसणार , पण भूमिका बदलणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** इंडियन प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेआधी गेल्यावर्षाच्या अखेरीस मेगा ऑक्शन झाले होते. त्यामुळे अनेक संघात बदल झाले. बऱ्याच नव्या खेळाडूंना संधी मिळाली, तर अनेक दिग्गज खेळाडू मात्र अनसोल्ड राहिले. या अनसोल्ड राहिलेल्या खेळाडूंमध्ये न्यूझीलंडचा दिग्गज खेळाडू केन विलियम्सनचाही समावेश आहे. विलियम्सन २०१५ ते २०२४ दरम्यान झालेल्या सर्व हंगामात खेळला आहे. त्याने सनरायझर्स हैदराबाद संघाचे नेतृत्व करताना २०१७ साली संघाला अंतिम सामन्यापर्यंत पोहचवले होते. त्याने आयपीएलमध्ये ७९ सामने खेळताना १८ अर्धशतकांसह २१२८ धावा केल्या.

दरम्यान, विलियम्सन जरी आयपीएल २०२५ लिलिवात अनसोल्ड राहिला असला, तरी तो या हंगामात दिसणार आहे, मात्र तो एका वेगळ्या भूमिकेत दिसणार आहे.

केन विलियम्सन आता समालोचन करताना दिसणार आहे. स्टार स्पोर्ट्सने नुकतीच समालोचकांची यादी जाहीर केली असून यात विलियम्सनचेही नाव आहे. विलियम्सन एबी डिविलियर्स, सुरेश रैना, हर्षा भोगले, सुनील गावसकर, मॅथ्यू हेडन, शेन वॉटसन, मायकल क्लार्क अशा अनेक दिग्गजांसोबत समालोचन करताना दिसणार आहे.

आयपीएलचे समालोचन मराठी, हिंदी, इंग्लिश, तमिळ, तेलुगु, कन्नडा, बंगाली, पंजाबी, भोजपूरी, हरियानवी, मल्याळम, गुजराती या भाषांमध्ये होणार आहे.

## ब्राव्होने सांगितली 'त्या' ऑफर मागची कहाणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** इंडियन प्रिमिअर लीगच्या १८ व्या हंगामाची सुरूवात आज कोलकाता नाईट रायडर्सविरूद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळूरू सामन्याने होणार आहे. गतविजेता केकेआर संघ नवनियुक्त कर्णधार अजिंक्य रहाणेच्य नेतृत्त्वात खेळण्यासाठी सज्ज झाला आहे. तर यंदा केकेआरने कर्णधारासोबत मेंटॉरही बदलला आहे. सीएसकेचा माजी खेळाडू ड्वेन ब्राव्हो यावेळी केकेआरचा मेंटॉर असणार आहे. मेंटॉर ब्रॉव्होने केकेआर संघात सामील होण्यापूर्वी सीएसकेचा माजी कर्णधार एमएस धोनीची परवानगी घेतल्याचे सांगितले.

केकेआरचा मेंटॉर गौतम गंभीरने भारताच्या कर्णधारपदाची जबाबदारी स्वीकारल्यामुळे कोलकाता नाईट रायडर्स संघात मेंटॉर पदाची जागा रिक्त झाली. कोलकाताने मेंटॉर पदासाठी ड्वेन ब्राव्होची नेमणूक केली. ब्राव्हो आधी चेन्नई सुपर किंग्ज संघात गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून कार्यरत होता. त्याने चेन्नई संघ सोडण्याआधी माजी कर्णधार एमएस धोनीची परवानगी घेतल्याचे एका मुलाखतीत सांगितले.

आयपीएल २०२५ हंगामाला सुरूवात होण्यापूर्वी केकेआरचा मेंटॉर ब्राव्होला एका मुलाखतीत " जर केकेआर आणि सीएसके यांच्यात फायनलचा सामना रंगला तर तुम्ही कोणाला सपोर्ट कराल?" असा प्रश्न विचारण्यात आला.

## आयपीएल २०२५ हंगामाला सुरूवात होण्यापूर्वी एम.एस. धोनीच्या निवृत्तीची चर्चा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** गेल्या दोन-तीन मोसमात आयपीएल सुरू झाली आणि संपत असतानाही महेंद्रसिंग धोनीच्या निवृत्तीचा प्रश्न विचारला जातो, पण धोनी असे प्रश्न खुबीने टाळतो आणि पुन्हा नव्या जोमाने तयार होतो. यंदाही हाच प्रश्न कायम राहणार आहे. आयपीएल आणि धोनी हे अतूट नाते तयार झालेले आहे. ४३ वर्षीय धोनी २०२० मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झाला, पण आयपीएलमधील त्याचे महात्म्य अजूनही कायम आहे. यंदाची आयपीएलही त्यास अपवाद नसेल, असे सांगितले जात आहे.

धोनी आता मॅचविनर राहिला नसला तरी त्याची मैदानावरची उपस्थिती संपूर्ण चेन्नई संघात चैतन्य फुंकत असते. चेन्नईचे कर्णधारपद ऋतुराज गायकवाड सांभाळत आहे, पण त्याच्या मागे धोनीची ताकद उभी असते. गोलंदाजीतील बदल, क्षेत्ररणातील व्यूहरचना यासाठी धोनीच्या टिप्स ऋतुराजसाठी मोलाच्या ठरत असतात.

एकीकडे ४३ वर्षांचा सर्वात वयस्क असलेला धोनी आणि त्याचबरोबर राजस्थान रॉयल्स संघात असलेला १३ वर्षीय वैभव सूर्यवंशी ही यंदाची आयपीएलमधील दोन टोके असणार आहेत. वैभवला नेमक्या किती सामन्यात खेळण्याची संधी मिळते, याची उत्सुकता असणार आहे.

## बॅडमिंटनमध्ये महाराष्ट्राची तीन पदके निश्चित

# आरती, सुकांत कदम सुवर्णपदकासाठी खेळणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**नवी दिल्ली :** दुसऱ्या खेलो इंडिया पॅरा गेम्समध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंनी शानदार कामगिरी करीत बॅडमिंटनमध्ये पदके निश्चित केली आहेत. अंतिम फेरीत महाराष्ट्राच्या आरती पाटील आणि सुकांत कदम यांनी अंतिम फेरीत धडक मारली आहे. त्यामुळे त्यांच्याकडून आता सुवर्णपदकाची अपेक्षा आहे. इंदिरा गांधी क्रीडा संकुलातील जिमनॅस्टिक हॉलमध्ये उपांत्य फेरीत २८ वर्षीय आरती पाटीलने आपली मैत्रीण हरियाणाची लतिका ठाकूर हिचे आव्हान २१-१८, २१-७ ने परतवून लावले. आता अंतिम फेरीत तिच्यासमोर भारताची अव्वल खेळाडू असलेली पॅरालिम्पिकपटू नित्याश्री हिचे आव्हान असेल.

खेलो इंडिया पॅरा गेम्समधील आरतीचे हे सलग दुसरे पदक असेल. पुनीत बालन ग्रुपचे आर्थिक पाठबळ लाभलेली आरती अजय रावत, अक्षय गजबे, वरद गजबे, राहुल पाटील आणि संयोगिता घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते. म्हाळुंगे-बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलातील क्रीडा संचलनालयात मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या आलेल्या नांदेडच्या ३५ वर्षीय लता ताई उमरेकर हिने बॅडमिंटनमध्ये कांस्यपदक मिळवले. उपांत्य फेरीत तिला नित्याश्रीने २१-६, २१-४ असे सहजपणे पराभूत केले.

पदकाचा रंग बदलला असला तर अधिक आनंद झाला असता. पुरेसा सराव नसतानाही आपल्या संघाला कांस्यपदक जिंकून देऊ शकले, याचा आनंद वाटतो, अशी प्रतिक्रिया लताताई हिने व्यक्त केली.

बॅडमिंटनमध्ये महाराष्ट्राला सुवर्णपदकाची अपेक्षा असलेला आंतरराष्ट्रीय खेळाडू सुकांत कदमने फायनलमध्ये धडक दिली आहे.

उपांत्य फेरीत सुकांतने हरियाणाच्या योगेशचा २१-१५, २१-१३ असा पराभव केला. अंतिम फेरीत त्याच्यासमोर तमिळनाडूच्या नवीनकुमारचे आव्हान असेल.

#रा